# *सात मंडळीची युगे आणि सात शिक्के ह्यांमधील अंतर*

शुभ संध्याकाळ, मित्रांनो. हे एक—एक महान सौभाग्य आहे की, येथे परमेश्वराच्या भवनात पुन्हा आज रात्री, सभेसाठी येणे, आणि अजूनपर्यंत—सकाळच्या मान्यावर जगत आहोत की, त्याच्या महान उपस्थितीद्वारे आपला जीव भरपूरीने आशीर्वादीत झाला होता. आणि आता, आज रात्री, आपण एका…विषयावर सुरुवात करीत आहोत: *सात मंडळ्यांची युगे आणि सात शिक्के यांतील अंतर.*

2 आणि ह्या दुपारी, मी सहज एका मित्राशी बोलत होतो. आणि कदाचित, जर प्रभूची इच्छा असेल, कधीतरी ह्या उन्हाळ्यात, जर त्याने मला घरी नेले नाही, किंवा—किंवा मी परत आलो, परदेशी गेलो नाही किंवा काहितरी, तर मला पुन्हा सात अंतिम तुतारीच्या विषयावर प्रचार करण्यास आवडेल, पाहा, आणि ते सर्व एकत्र जोडलले आहे आणि नंतर त्यात शेवटच्या सात पीडा आहेत आणि जसजसा आपण त्याचा अभ्यास करीत पुढे जाऊ ते सर्व एकत्र जोडले जातील.

3 म्हणून, आज रात्री, जेव्हा आपण एका प्रकारे शांत झालेले आहोत,…ह्या रात्री कदाचित मी थोडा अधिक वेळघेईन…लवकरात लवकर मी येथे परत येईन, आता… फिनिक्समध्ये मी सर्व प्रचार करताना, एकदाही माझा आवाज घोगरा झाला नाही. पाहा.ते बरोबर आहे. आणि ओह, माझ्या देवा मी किती तीव्र प्रचार केला! आणि मी विश्वास करतो, तेथे आवाज कर्कश न होता, सत्तावीस सभा झाल्या. परंतु, तुम्ही पाहीले, येथले वातावरणच तसे आहे. येथे हवामान अगदी खराब आहे, फक्त दरी. येथे अगदीच खराब परिस्थिती आहे, आणि माझे आरोग्य, तुम्हाला ठाऊक आहे, मला काय म्हणायचे आहे, ते—ते बिघडले आहे. आणि कोणीही प्रचारक…येथे बोलण्यास सुरुवात करतो, त्याचा घसा खराब होतो.

4 एकदा, माझ्या एका—एका डाक्टर मित्राने काय समस्या आहे हे, पाहण्याकरिता माझा घसा पाहिला, म्हणाला, "काहीच नाही." म्हणाला, "तुझ्या स्वरनलिकेत तेथे फक्त थोडासा कठीणपणा आला आहे." म्हणाला, "ते प्रचार करण्यामुळे झाले आहे." ठीक आहे. तुम्हाला ठाऊक आहे की, माझ्या बरोबर तसेच झाले आहे. जोपर्यंत माझ्या गळ्याचा उपयोग प्रचार कार्यासाठी होत आहे, ते मला फार बरे वाटते, तुम्ही पाहीले. ते देवाच्या राज्यासाठी, चांगले होईल.

5 आता, कदाचित आपण आपल्या शरीरामध्ये…येशू ख्रिस्ताचे चिन्ह घेऊ शकत नसू, जसे पौलाने मार खाण्याद्वारे घेतले, परंतु आपण ते चिन्ह प्रचार करण्याद्वारे आणि आपला आवाज ज्या गोष्टी चुकीच्या आहेत, त्या विरुद्ध उठविण्याद्वारे घेऊ शकतो. म्हणून, आम्ही धन्यवादीत आहोत की, आपल्याला आता पुढे मार खाण्याची आवश्यकता नाही, विशेषतः ह्या वेळेपर्यंत…म्हणून आपण—आपण…

6 येथे असलेल्या किती जणांनी *महाशय, हा कोणता समय आहे?* हा संदेश वाचला आहे? किंवा तो ऐकला आहे, तुम्हाला माहित आहे, *हा कोणता समय आहे, महाशय?* त्याचसाठी मी थोडा चिंतीत आहे. जर तुमच्याकडे नाही, मला वाटते, कसेही करुन जर तुम्हाला तो ऐकण्यासाठी मिळू शकेल किंवा काही प्रकारे. मला एक प्रकारची चिंता

वाटते. सभेची सुरुवात करण्याअगोदर मला हे तुम्हाला सांगायचे आहे. अंदाजे—अंदाजे एक आठवडा किंवा दहा दिवसांअगोदर, मी इतका अस्वस्थ होतो. मी अगदी...मी—मी—मी काही करु शकत नव्हतो; मी सभा घेऊ शकत नव्हतो किंवा काहीही, कारण मला—मला ते माहीत नव्हते. ते काहीतरी वाईट होते. असे वाटत होते, आणि ते काय होते, ते मला कळले नाही...

7 एका पहाटेस, मी सॅबीनो कॅन्योनपर्यंत जाण्यासाठी उठलो. जे, माझ्या घरापासून, फक्त अंदाजे तीस मिनिटे...किंवा चाळीस इतके गाडीने सॅबीनो कॅन्योनच्या टोकापर्यंत ते अंतर आहे, नंतर तेथे तीस मैलाचा रस्ता आहे, जो डोंगरापर्यंत जातो.

8 तेथे वर, एक विचित्र प्रदेश आहे. मी तेथे वाळवंटावर असू शकतो, जेथे आता, ऐंशी आणि नव्वद तापमान आहे, आणि तीस मिनिटांत मी आठ फूट बर्फामध्ये, पर्वताच्या शिखरावर असू शकतो, पाहा.नुकताच आम्ही फिनिक्स येथे होतो, जेथे तापमान वीस, अठ्ठावीस अंश असे होते.त्यांनी पोहण्याचे तलाव गरम केले होते, आणि लोक पोहत होते. आणि तेथून अंदाजे चाळीस मिनिटांच्या अंतरावर, फ्लॅगस्टाफ येथे, तापमान शून्याच्या खाली चाळीस होते. पाहा? हा उंचीवरील प्रवाह आणि वाळवंटातील फरक आहे आणि दम्यासाठी अतिशय आरोग्यदायी आहे, आणि तसेच पुढे.

9 परंतु, आता, मी कॅन्योनमध्ये वर पोहचलो आहे, आणि मी जितके होईल तितक्या उंचावर चढलो. आणि मी—मी—मी तेथे वर बसलेलो असताना, प्रभूला विचारले, ह्या सर्वांचा अर्थ काय आहे, आणि असेच काही. मी काहीसा चिंतातूर होतो, आणि काय करावे मला कळत नव्हते.

10 आणि म्हणून मी प्रार्थना करीत असताना; विचित्र गोष्ट घडली. मी—मी—मी प्रमाणिक राहू इच्छितो. आता, मी झोपेत असू शकतो. ती एक प्रकारची गाढ तंद्री असू शकते, किंवा तो एक—एक—एक दृष्टांतही असू शकतो. मला विश्वास ठेवणे भाग आहे की, तो एक दृष्टांत होता. की, माझे हात पसरले होते आणि मी सांगत होतो, "प्रभू ह्या स्फोटाचा काय अर्थ आहे? आणि हे सात देवदूत पिरॅमिडच्या आकारात नक्षत्रांच्या समुहात, मला भूमिपासून वर नेत आहेत आणि पूर्वेकडे वळवित आहे, ह्याचा अर्थ काय आहे?"

11 मी तेथे, प्रार्थना करीत उभा होतो, आणि काहितरी घडले. आणि, आता, काहीतरी माझ्या हातात पडले. आणि मला माहित आहे, जर तुम्हाला आत्मिक गोष्टी कळत नसतील, तर ते तुम्हाला फार विचित्र वाटेल. परंतु काहीतरी माझ्या हातात आदळले. आणि, जेव्हा मी पाहिले, ती एक संरक्षक, तलवार होती आणि त्याची मुठमोत्याची बनवलेली होती, खूपच मौल्यवान मोती मी आतापर्यंत कधीच पाहीले नव्हते आणि ते तुम्हाला माहित आहे, जेथे...मला वाटते तुमचे हात कापण्यापासून रक्षण करण्यासाठी ते असते, तुम्हाला माहीत आहे, जेव्हा लोकांबरोबर तुमचे द्वंद्वयुध्द होते, ती सोन्याची होती आणि तलवारीचे पाते खूप लांब नव्हते, परंतु ते वस्तऱ्यासारखे तीक्ष्ण होते आणि ते चमकदार चांदीचे होते आणि ती मी आजपर्यंत पाहिलेल्या गोष्टींमध्ये अत्यंत सुंदर होती. ती माझ्या हातात अगदी तंतोतंत बसली आणि मी ती पकडली होती. मी म्हणालो, "ती फारच सुंदर आहे की नाही!" मी तिच्याकडे पाहीले. आणि मी विचार केला, "परंतु तुला माहीत आहे, मी तलवारीला नेहमीच घाबरतो." मी एक प्रकारे आनंदी झालो की, मी त्या दिवसात राहत नाही, जेव्हा ते तलवारीचा उपयोग करीत होते, कारण मी—मी चाकूलाही घाबरतो. आणि म्हणून मी विचार केला, "मी तिचं काय करणार?"

12 आणि मी माझ्या हातात तिला धरली असताना, कुठून तरी एक आवाज म्हणाला, “ती राजाची तलवार आहे.” आणि नंतर ती मला सोडून निघून गेली.

13 मग मी—मी अचंभित झालो की, त्याचा काय अर्थ आहे, “‘ती महाराजांची तलवार आहे.’” आणि मी विचार केला, “जर ती असे बोलली असती, ‘*एका* राजाची तलवार आहे,’” तर ते मला समजले असते, परंतु ती म्हणाली, “त्या महाराजाची तलवार,” म्हणून मला तो अधिकार नसेल, परंतु मी विचार केला, “तेथे फक्त एकच आहे, *जो* राजा आहे, तो परमेश्वर आहे. आणि त्याची तलवार *ही* आहे, ‘दुधारी तलवारीपेक्षा तीक्ष्ण,’ पाहा. ‘आणि तुम्ही माझ्यामध्ये आणि माझी वचने…’” पाहा? आणि मी—मी विचार केला…

14 द्वंदयुध्दात, तुम्ही पाहा आणि जसे मला…मला त्यातला एक शब्दही कळत नाही, किंवा द्वंद्वयुध्दातील एकही सिंध्दात मला कळत नाही. परंतु, माझ्या समजेप्रमाणे चाकू तिरका मारला जातो. आणि मग, शेवटी, तलवारी जर एकमेकांवर आदळल्या गेल्या, शत्रू आणि तुमची तलवारीची टक्कर होऊन थांबविली जाते, *अशाप्रकारे*, मग द्वंद्वयुध्दात मनुष्याला ताकद लावावी लागते. कारण, पाहा, त्याच्या तलवारीचे टोक माझ्या हृदयाकडे, आणि माझ्या तलवारीचे त्याच्या हृदयाकडे असते, परंतु ते आदळल्या जातात, जेव्हा आम्ही तलवारी एकमेकांना मारतो. आणि मग ते मारा करतात, आणि तेव्हा तलवारी एकत्र येतात आणि त्यातील एक जो जोराने दुसऱ्याला धक्का देऊ शकतो, तलवार थेट हृदयात जाते. म्हणून ती घेते…

15 त्याचप्रकारे तलवार ही वचन आहे, ती धरण्यासाठी मजबूत विश्वास लागतो, तिला शत्रूच्या हृदयापर्यंत आणण्यासाठी. आता, मला ह्या गोष्टीविषयी ठाऊक नाही, परंतु फक्त…जे सर्व मला त्याच्या पासून मिळाले आहे, ते मी सांगू शकतो, मी तुम्हाला सांगितल्या आहे, ह्यासाठी, कि तुम्हाला कळाव्या, माझा विश्वास आहे, त्या आहेत… आपल्या प्रभूने सांगितले नव्हते काय, जे सर्व त्याला पित्यापासून मिळाले होते, त्या त्याने सांगितल्या आहेत, आणि काहीच राखले नाही? आणि—आणि त्याचप्रकारे आम्हीही त्या गोष्टी करु इच्छितो जशा त्या येतात. आता, जर तुम्ही खरेच हुशार असाल आणि प्रार्थना कराल, मला खात्री आहे की, तुम्हाला काहीतरी लवकरच समजेल, आता, काही गोष्टी समजल्या आहेत अशी मी आशा करतो.

16 आता ह्या पुस्तकात, आपण सर्व आता. येशू ख्रिस्ताचे प्रकटीकरण म्हटलेल्या ह्या पुस्तकाच्या 5व्या अध्यायाकडे वळूया.

17 आता, उद्या रात्री पहिला शिक्का आहे. जे, पहिले चार शिक्के उघडण्यात आले, चार घोडेस्वारांद्वारे, प्रत्येक शिक्का उघडल्यावर पृथ्वीवर काहीतरी घडले आहे आणि, मग, तरीही ते अधिक लांबविले जाणार नाहीत. सोमवार, मंगळवार, बुधवार, गुरुवार होईपर्यंत…ते होतील. मग, मी बहुतेक, सहावा शिक्का…आणि पाचवा, सहावा आणि सातवा शिक्का. जे बहुतेक अतिशय लांब असतील. म्हणून, ते तुम्हाला थोडा विश्राम घेण्यासाठी थोडा वेळदेईल.

18 आम्ही प्रयोजन केले आहे, मला वाटते की, येथे आठवड्याच्या रात्री सात वाजता सभा सुरु कराव्या. आणि मी बरोबर साडे सात वाजता मंचावर येईन. आणि नंतर आपण कदाचित मध्यरात्रीपर्यंत बाहेर निघू. म्हणून—म्हणून आज सकाळी मी—मी एक तास जास्त घेतला. तसे करण्याचा माझा हेतू नव्हता, मी फक्त…मला माहीत नाही केव्हा.

19 कारण, मला माहीत नव्हते की, पहिला घोडेस्वार कोण आहे. मला दुसरा, तिसरा, चौथा, पाचवा, सहावा किंवा सातवा शिक्का माहीत नाही. ह्या क्षणापर्यंत, मला माहीत

नाही. पाहा? मी फक्त त्याच्यावर अवलंबून आहे, त्यामुळे म्हणूनच, ह्या आठवड्यात देवाच्या अनुग्रहाने मदत करण्याचा प्रयत्न करीत आहे, विश्वास ठेवतो की, तुम्ही खोलवर समजत आहात...

20 तुम्हाला माहीत आहे, दृष्टांतात, तुम्ही गोष्टी प्रकट करु शकत नाही. जोपर्यंत ते प्रकट करण्याची तुम्हाला परवानगी मिळत नाही. किती वेळा मी तुम्हाला असे सांगताना ऐकले आहे, "घरामध्ये जा. कदाचित *तेथे* टोपी ठेवलेली असेल. आणि हा मुलगा किंवा तसेच कोणी बरा होणार नाही, जोपर्यंत *येथे* ती ठेवली जात नाही." मी त्यांना सांगू शकत नाही किंवा ते तेथे हालवू शकत नाही. ते कशाही प्रकारे व्हायला पाहीजे. कोणीतरी ते घेऊन हालवायला हवे. आणि, प्रत्येक गोष्ट क्रमवार, तेव्हा ते प्रकट होऊ शकते.

21 म्हणून आता प्रार्थनेत राहा. आता, आपण त्या पुस्तकाकडे जाण्याअगोदर, आपण आपले मस्तक झुकवून, त्याच्याशी बोलूया.

22 प्रभू येशू, आम्ही पूर्णपणे अपूर्ण आहोत. आम्ही, कुठल्याही प्रकारे, ह्या अति पवित्र समयी जेव्हा आत्मे अंतिम ठिकाणी पोहचण्याकरिता टांगलेले आहे, प्रभू तुला विचारल्याशिवाय ह्या पवित्र पुस्तकाकडे जाण्याचा प्रयत्न करणार नाही, कारण तो एकच हे पुस्तक प्रकट करु शकतो की, त्याने आता पुढे यावे आणि त्याच्या दासाचे दुर्बल प्रयत्न आशीर्वादीत करावे.हे वचन पुढे जात असताना आशीर्वादीत कर. ते आत्म्याच्या सामर्थ्याने चालत राहावे.जे नितीमत्त्व समजण्यासाठी आणि देवाची इच्छा समजण्यासाठी भुकेलेले आणि तहानलेले आहेत त्यांच्या आत्मिक भुमीवर...ते पडो आणि त्या प्रकारे पुढे फळे देवो. प्रभू हे प्रदान करो. सर्व प्रशंसा तुलाच मिळो.ह्या वचनासाठी जे भुकेलेले आणि तहानलेले आहेत, त्यांना भोजन व पाणी मिळो. आम्ही येशूच्या नावात ज्याचे हे प्रकटीकरण आहे, मागतो; आमेन.

23 आता, आपण पाचव्या अध्यायाकडे वळण्यासाठी जात आहोत. आता, हे सात शिक्के नाहीत. तो मंडळीची युगे आणि सात शिक्के ह्यांमधील अंतर आहे. आता, तेथे सहावा अध्यायही आहे...

24 आणि प्रकटीकरणाच्या चौथ्या अध्यायात, काही गोष्टींचा खुलासा केला आहे. त्यात काही गोष्टी प्रगट केल्या आहेत ज्या कलीसीया वर उचलली गेल्यानंतर घडणार आहेत. प्रकटीकरणाच्या तिसऱ्या अध्यायात कलीसीया वर जाते आणि प्रकटीकरणाच्या 19व्या अध्यायापर्यंत परत येत नाही. पाहा? त्यामुळे मंडळी महासंकटाच्या काळात नसते. मला माहीत आहे की, हे आता पर्यंत भेट घेतलेल्या प्रत्येक शिक्षकाच्या मताविरुध्द आहे. परंतु माझा—माझा—माझा उद्देश असहमत होण्याचा नाही. मी—मी तुमचा भाऊ बनून राहू इच्छितो, परंतु जे मी—मी बघतो, तेच मला शिकवले पाहीजे. जर मी तसे करीत नाही, तर, ते मी एकत्रितरित्या मांडू शकत नाही, समजले? आणि आता, ती महासंकटाच्या अगोदर जावो अथवा नंतर जावो. कसेही असले, तरी मी तिच्याबरोबर वर जाऊ इच्छितो. तीच महत्त्वाची गोष्ट आहे.

25 म्हणून, त्या गोष्टी आपण—आपण फक्त गृहीत धरीत आहोत, कारण, शिक्षणाशिवाय, मी उदाहरणाद्वारे वचन समजावतो. मी पाहतो आणि ते—ते जुन्या करारात काय आहे किंवा काय होते समजून घेतो. जे नवीन करारात वास्तविकता किंवा छाया आहे, मग मला नविन करारात काय आहे, ह्याची कल्पना येते. पाहा?...जसेनोहा प्रलय येण्याअगोदर तारवात गेला, वास्तविकता पाहा; परंतु, नोहा तारवात जाण्याअगोदर, हनोख वर गेला, पाहा, काहीही घडण्याअगोदर. आणि सदोमात विपत्ती येण्याअगोदर,

सदोमाचा सर्वनाश होण्याअगोदर, लोटाला सदोमाबाहेर नेले गेले. परंतुअब्रहाम सर्व वेळेला सदोमाच्या बाहेरच होता. ह्या नमुन्यांना पाहा.

26 परंतु आता आपण पहिले वचन वाचूया. मी त्यांतील पहिली दोन किंवा तीन वचने वाचेन.

> *आणि 'जो राजासनावर बसलेला होता', त्याच्या उजव्या हातात 'पाठपोट लिहीलेली,' व सात शिक्के मारुन बंद केलेली पुस्तकाची एक गुंडाळी मी पाहीली.*
>
> *आणि गुंडाळीचे शिक्के फोडून ती उघडावयास कोण योग्य आहे, असे मोठ्याने पुकारणारा एक बलवान देवदूत मी पाहीला.*
>
> *तेव्हा स्वर्गात, पृथ्वीवर, किंवा पृथ्वीखाली कोणीही ती गुंडाळी उघडावयास किंवा तिच्यात पाहावयास समर्थ नव्हता.* (काय ते पुस्तक आहे!)
>
> *ही गुंडाळी उघडावयास, किंवा ते तिच्यात पाहावयास योग्य असा कोणी आढळला नाही, म्हणून मला फार रडू आले.*

27 आता, तू अपात्रतेविषयी बोलतो? "तिच्यात पहावयास समर्थ नव्हता; कोठेही, एकही मनुष्य, नव्हता."

> *आणि तेव्हा वडिल मंडळीपैकी एक जण मला म्हणाला, रडू नको, पाहा 'यहूदावंशाचा सिंह', 'दाविदाचा अंकूर' ह्याने जय मिळविला; म्हणून तो तिचे सात शिक्के फोडून ती उघडण्यास योग्य ठरला आहे.*
>
> *तेव्हा राजासन व चार प्राणी ह्यांच्यामध्ये आणि वडीलमंडळह्यांच्यामध्ये, ज्याचा जणू काय 'वध करण्यात आला होता; असा कोकरा उभा राहिलेला मी पाहीला; त्याला सात शिंगे व सात डोळे होते; ते सर्व पृथ्वीवर पाठविलेले देवाचे सात आत्मे आहेत.*
>
> *आणि त्याने जाऊन 'राजासनावर जो बसलेला' होता त्याच्या उजव्या हातातून ती गुंडाळी घेतली.*

28 आपण तेथे काही क्षणांसाठी थांबूया. प्रकटीकरण 5व्या अध्यायाच्या पहिल्या वचनापासून खाली सातव्या वचनापर्यंत वाचूया.

29 जर तुम्ही ते चिन्हांकीत करीत असाल, सात शिक्क्यांच्या पुस्तकाचे प्रकटीकरण, प्रकटीकरण 10 अध्यायात सात गर्जनांच्या वेळी झाले. आपण ह्या विषयात जाण्याआधी,तुम्हाला समजण्यासाठी काही क्षणासाठी, प्रकटीकरणाच्या 10 व्या अध्यायात वळूया. आता हे शेवटच्या काळासाठी आहे. म्हणून लक्षपूर्वक ऐका...

> *...मी आणखी एक बलवान देवदूत स्वर्गातून उतरताना पाहिला, तो मेघवेष्टित असून त्याच्या डोक्यावर...मेघधनुष्य होते...*

30 जर तुम्ही लक्ष देऊन पाहीले, तो ख्रिस्त आहे, पाहा कारण जुन्या करारात त्याला कराराचा देवदूत म्हणून संबोधण्यात आले होते. आणि आता तो यहूद्यांकडे थेट येत आहे, कारण मंडळी वर गेलेली आहे. समजले? हे बरोबर आहे?

> *...आणि त्याचे तोंड...सुर्यासारखे आणि त्याचे पाय अग्निस्तंभासरखे होते:*

31 तुम्हाला प्रकटीकरण 1 मधील दूत लक्षात आहे काय? तीच गोष्ट. दूत हा "संदेशवाहक" आहे. आणि तो इस्त्राएलाकरिता संदेशवाहक आहे. समजले? मंडळी

रुपांतरात गेलेली आहे, पाहा, आता, किंवा रुपांतर होण्याच्या बेतात गेलेली आहे. तो त्याच्या मंडळीसाठी येतो. आता लक्ष द्या.

*आणि त्याच्या हाती एक लहान उघडलेले पुस्तक होते:...*

32 आता, *येथे*, ते बंद होते आणि सिलबंद होते;...आणि *येथे* ते उघडलेले आहे. ते उघडले गेले आहे. शिक्का मारल्यापासून, आपण आज रात्री पाहणार आहोत, आता ते पुस्तक उघडलेले आहे. "एक लहानसे पुस्तक त्याच्या हाती, त्याच्या...ते उघडलेले होते. ओह सूर्य कशाप्रकारे अग्निस्तंभासारखा..." फक्त एक मिनिट थांबा. मला पुन्हा सुरुवात करु द्या आणि वाचा.

*आणि त्याच्या हाती एक उघडलेले लहानसे पुस्तक होते; त्याने आपला उजवा पाय समुद्रावर, व डावा पाय भुमीवर ठेवला,*

*आणि सिंहगर्जनेप्रमाणे* तो *मोठ्याने ओरडला...*

33 आपल्याला माहीत आहे तो यहूदा वंशाचा सिंह आहे. *येथे* तो कोंकरा आहे; परंतु *येथे* तो सिंह आहे. पाहिले?

*...आणि तो ओरडला, तेव्हा सात मेघगर्जनांनी आपआपले शब्द काढले.*

34 आता, योहानाला जे काही त्याने पाहीले ते लिहीण्याची कामगिरी सोपवण्यात आली, तसेच प्रेषित, आणि संदेष्टा, त्याने त्यांची लेखणी ते लिहीण्यासाठी उचलली.

*आणि त्या सात मेघगर्जनांनी शब्द काढले, तेव्हा मी लिहीणार होतो: इतक्यात स्वर्गातून झालेली वाणी मी ऐकली, ती म्हणाली, सात मेघगर्जनांनी काढलेले शब्द गुप्त ठेवते लिहू नको.*

35 आता, तेच आपल्याला ठाऊक नाही. ते अजूनही प्रकट व्हायचे आहे. जे काही त्यांना गर्जनांनी सांगितले, ते पवित्र शास्त्रात नाही.

*आणि ज्या देवदूताला समुद्रावर व भुमीवर उभे राहीलेले मी पाहीले, त्याने आपला उजवा* हात *स्वर्गाकडे वर केला.* (आता लक्षपूर्वक ऐका)

*आणि जो युगानुयुग जीवंत आहे. ज्याने* आकाश *व त्यात जे आहे ते, पृथ्वी व तिच्यावर जे आहे ते आणि समुद्र व त्यांत जे आहे ते निर्माण केले. त्याची शपथ वाहून म्हटले,...आणखी अवकाश लागणार नाही.*

36 पाहा! येथे ते वचन आहे, ज्याकडे मी लक्ष वेधू इच्छितो.

*तर सातव्या देवदूताची वाणी होईल त्या दिवसात म्हणजे तो देवदूत कर्णा वाजविण्याच्या बेतात असेल, तेव्हा देवाने आपले दास संदेष्टेह्यास सुवार्ता* सांगितली, *तद्नुसार त्यांचे गूज पूर्ण होईल.*

37 आता, पाहा, जेव्हा सातव्या मंडळीचा दूत संदेश देण्याच्या बेतात असेल, तेव्हा सातव्या शिक्क्याच्या पुस्तकाचे रहस्य प्रकट केले जाईल. पाहिले? "सातवा दूत वाणी देण्यास सुरुवात करील," आणि तेथे संदेश लिहीलेले आहेत आणि आपल्याकडे ते टेप आणि पुस्तकाच्या रुपात आहे. आता, "कर्णा वाजविण्याच्या बेतात असेल, देवाचे गूज पूर्ण झाले पाहीजे. पाहा, त्या वेळेस." आता आपण लक्ष देऊ या. देवाच्या गूजाचे पुस्तक, प्रकट केले जात नाही, जोपर्यंत सातव्या दूताची वाणी होत नाही.

38 आता, हे मुद्दे ह्या शिक्क्यांमध्ये महत्त्वाचे असतील, अशी मला खात्री वाटते, कारण ते संपूर्ण, एकत्र जोडले पाहीजे.

39 आता, ते रहस्यमय रितीने लिहीलेले आहे. कारण कोणत्याही मनुष्याला, कोठेहीते ठाऊक नाही. 'देवच फक्त', येशू ख्रिस्तच ते जाणतो. पाहा. आता, परंतु आहे...ते एक रहस्यमय पुस्तक आहे. ते मुक्तीचे पुस्तक आहे. आपण थोड्याच वेळात, त्याकडे जाणार आहोत आणि आता आपल्याला माहीत आह की, हे मुक्तीचे पुस्तक सविस्तरपणे समजणार नाही; मागील सहा मंडळीच्या युगात ह्या पुस्तकाची कसून तपासणी करण्यात आली आहे. परंतु शेवटच्या काळी, जेव्हा सातव्या दूताने त्याचे गूज सांगण्यास आरंभ केला, तेव्हा त्याने त्या सर्व कमतरता पूर्ण केल्या ज्याची ह्या लोकांनी कसून चौकशी केली होती. आणि गूजे परमेश्वरापासून, परमेश्वराच्या वचनाच्या रुपात येतात, आणि देवाचे सर्व प्रकटीकरण प्रकट करतात, नंतरच देवत्व आणि सर्व इतर गोष्टी कायम होतात. सर्व गूजे, सर्प वंश, आणि अशा अनेक गोष्टी प्रकट होतात.

40 आता, तुम्ही पाहा, मीच त्या गोष्टी उंच करीत नाही. तेच काय...ते 'प्रभू परमेश्वर म्हणतो'आहे. मी ते पुस्तकातून वाचून दाखवीन, "तर सातव्या देवदूताची वाणी होईल त्या दिवसात म्हणजे देवदूत कर्णा वाजविण्याच्या बेतात असेल, तेव्हा देवाने 'आपले दास संदेष्टे', ह्यास सुवार्ता सांगितली, तद्वनुसार त्याचे गूज पूर्ण होईल." ते संदेष्टे आहेत ज्यांनी हे वचन लिहीले आहे.सातव्या मंडळीच्या युगात, शेवटच्या युगात, वाणी होत असताना, सर्व कमी घटी, ज्याची ह्या मंडळीच्या युगात कसून चौकशी करण्यात आली, सर्व एकत्र संपुष्टात येतील.

41 आणि जेव्हा शिक्के फोडले गेले, आणि गूज प्रकट केले गेले, तेव्हा बलवान दूत, संदेशवाहक, ख्रिस्त खाली उतरला, त्याने आपला एक पाय भूमिवर आणि दूसरा पाय समुद्रावर ठेवला, त्याच्या डोक्यावर मेघधनुष्य होते. आता, लक्षात घ्या, हा सातवा दूत ह्या प्रभूच्या येण्याच्या समयी पृथ्वीवर आहे.

42 ज्याप्रमाणे योहान त्याचा संदेश देत होता, त्याच वेळेला त्या दिवसात मसिहा आला. योहानाला माहित होते. तो त्याला पाहील, कारण तोच त्याची ओळख करुन देणार होता.

43 आणि वचनात, मलाखी 4 मध्ये आपल्याला कळते की, तेथे योहानासारखा एक असेल. एक—एकएलिया ज्याकडे देवाचे वचन येईल. आणि तोच पवित्र आत्म्याद्वारे देवाची सर्व गूजे प्रकट करणार आहे. आणि पुत्रांचा विश्वास प्रेषितीय वडीलांच्या विश्वासाकडे वळवील, सर्व गूजे ज्यांची ह्या संप्रदायाच्या वर्षात कसून चौकशी करण्यात आली त्यांची पुर्नरचना करील. आता तेच वचन सांगत आहे. ते जे सांगितले आहे, ज्यासाठीमी जबाबदार आहे. पाहा? ते, लिहीलेले आहे, तेच बरोबर आहे. तेच ते आहे.

44 आता, आपण पाहतो की, हे सात—शिक्क्याचे पुस्तक, आता, मुक्तीचे रहस्य आहे. ते देवाकडून आलेले, मुक्तीचे पुस्तक आहे.

45 आता, सातव्या देवदूताची वाणी होईल, त्या दिवसात, सर्व गूजे पूर्ण झाली पाहीजेत. आता, *येथे* पृथ्वीवर तो देवदूत आहे; आणि "दूसरा" देवदूत, बलवान देवदूत, खाली आला. पाहा, *हा* दूत पृथ्वीवरील दूत होता. संदेशवाहक; परंतु *येथे* एक येतो, जो स्वर्गातून खाली येतो, एक मेघ धनुष्याचा करार, पाहा तो फक्त ख्रिस्तच असू शकतो.

46 अगदी, तसाच ज्याप्रमाणे प्रकटीकरण, 1ल्या अध्यायात तो होता. "सात सोन्याच्या समयाच्या मध्यभागी मेघधनुष्यासहीत उभा आहे. दिसण्यात यास्फे आणि सार्दि ह्या रत्नासारखा होता."

47 आणि येथे तो पुन्हा येतो, 10व्या अध्यायात त्या येण्याच्या समयानंतर जेव्हा सर्व गूजे पूर्ण होणार आहेत आणि शिक्के फोडण्यात येणार आहेत, आणि ही घोषणा होणार आहे. "आता आणखी उशीर होणार नाही." आणि तो म्हणतो, "जेव्हा सातवा देवदूत

कर्णा वाजविण्याच्या बेतात असेल, तेव्हा त्याचे गूज पुर्ण झाले पाहीजेत. आणि तीच वेळस्वर्गदूत प्रकट होण्याची आहे." हे खरे आहे की, आपण त्याच्या कुठेतरी जवळपास आलो आहोत. आता लक्ष दया.

48 सात शिक्क्यांमध्ये त्या पुस्तकाचे रहस्य दडलेले आहे. जो पर्यंत आपण त्या सात शिक्क्यांमध्ये काय सीलबंद केले आहे. ते पाहू शकतो, आपण फक्त त्या गोष्टींची, कल्पना करु शकतो. कारण जसे, ह्या सकाळच्या, माझ्या लहान संदेशात 'देव साधेपणात लपला आहे, मी तुम्हाला सांगितले आहे, आपण—आपण...निश्चितच ह्या गोष्टी चुकवू शकतो. जो पर्यंत त्या संपूर्णपणे, खरेपणाने पवित्र आत्म्याद्वारे प्रकट आणि प्रमाणित होत नाही. पाहा? जर कोणी संदेष्टा उठतो, आणि तुम्हाला सांगतो की, ते तसेच आहे आणि देव त्यास प्रमाणित करीत नाही, तर ते तुम्ही विसरुन जा. पाहिले? परंतु देवाला प्रत्येक वाक्यात, सर्व गोष्टीत ते बरोबर करण्यासाठी, प्रमाणित करावे लागेल. समजले? म्हणून, त्याची लेकरे त्या गोष्टी पाहतील. पाहा आणि जागृत राहतील. लक्ष द्या.

49 सात शिक्क्यांच्या पुस्तकावर लक्ष द्या,...ह्या सात शिक्क्यांमध्ये हे पुस्तक सीलबंद आहे, समजले? हे पुस्तक पूर्णपणे सीलबंद आहे. तुम्हाला हे समजते काय? (मंडळी म्हणते, "आमेन") हे पुस्तक सात शिक्क्यांनी सीलबंद आहे. आता ते सात गर्जनांहून वेगळे आहे. समजले? ते त्या पुस्तकावरील सात शिक्के आहेत आणि ते पुस्तक, ते शिक्के जाहीर केले जाणार नाहीत. जोपर्यंत सातवा दूत संदेश देत नाही. समजते? म्हणून आपण—आपण गृहीत धरीत आहोत; परंतु खरे देवाचे प्रकटीकरण परिपूर्ण केले जाईल, जेव्हा ती वाणी होईल. सत्य प्रकट केले जाईल. आता, तेच वचन सांगत आहे. "त्या दिवसात गूजे पूर्ण झाली पाहीजे."

50 आणि लक्षात घ्या. प्रकटीकरणाच्या 5व्या अध्यायात येथे हे सात शिक्क्यांचे पुस्तक बंद होते, आणि प्रकटीकरणाच्या दहाव्या अध्यायात ते उघडले जाते.

51 आणि आता आपण पाहणार आहोत की, ते पुस्तक कसे उघडले गेले, ह्या विषयी काय सांगत आहे. आणि जोपर्यंत तो कोकरा ते पुस्तक घेत नाही आणि शिक्के फोडत नाही, तोपर्यंत ते ज्ञात केले जात नाही. आणि ते पुस्तक उघडत नाही. समजले? कोकऱ्याला ते पुस्तक घ्यावे लागेल.

52 ते गुप्त आहे. आता, लक्षात घ्या,"स्वर्गात कोणी मनुष्य नाही, पृथ्वीवर कोणी मनुष्य नाही," पोप, बिशप, कार्डिनल, राज्यातील प्रेसबिटर किंवा तो कोणीही असो, "ते शिक्के फोडू शकत नाही किंवा ते पुस्तक प्रकट करु शकत नाही. परंतु तो कोकरा." आणि आपण कसून तपासणी केली आहे, गृहीत धरले आहे आणि अडखळलो आणि आश्चर्यचकित झालो आहे आणि—आणि तेच कारण आहे. आपण सर्व अशा गोंधळात आहोत.

53 परंतु ह्या दैवी अभिवचनामुळे की, हे मुक्तीचे पुस्तक संपूर्णपणे त्या कोकऱ्याद्वारे उघडले जाईल. आणि त्यांतील शिक्के त्या शेवटच्या दिवसांत ज्यांत आपण राहत आहोत, आता मोकळे केले जातील. आणि ते ज्ञात केले जाणार नाही. जोपर्यंत कोकरा ते पुस्तक घेत नाही आणि शिक्के फोडीत नाही. कारण लक्षात घ्या, ते पुस्तक त्या कोकऱ्याच्या हातात होते आणि जो सिंहासनावर बसला होता. "आणि तो कोकरा त्याच्याकडे आला जो राजासनावर बसलेला होता आणि त्याच्या उजव्या हातातून ते पुस्तक घेतले." ते पुस्तक घेतले आहे! ओह, ते गहन आहे. आपण पवित्र आत्म्याच्या साहाय्याने, ते समजण्याचा प्रयत्न करुया. आता आपण त्याच्यावर अवलंबून आहोत. आणि आपण नंतर पाहू, जेव्हा, अंत समयी "जेव्हा वेळ निघून गेलेली आहे."

54 कुठल्याही संप्रदायास ह्या पुस्तकाचा अनुवाद करण्याचा अधिकार नाही. कोणत्याही मनुष्याला त्याचा अनुवाद करण्याचा अधिकार नाही. तो कोकराच आहे, जो त्याचा अर्थ सांगतो. आणि तो कोकराच आहे जो ते बोलतो. आणि तो कोकराच जो ते वचन शाबित करण्याद्वारे आणि त्या वचनाला जीवनाकडे आणण्याद्वारे ज्ञात करुन देतो. पाहिले? अगदी बरोबर! लक्ष द्या! आणि ते प्रकट केले जात नाही जोपर्यंत…

55 जो पर्यंत मंडळीची युगे आणि संप्रदायाची युगे समाप्त होत नाही, तोपर्यंत हे पुस्तक प्रकट केले जात नाही. "आता आणखी समय उरला नाही." ते पाहा? ते तेव्हाच प्रकट होते, जेव्हा मंडळीची युगे आणि संप्रदायाची युगे समाप्त होतात.

56 तेच कारण आहे की, आज रात्री त्या गोष्टी इतक्या गोंधळात आहेत पाहा, त्यांनी लहानसा सिध्दांत घेतला आहे आणि ते *येथे* एका बाजूला झाले आहे; म्हणतात, "हे तेच आहे." दुसऱ्या कोणी दुसरा सिध्दांत घेतला, *ह्या* बाजूला झाले, म्हणतात, "हे तेच आहे!" आणि प्रत्येक जण त्याच्याखाली एक संप्रदाय बनवित आहे. ज्यामुळे आपल्याकडे शेकडो संप्रदाय आहेत. तरी परंतु ह्या सर्वांमध्ये, हा गोंधळपाहून, लोकं आश्चर्य करीत आहे. "सत्य काय आहे?" काय ही आजची स्थिती नाही का!

57 परंतु तो अभिवचन देतो की, "जेव्हा तो समय समाप्त होईल, तेथे सातव्या देवदूताची वाणी होईल, आणि नंतर पाहा, त्या वेळेस, हे पुस्तक उघडले जाईल."

58 आता, कोणीही असे म्हणू नका, "ते लोक जे मागील समयात होते ते वाचले नाहीत."

59 परंतु, ती गुजे, ते समजू शकणार नाहीत! देव त्रैक्यात कसे असू शकतो आणि, तरीही, एक! वचन कसे सांगू शकते. "पिता, पुत्र, पवित्र आत्म्याच्या नावात बाप्तिस्मा घ्या." आणि बदलते आणि सांगते, "येशूच्या नावात बाप्तिस्मा घ्या." पाहा? ओह, कित्येक गोष्टी! हव्वेने फळकसे खाल्ले आणि संपूर्ण जगाचा नाश कसा केला. पाहा ह्या गोष्टी अशा कशा असू शकतील? परंतु ती गूजे अंतिम समयात प्रकट करण्याचे अभिवचन दिले आहे.

60 ह्या त्या छोट्या, कमतरता आहेत. ज्या…हे महान योध्दे दृश्यात आले, जसे आयरेनियस, आणि मार्टिन, संत मार्टिन आणि पोलिकार्प आणि वेगवेगळे, आणि लुथर आणि वेस्ली आणि ते सर्व. पाहा? ते कशा प्रकारे उदयास आले आणि थोड्या समयासाठी राहीले की—प्रकाश आणू आणि तो चमकावा, परंतु कित्येक गोष्टी त्यांनी अंधकारात ठेवल्या. त्याबरोबर पेंटीकॉस्टल युग आले, तसेच लुथरन युग आणि ते पायावर धावले. तरी परंतु, ठीक—आहे, मी असे म्हणत नाही की, ते बरोबर नव्हते, ते होते, परंतु तेथे कमतरता होत्या. ज्या समजावता येत नाही. परंतु नंतर…का? शिक्के का फोडले गेले नाही, सविस्तरपणे प्रगट करण्यासाठीकी, त्या गोष्टी काय आहेत, पाहा?

61 परंतु मग, शेवटच्या युगात, ही सर्व गूजे प्रकट केली जातील. आणि सोपवली जातील आणि ते शिक्के कोकऱ्याद्वारे उघडले जातील, आणि कलीसियास प्रकट केले जातील आणि नंतर आणखी समय उरणार नाही, पाहिले? किती अद्भूत आहे! मग, ते पुस्तक नंतर ते मुक्तीचे पुस्तक आहे, नंतर ती पुढे जाते.

62 आणि आपण आत घेतले जाऊ, नंतर, एकशे चव्वेचाळीस हजार आत घेतले जातील, आणि अशाच प्रकारे. ते यहूदी आहेत.

63 आता, आता, पौल. आपण थोडेसे वाचूया. माझ्याकडे काही ती पवित्र वचने आहेत, आणि मला वाटते आपण ती—ती वाचली पाहीजे. आता आपणसर्व, इफिसकरांस पौलाचे पत्र;1ल्या अध्यायाकडे वळूया.

64 मी बघत आहे, कित्येक जण लिहीत आहेत. त्यांच्याकडे त्यांची पुस्तके आहेत आणि ही वचने ते लिहून घेत आहेत, त्यांच्या बायबलमध्ये चिन्हांकीत करीत आहेत, ह्यासाठी एक शृखला व्हावी. म्हणून, ते—ते चांगले आहे. तुम्ही ते करीता म्हणून मला ते आवडते, आणि मग घरी जाता आणि त्याचा अभ्यास करता. पाहा? आणि—आणि जर त्याचा तुम्ही स्वतःहून, अभ्यास करता, तर तुम्हाला—तुम्हाला ते अधिक चांगल्या प्रकारे समजते. पाहिले? फक्त त्याचा अभ्यास करा, आणि देवाकडे तुमच्यासाठी हे समजण्यासाठी साहाय्य मागा.

65 आता आपण एक—एकवचन वाचूया. माझ्याकडे येथे लिहीलेले आहे. आता, इफिसकरास पत्र 1:13 आणि 14

*तुम्हीही सत्याचे वचन म्हणजे तुमच्या तारणाविषयीची सुवार्ता ऐकून घेतल्यानंतर त्याच्यावर विश्वास ठेवला...आणि त्याने देऊ केलेल्या पवित्र आत्म्याचा तुम्हावर त्याच्याठायी शिक्का मारण्यात आला आहे.*

*देवाच्या गौरवाची स्तुती व्हावी म्हणून, त्याच्या स्वकीय जनांच्या, खंडणी भरुन मिळविलेल्या मुक्तीसाठी हा पवित्र आत्मा आपल्या वतनाचा सार आहे.*

समजले?

66 आता, आपण वचने उघडली आहेत, आपण...पाहूया. येथे पवित्र आत्मा, हाच स्वतः, एक शिक्का आहे. पवित्र आत्मा एक शिक्का आहे. आणि शिक्का दाखवितो (काय?) हे काम पूर्ण झालेले आहे, हा पवित्र आत्मा हा व्यक्तीला मारलेला शिक्का आहे. त्या व्यक्तीला जेव्हा त्याला पवित्र आत्मा मिळतो, तेव्हा त्याचा कण्हण्याचा समय संपतो, पाहा, कारण ते काम पूर्ण झाले आहे.

67 जसे, मी रेलरोड कंपनीसाठी काम करीत असे, आणि आम्ही वजन उचलणाऱ्या मोठ्या गाड्यामध्ये डब्बे. आणि डब्ब्याच्या कारखान्यातील इतर गोष्टी भरत असू. आणि परंतु मग त्या गाडीला सीलबंद करण्या अगोदर, निरिक्षक तेथे यायचा. हे पाहण्यासाठी की ती गाडी मालाने व्यवस्थित भरलेली आहे की नाही. जर नाही. (भाऊ ब्रॅन्हम त्यांच्या हाताने पुन्हा एकत्र टाळी वाजवितात.) प्रथम त्यास कशाने तरी ठोकले जाते. जर माल विखरला किंवा फुटला आणि आणि रेल रोड कंपनी त्यासाठी जबाबदार ठरते. आणि तो निरिक्षक सर्व गोष्टीची परिक्षा करतो. हे पाहण्यासाठी की ते व्यवस्थित ठेवलेले आहे. जर ते तसे नाही, तर तो त्या गाडीला नापसंती दर्शवितो. मग आपल्याला ते सर्व पुन्हा करावे लागते, जो पर्यंत त्या निरिक्षकाचे समाधान होत नाही. आणि जेव्हा निरिक्षकाचे समाधान होते. तो दरवाजा बंद करतो आणि निरिक्षक त्यावर शिक्का मारतो, आणि नंतर हा शिक्का कोणीही तोडू शकत नाही. जो पर्यंत तो अंतिम स्थळी पोहचत नाही.

68 तेच कार्य पवित्र आत्मा करीत आहे. पाहा? तो जातो आणि तो निरिक्षण करतो? तेच कारण आहे, तुमच्याकडे ह्या गोष्टी नसतात. आणि, तुम्ही म्हणता, "मी निरनिराळ्या भाषा बोलतो, आणि मी ओरडतो, आणि मी आत्म्यामध्ये नाचतो?" त्याचा त्याच्याशी काही संबंध नसतो. समजले? त्याचे पूर्णपणे समाधान होईपर्यंत आणि ओळख होईपर्यंत की ते तेच आहेत, पवित्र आत्मा त्या व्यक्तीचे परिक्षण करतो.

69 मग त्यांना त्यांच्या सार्वकालिक मुक्कामासाठी शिक्का मारण्यात येतो. तो शिक्का कोणीही फोडू शकत नाही. पवित्र शास्त्र...तुम्ही वचनाची तुमच्याकडे टिप्पणी करीत आहात. इफिसकरास पत्र 4:30 म्हणते, "देवाच्या पवित्र आत्म्याला खिन्न करु नका, खंडणी भरुन प्राप्त केलेल्या मुक्तीच्या दिवसापर्यंत तुम्ही त्या आत्म्याच्या योगे मुद्रीत झाला आहा." त्या शब्दाकडे लक्ष केंद्रीत करा, "मुक्ती" पाहा. त्या दिवसापर्यंत जेव्हा मुक्तीचे

पुस्तक प्रकट केले जाईल. आणि मुक्तीदाता त्याच्या वतनावर दावा करण्यासाठी येईल! कोणीच काहीही करु शकत नाही. पाहिले? "त्याला खिन्न करु नका." वचनात...राहा. त्या गोष्टी करा, ज्याद्वारे देवाला संतोष होतो, कारण आता ते पुस्तक सील बंद आहे आणि तुम्हीही मुद्रीत केलेले आहात. पवित्र आत्माच स्वतः शिक्का आहे.

70 *शिक्का* दर्शवितो...आता हे शब्द मला शब्दकोशांतून मिळाले. *शिक्का* एक "पूर्ण कार्य." दर्शवितो. आणि सातवा शिक्का फोडला जातो, देवाचे गूज जे ह्या रहस्यमय शिक्क्यात सिलबंद केले होते. त्या दिवसापर्यंत जेव्हा तो शिक्का फोडला जातो आणि नंतर जे त्यामध्ये आहे, ते प्रकट केले जाते.

71 जर कोणी मनुष्य आश्चर्य करीत आहे की, त्या माल वाहू गाडीत काय आहे? म्हणतो, "त्यात *अमुक-अमुक* गोष्टी असल्या पाहिजे. तेथे ते असायला पाहिजे." तो गृहीत धरीत आहे. परंतु जेव्हा तो शिक्का फोडला जातो, आणि दरवाजा उघडला जातो, तेव्हा आपल्याला त्यात पाहायला मिळते की, नक्की तेथे काय आहे.

तुम्हाला ते समजले? आणि ते फक्त अंतिम समयात केले जाईल.

72 दुसरी गोष्ट जी शिक्का दर्शवितो, तो "मालकी हक्क" आहे. जेव्हा तुम्हाला येशू ख्रिस्ताच्या रक्ताद्वारे विकत घेतले आहे आणि पवित्र आत्म्याने मुद्रीत केले आहे. तुम्ही ह्यापुढे ह्या जगाचे किंवा जगातील कोणत्याही गोष्टीशी तुमचे नाते नाही, तुम्ही देवाच्या मालकीचे आहात.

73 आणखी एक गोष्ट, शिक्का दर्शवितो "सुरक्षितता" आहे. शिक्का म्हणजे तुम्ही सुरक्षित आहा. आता, तुम्ही जे सार्वकालिक सुरक्षिततेवर विश्वास ठेवित नाही, मला माहीत नाही, पाहा, परंतु शिक्का हा अंतिम स्थळी पोहचेपर्यंत सुरक्षितता दर्शवितो. त्यांना हाय हाय जे तो शिक्का फोडण्याचा प्रयत्न करतील! आणि पवित्र आत्मा हा शिक्का फोडता येत नाही.

74 तुम्ही सर्वांनी मला असे बोलताना ऐकले आहे की, लोक म्हणतात "सैतानाने मला हे करण्यास भाग पाडले," नाही, नाही. हे सैतानाने केले नाही. तुमच्यावर शिक्का मारण्यात आला नव्हता.कारण, जेव्हा तुमच्यावर शिक्का मारलेला असतो, त्याला बाहेर काढलेले असते. होय. पाहिले? आता, तुम्ही त्याच्याकडे जाता. ओह, तो तुमच्यामध्ये येऊ शकत नाही. कारण तुमच्यामध्ये येण्याचा एकच मार्ग आहे. ज्याद्वारे तुम्ही आला आहाता. त्याला वाचावे लागेल. पवित्रीकरण आणि पवित्र आत्म्याने पूर्ण व्हावे लागेल, मगच तो तुमचा भाऊ होतो. म्हणून, तुम्हाला समजले, तो—तोते करीत नाही. नाही, नाही. तुम्ही फक्त सीमारेषेपर्यंत जाता आणि परत येता. जगातील गोष्टींची अभिलाषा धरता. तुम्ही यार्देन पार करुन कनानात कधीच गेला नाही. तुमचा मृत्यु झाला पाहिजे. पाहिले?

75 आता लक्ष द्या, आता, हे पुस्तक मुद्रीत आहे. आणि—आणि तुम्हीही ह्या पुस्तकाबरोबर, मुक्तीच्या दिवसाबरोबर मुद्रीत आहात.

76 पुन्हा, रोमकरांस पत्रामध्ये 8:22 आणि 23 मध्ये. आपण त्यांकडे जाऊया. आणि आपण ही पार्श्वभूमी देऊया. तरच मला वाटते. आपण जरा हे अधिक चांगल्या तर्हेने समजू. जर प्रत्येक जण हे त्यांच्यासाठी वाचेल. मी येथे तुम्हाला काही शास्त्रलेख देत आहे, ह्यासाठी की आपण—आपण त्याकडे पाहू शकू. आणि जेव्हा आपल्याकडे अधिक समय आहे. आता रोमन 8:22 पासून सुरु करुया,

*कारण आपल्याला ठाऊक आहे की, संबंध सृष्टी आजपर्यंत कण्हत आहे व वेदना भोगीत आहे.*

*इतकेच केवळनव्हे, तर ज्या आपणाला आत्मा हे प्रथम फळमिळाले आहे ते आपणही स्वतः दत्तकपणाची म्हणजे आपल्या शरीराच्या मुक्तीची वाट पाहत असता आपल्या ठायी कण्हत आहो.*

77 ओह, बाप रे! ओह बाप रे! काय हे आम्हा वृध्द जनांना आनंदाची अनुभूती करुन देत नाही? जे त्या समयाची वाट पाहत आहे. त्या आम्हा सर्वांना ते आनंदाची अनुभूती देते. आम्हाला समजते हे पहिल्या पुनरुत्थानाच्या वेळी घडेल. पाहा? सृष्टी कण्हत आहे, आपण कण्हत आहोत, सर्वकाही कण्हत आहे, कारण आपल्याला अनुभव येत आहे की, तेथे काहीतरी बरोबर नाही. आणि एकच मार्ग आहे की तुम्ही कण्हू शकता, आणि वाट पाहू शकता, कारण *तेथे* एक नविन जीवन येणार आहे, जे नवीन जगाविषयी बोलते.

78 ज्याप्रमाणे माझी पत्नी येथे आहे, खुप वेळझाला नाही, आम्ही एका सुपर मार्केटमध्ये गेलो होतो. आणि मी म्हणालो, "आम्हाला एक विचित्र गोष्ट सापडली; एका स्त्रीने एक पोषाख घातला होता." आणि पाहा, तो इतका विचित्र होता. ते...ते सर्व जे जवळजवळनिवस्त्र होते, तुम्ही पाहीले. आणि कसेही असो, त्या विसराळू होत्या. त्या कपड्याविना बाहेर गेल्या. म्हणून मग आम्ही...ह्या जाणूनबुझून विसराळू झाल्या होत्या.

79 आणि म्हणून, नंतर, मेडा मला म्हणाली, ती म्हणाली, "बील, ते असे का आहे?" ती म्हणाली.

80 "ओह," मी म्हणालो, "तो केवळराष्ट्राचा आत्मा आहे?" आणि मी म्हणालो, "जेव्हा तुम्ही जर्मनीला जाता, त्याच्याकडे एक निश्चित आत्मा असतो. फिनलँडला गलो, त्यांच्याकडे त्या देशाचा आत्मा आहे. तुम्ही अमेरिकेत येता, आपल्याकडे ह्या देशाचा आत्मा आहे."

81 आपल्या देशाचा आत्मा मौज, विनोदाचा आहे. तुम्हाला माहित आहे का? आपली स्थापना प्रेषितांच्या सिध्दांतावर केली आहे. आपली स्थापना वॉशिंग्टन, लिंकन ह्यासारख्या थोर पुरुषाच्या पुढारीपणावर झाली आहे. परंतु आपण त्या पायापासून ढळलो आहोत. आणि आपल्याला माहीत आहे की, आपण ह्याप्रकारे चालत आलो आहोत, आपल्याला माहीत आहे की, अणू बॉम्बवर आमचे नाव लिहीलेले आहे. आपल्याला माहीत आहे की, आपल्यापुढे गुलामगिरी ठेविली आहे. स्वतःला फसवण्याची मुळीच गरज नाही.

82 हे मला, काही विनोदी जनांची आठवण करुन देते, ते खाली जात आहेत आणि— आणि विनोद सांगत आहेत आणि ते सांगत जात आहेत, आणि स्त्रीया त्यांना हवे तसे वागत आहेत आणि पुरुषही त्यांच्या बरोबर, आणि हे मला त्या लहान मुलाची आठवण करुन देते, जो कब्रस्तानात शिटी वाजवत जात आहे, आणि आपल्याला तो विश्वास ठेवण्यास सांगायचा प्रयत्न करीत आहे की, तो घाबरलेला नाही. निश्चितच, तो घाबरला आहे. समजले? तो कोणालाही मुर्ख बनवू शकत नाही. हेच कारण आहे, तो शिटी वाजवत आहे. पाहा, तो सांगण्याचा प्रयत्न करीत आहे की, तो घाबरत नाही, परंतु तो घाबरलेला आहे. आणि तीच आज परिस्थिती आहे.

83 परंतु, ओह, विश्वासणार्यांसाठी किती पवित्र आशा आहे की, ज्यांनी आपले हात वर उचलले आहेत, कारण आपला मुक्तीचा समय जवळआला आहे. जेव्हा तो ह्या गोष्टी पाहत आहे, विश्वासणार्यांसाठी तो एक महान समय आहे.

84 आता, ह्या गोष्टी, आपल्याठायी कण्हत आहेत. तुम्ही कधी झाडाचे निरिक्षण केले आहे, ते कसे जीवनासाठी संघर्ष करीत असते? जगण्याची त्याची इच्छा असते. आणि तुम्ही पशुंना न्याहाळा, कसे मृत्युमध्ये, ते संघर्ष करितात. तुम्ही मनुष्याला पाहिले, सर्व

काही, सृष्टी कण्हत आहे. आपण आपल्याठायी कण्हत आहोत. पाहिले? आपल्याला ठाऊक आहे.काहितरी चुकीचे आहे. आपण, ह्या वचनातून पाहतो की काहीतरी हरवले आहे. दोघांसाठी मनुष्य आणि पृथ्वी सर्व प्रकारची निर्मिती, काहीतरी हरवले आहे. जे आपण ह्या प्रेरित वचनातून पाहत आहोत. की काही कारणास्तव कण्हत आहे. तुम्ही काही कारण असल्याखेरिज कण्हत नाही.

जसे मी शाईविषयी बोललो होतो, त्याचे एक कारण आहे.

85 तोच मार्ग आजाऱ्यासाठी प्रार्थना करताना आहे; जोपर्यंत तुम्हाला कारण सापडत नाही! मला उपाय माहीत आहे, मला कारण शोधावे लागेल. म्हणूनच दृष्टांतांची इतकी गरज आणि महत्त्व आहे; तो हृदयातील गुप्त गोष्टी प्रकट करतो, त्या व्यक्तीला सांगतो की, त्याने त्याची चुक कुठे केली आहे. आणि त्याने काय करावे, समजले? ह्यांच्याशी काही कर्तव्य नाही. की तुम्ही किती औषध घेता, किंवा किती तेल तुम्ही त्यांच्या डोक्यावर ओतले आहे, किंवा किती जोराने तुमच्यावर कोणी किंचाळले आहे. जर तेथे काही चुकीचे आहे, तर तो तेथेच पडून राहील. मी म्हणतो, “तो,”तो सैतान आहे.

86 पाहा, आज, आपण जितके औषधांमध्ये आधुनिक आहोत, आपल्याला ह्या गोष्टींविषयी अजूनही ठाऊक नाही. तुम्ही म्हणता, “त्याला कर्करोग झाला आहे.” काही नाही, ते, ते—ते तर केवळत्याचे नाव आहे. ते चिकित्सा विज्ञानने दिलेले ते नाव आहे. कॅन्सर. परंतुह्याच्याशी त्याचे काही देणे घेणे नाही. ते केवळएक नाव आहे, ज्याने त्याला आपण पुकारतो. आपण फक्त त्याचे नाव पुकारतो, कॅन्सर. परंतु, वास्तवात, ते काय आहे, त्याचे विश्लेषण करा. तो एक दुष्ट आत्मा आहे.

87 आता आपण म्हणतो, “पाप.” आपण केवळत्यास संबोधतो पाप. विश्लेषण करा. पाप काय आहे? बहुतेक लोक सांगतात. “दारु पिणे, व्यभिचार करणे.” नाही, नाही. ते पापाचे गुणधर्म आहे. पाहा? ते हे आहे जे पाप उत्पन्न करते, परंतु खरे पाप तर अविश्वास आहे. हेच ते आहे—ज्याचे पाप नाव आहे आणि ज्यास पाप म्हटले जाते, जर तुम्ही एक विश्वासी आहात. तुम्ही ह्या गोष्टी करीत नाही, परंतु ह्याचे काही महत्त्व नाही, की तुम्ही स्वतःला किती पवित्र करता आणि किती धार्मिक बनवता. प्रवचन करता, जर तुम्ही ह्या गोष्टी करता, तर तुम्ही अविश्वासी आहात. ते बायबलवर आधारित आहे.

88 आता, काहीतरी हरवले आहे आणि ते कण्हत आहे. ते त्याच्या मुळच्या अवस्थेत, मागे परत जाण्याचा प्रयत्न करीत आहेत.

89 काय तुम्ही कल्पना करु शकता की, कोणीतरी पृथ्वीवरुन खाली खोल खड्ड्यातपडले आहे आणि ते संघर्ष करीत आहे, वर चढत आहे, स्वतःला ओढत आहे? त्यांना कशाही प्रकारे ह्या खड्ड्यातून बाहेर निघाले पाहीजे. ते त्यांच्या मुळस्थितीत नाहीत आणि ते वेडेपिसे होऊन किंचाळत आहेत. ते भिंतीवर ओरबाडत आहेत, आरडाओरडा करीत आहेत, किंवा काहीतरी करीत आहेत.ते—ते कण्हत आहेत कारण ते त्यांच्या मुळस्थितीत परत जाऊ इच्छितात.

90 ते कारण आहे, मनुष्यावर आजार, वेदना, आणि दुखणे एकेकाळी ते तसे नव्हते, परंतु आज ते कण्हत आहेत का? ते बरोबर नाहीत.काहीतरी चुकीचे आहे. आणि ते कण्हत आहेत, आणि ते तेथे परत जाण्याचा प्रयत्न करीत आहेत. जेथे त्यांच्याकडे आरोग्य होते.

91 आणि जेव्हा सृष्टी आणि लोक, ज्या प्रमाणे बायबल सांगते, “कण्हत आहेत.” ते दाखवते की, तेथे काहीतरी आहे, की ते त्यांच्या योग्य अवस्थेत नाही, ते कुठूनतरी पतित झालेले आहेत. आता, ते आपल्याला कोणीतरी समजवावे. ह्याची आवश्यकता नाही. पाहा? कारण, अर्थातच आपल्याला ठाऊक आहे, ते सार्वकालिक जीवन होते,

ज्यापासून ते पतित झाले. आणि ते त्यांचा सार्वकालिक जीवनावरील अधिकार गमावून बसले, आदाम आणि हवा पतित झाल्यामुळे जे ऐदेन बागेत सार्वकालिक जीवनातून मृत्युत पडले, आणि त्यांच्या सत्तेखाली असलेल्या, सर्व सृष्टीवर, मृत्यु आणला.

92 आदाम पतित होण्याअगोदर झाड कधी मेले नव्हते, आदामा आगोदरकोणी प्राणी मृत्यु पावला नव्हता. आणि तेथे फक्त एकच गोष्ट होती, जी मरु शकत नव्हती, आणि ती देव होती. कारण तो सार्वकालिक आहे. आणि तो एकच मार्ग आहे. आपण मृत्यु पासून स्वतःला वाचवू शकतो, आपल्यामध्ये सार्वकालिक जीवन असले पाहीजे, ह्यासाठी की, आपण देवाचे पुत्र आणि कन्या व्हावे.

93 जसे मी ह्या सकाळी संदेशामध्ये सांगितले, परंतु जेव्हा आम्ही पापामध्ये मृत्यु पावलो, आपण आपला ज्येष्ठपणाचा अधिकार विकला आणि दरी ओलांडून गेलो. आता आपण देवाच्या समक्षतेपासून दूर गेलो, दरीच्या दुसऱ्या बाजूस. आता, अर्थातच, जेव्हा आदाम मृत्युपर्यंत पतित झाला, त्याने सर्व निर्मितीवर मृत्यु आणला.

94 आता, त्याला स्वेच्छा दिली होती. ती त्यांना दिली होती. जशी आपणाला दिली आहे, ह्यासाठी निवड करावी. आता, प्रारंभी आदाम आणि हव्वा होते. तेथे त्यांच्यासमोर बरे वाईटाचे ज्ञान करुन देणारे झाड होते आणि ते झाड आमच्यासाठीही प्रत्येक जणासमोर आहे. पाहा, परमेश्वराने ते केवळआदाम आणि हव्वेसाठीच केले नाही...तुम्ही म्हणता, "ठीक आहे, तो त्यांचा दोष आहे." नाही. आता ते तसे नाही. तो तुमचा दोष आहे. तुम्ही तो आता आदामावर लादू शकत नाही. तुम्ही तो तुमच्यावर लादला पाहीजे; कारण चांगले आणि वाईट तुमच्यासमोर ठेवले आहे. आपण त्याच ठिकाणी आहोत, जेथे आदाम आणि हव्वा होते.

95 परंतु, तुम्ही पाहा, जेव्हा आपल्याला मुक्ती मिळते, तेव्हा आपण स्वतःची इच्छा पूर्ण इच्छित नाही, परंतु आपण त्यांची इच्छा पूर्ण करु इच्छितो, पाहीले? समजले?

96 आता, आदाम आणि हव्वा हे त्यांची इच्छा पूर्ण करु इच्छित होते. त्यांची इच्छा होती, त्यांची इच्छा होती की, हे शोधावे की ज्ञान म्हणजे काय आहे, म्हणून ते त्यामध्ये चौकशी करीत होते, आणि त्यामुळे मृत्यु आला.

97 आता जेव्हा मनुष्याला मुक्ती मिळाली. तोह्यापुढे ज्ञानाविषयी चिंता करीत नाही. तो ह्यापुढे जगातील गोष्टींची, जगातील ज्ञानाची काळजी करती नाही. तो आपल्या निवडीची इच्छा धरीत नाही. ख्रिस्तच त्याची आवड झाली आहे, आणि तेच त्याच्यासाठी सर्वस्व आहे. तो मुक्त झाला आहे. तो आता त्याला चालवू इच्छित नाही. त्याची इच्छा नाही की, कोठे जावे आणि काय करावे हे कोणी सांगावे. आणि पाहीले? मग तो त्याच्यानिर्माण कर्त्याच्या नावाने जातो. जेव्हा त्याचा निर्माणकर्ता त्यास सांगतो की जा. समजले?

98 परंतु ज्ञानाचा शोध घेणारा मनुष्य, जाणू इच्छितो. "ठीक आहे. हा प्रदेश चांगला आहे, परंतु जे पलिकडे मला अधिक किंमत देतात, म्हणून मी तेथे जाईन." पाहा? ज्ञान पाहा.

99 आता, जेव्हा आदामाने, देवाचे वचन पकडण्याऐवजी त्याच्या पत्नीच्या तर्कशक्तीकडे लक्ष देऊन पाप केले. त्याचमुळे आदाम पापात पडला. त्याच्या पत्नीने सैतानाशी तर्क—वितर्क केला आणि मग तीच गोष्ट आदामाबरोबर केली, आणि आदामाने वचनाला सोडले आणि त्याच्या अधिकारांना विकले.

100 जेव्हा त्याने त्याची सहभागिता, आणि जीवनाचा अधिकार गमावला, त्याबरोबर त्याने त्याचे वतनही गमावले. लक्षात ठेवा. "ज्या दिवशी तू ते खाशील, त्याच दिवशी

तू मरशील.” आणि जेव्हा त्याने त्याचे जीवन गमावले, त्याने त्याच्या जीवनाचे वतनही गमावले, कारण त्याच्याकडे पृथ्वीचे संपूर्ण, सर्वोच्च स्वामित्व होते, तो ह्या पृथ्वीचा परमेश्वर होता. देव अवघ्या विश्वाचा सर्व ठिकाणी देव आहे. परंतु ही पृथ्वी त्याने त्याच्या पुत्राच्या अधिपत्याखाली दिली होती. तो बोलू शकतो, तो नाव देऊ शकत होता, तो सांगू शकत होता, तो सृष्टी थांबवू शकत होता. त्याला जे पाहीजे ते तो करु शकत होता. पाहीले? परंतु जेव्हा त्याने ते केले, तो त्याचे वारस अधिकार गमावून बसला.

101 आता, आदाम सांगू शकत होता, “हा पर्वत येथून उपटून तेथे लावला जावो” आणि तसे होत असे. आदाम म्हणू शकत होता, “हे झाड उपटून तेथे लावले जावो.” ते तसे होत असे, पाहिले? कारण त्याच्याकडे पूर्ण, सर्वोच्च स्वामित्व होते, जसे एक लहान देव, आपल्या देव पित्याच्या अधिन, कारण तो देवाचा पुत्र होता.

102 आता आपण येथे काही वेळेसाठी थांबू शकतो, काय आणि खऱ्या उपदेशाकडे येऊया. पाहिले! ओह! मग, जर ते रक्त त्यास पूर्वी पुन्हा शुध्द करते, तर आता विषयी काय? पाहा? पाहा की देवाच्या पुत्राने, दुसऱ्या आदामाने, काय केले? पाहिले? आणि म्हणाला, “जी कृत्ये मी करितो, तुम्हीही कराल.” समजले?

103 आदामाने आपली वारसाने मिळालेली त्याची संपत्ती, पृथ्वी गमावली. ती त्याच्या हातातून सैतानाकडे गेली. ज्यास त्याने ती विकली त्याने देवावरील त्याचा विश्वास सैतानाच्या तर्क—वितर्कांसाठी विकला. म्हणूनच, त्याचे सार्वकालिक जीवन, त्याचा जीवनाच्या झाडावरील अधिकार, पृथ्वीवरील त्याचा अधिकार, जो त्याचा होता, आणि त्याने ती प्रत्येक गोष्ट सैतानाच्या हाती गमावली. ती त्याच्या हातून सैतानाकडे गेली. म्हणूनच, आता, ती परत आली आहे आणि दूषित झाली आहे. आणि आदामाच्या वंशाने त्याचा वारसा हक्क नष्ट करुन टाकला जो आदामाकडे असायला हवा होता, तो पृथ्वी आहे. ते बरोबर आहे, पाहा, आदामाचा वंश.

104 दुसऱ्या दिवशी ट्युसन येथे, जीथे मी राहतो, मी थांबलो, आणि मी उंच डोंगरावरुन खाली पाहात कोणाशी तरी बोलत होतो. मी म्हणालो, “तुम्हाला काय वाटते! की, जेव्हा तीनशे वर्षापूर्वी, प्राचीन अमेरिकी पूर्वज आपल्या अमेरिकी, भारतीय पत्नी व मुलासमवेत त्यांच्या घोडागाडीत बसून, तेथे कुठेतरी आले होते आणि शांतीने राहिले. तेव्हा तेथे व्यभिचार नव्हता, दारु नव्हती; जुगार नव्हता, त्यांच्यामध्ये असे काहीच नव्हते. ते शुध्दतेत जीवन व्यतीत करत होते. आणि ट्यूसनवरुन कुत्र्यांसारखे प्राणी स्त्रीचे आवाज करीत ते—ते धूण्यासाठी येत, प्रत्येक रात्री, येत असे. आणि अमेरिकन पोषक झाडे आणि निवडुंग किनाऱ्यासभोवती, उमललेले आणि लहरत होते. आणि यहोवाने त्याकडे पाहिले असेल आणि हसला असेल. परंतु, गोरा मनुष्य त्या मार्गाने आला, आणि त्याने काय केले पाहा? त्याने ते निवडूंग खणून काढले. त्याने तो देश बियरच्या पिंपांनी आणि दारुच्या बाटल्यांनी दूषित करुन टाकला. त्याने त्या देशाची नैतिकता नष्ट करुन टाकली. भारतीयांना नष्ट करण्याचा एकच मार्ग होता. तो म्हणजे त्यांचे अन्न, म्हैशींना ठार मारावे.”

105 जेव्हा, मी एके दिवशी टोमस्टोन येथील संग्रहालयात वाचीत होतो आणि गेरोनीमोचे फोटो पाहिलेः आणि तुमच्यातील बहुतेकांना वाटत असेल की, गेरोनिमो एक विश्वासघातकी होता. परंतु माझ्यासाठी, तो एक सच्चा अमेरिकी होता. तो फक्त सत्यासाठी लढत होता की, देवाने त्यालाः एक भूमी दिली होती. आणि एक देश, आणि राहण्यासाठी एक जागा. मी त्याला दोष देत नाही आणि जेव्हा ते सैनिक तेथे आत जबरदस्तीने आले. आणि त्या जागेवर कब्जा घेतला, आणि त्यांचा एका माशांच्या समुहाप्रमाणे संहार केला आणि तेथे त्या संग्रहालयात गेरोनिमोच्या वैद्यकिय मुख्य कार्यालय किंवा त्याच्या

रुग्णालयाचे एक मुळचित्र होते. एका झाडाच्या तुकड्यावर दोन किंवा तीन घोंगड्या होत्या. आणि जे जखमी, सच्चे, मुळचे अमेरिकी, शास्त्रीय त्यांच्या देवाने दिलेल्या अधिकारासाठी लढणारे होते. आणि तेथे गेरोनिमो आपल्या स्वतःच्या मुलाला कमरेवर घेऊन उभा होता. आणि त्याच्या योध्यांना रक्तबंबाळ होऊन, मरताना पाहत होता, त्याच्याकडे पेनिसिलिन किंवा काहीच नव्हते. त्यांना साहाय्य करण्यास कुठलाच मार्ग नव्हता. खरे देवाने दिलेले अमेरिकी! त्यांना विश्वास घातकी म्हटले गेले? मी त्यांला सभ्य पुरुष म्हणतो.

106 कोचार्दस कधीच शरण आला नसता. तो एक वृध्द पुरुष होता. परंतु अमेरिकी सैन्य, ते सर्व आपला पोषाक घालून बाहेर पडले. आणि त्या म्हैशींना मारुन टाकले. त्या सर्वांनी धावून हल्ला केला. आणि त्यांनी म्हैशींच्या धारदार बंदूकीचा शोध लावला होता आणि ते तेथे गेले, व म्हणाले, “ओह, आजचा दिवस चांगला होता.” त्यांनी गाडीच्या डब्यामागून गोळीबार केला. म्हणाले, “मी आज चाळीस मारल्या.” चाळीस म्हैशी, ज्यांनी अमेरिकी जातीचे दोन किंवा अधिक वर्षांपर्यंत पोषण केले असते. त्यांनी त्या म्हैशीचे काय केले? त्यांना त्या वाळवंटात टाकून दिल्या. त्यांची भूमी त्या म्हैशींच्या कुजलेल्या मांसाने भरली, आणि तेथे दुर्गंधी येऊ लागली. त्या म्हैशींना ते कुत्र्यासारखे प्राणी खात असत.

107 जेव्हा ते अमेरिकी भारतीय म्हैशींना मारत असत, तेव्हा तेथे एक धार्मिक समारंभ होत असे. ते त्यांच्या खूरांना उचलून भांडे बनविण्यासाठी सुरक्षित ठेवित असत. ते त्यांचे मांस खात असत, त्यांचे आतडे पण खात असत. ते सर्व मांस देऊन टांगवत असत आणि ते सुकवित असत त्याची कातडी सुकवून, त्याचे कपडे आणि तंबू बनवित असत. त्यातले काहीही टाकीत नसत…

108 परंतु, जेव्हा गोरा माणूस आला, तो गोरा मनुष्य विश्वासघातकी होता. तो बदमाश होता आणि तो आत आला आणि त्या म्हैशींना मारले आहे आणि त्या भारतीयांना उपाशी ठेवले.

109 कोणीही सच्चा मनुष्य त्याच्या देवाने दिलेल्या अधिकारासाठी लढेल, हा अमेरिकी झेंड्यावर एक काळीमा आहे. जे त्यांनी अमेरिकी भारतीयांबरोबर केले. कसेही असो, तो देश त्याचा आहे.

110 तुम्ही काय विचार कराल, जर जपान…किंवा—किंवा दुसरे कोणी, रशिया आत येईल, आणि सांगेल, “येथून बाहेर निघा! येथून मागे या!” आणि—आणि आमच्याशी आणि आमच्या मुलांशी तसे वागा जसे आम्ही त्या भारतीयांशी वागलो? परंतु लक्षात ठेवा, आपण जे पेरलेले आहे, आणि आता तेच उगवणार आहेत. तो देवाचा नियम आहे, तुम्हाला माहीत आहे. तेथे पेरण्याचा समय, असतो. आणि मग कापणीचा समय असतो. मला वाटते की, ते खूप वाईट आहे. होय महाशय.

111 आता काय घडले? आदामाच्या दूषित संततीने ही भूमी दुषित करुन पूर्णपणे नासधूस करुन टाकली, तुम्हाला ठाऊक आहे, तसे बायबल सांगते? आणि कारण की त्याने हे केले. आदामाची दूषित संतती, देव त्यांचा सर्वनाश करील. तुम्हाला ते वाचावयाचे आहे काय? आपण पाहूया माझ्याकडे ते येथे लिहीलेले आहे. प्रकटीकरणाचा 11वा अध्याय काढा, आणि आपल्याला समजेल प्रकटीकरणाच्या 11व्या अध्यायात पाहूया, आणि आपण पाहूया देव त्यांच्याविषयी काय म्हणाला आहे. जे पृथ्वीची नासाडी करीत आहेत. 11वा अध्याय आणि आपण 11वे वचन घेऊया, मला वाटते ते 11:18चं आहे. येथे आपण पाहूया.

*’राष्ट्रे क्रोधाविष्ट झाली, तुझ्या क्रोधाची वेळआली;* (आता देवाचा क्रोध पाहा)*; मृतांचा न्याय करण्याची वेळ, आणि तुझे दास संदेष्टे व तुझे पवित्र जन*

*व तुझ्या नावाची भिती, बाळगणारे लहानथोर ह्यांस वेतन देण्याची वेळ आणि पृथ्वीची नासाडी करणार्यांचा नाश करण्याची वेळ आली आहे.*

112 ते काय करणार आहे? त्यांनी जे पेरले तेच उगवले, निश्चितच, जेव्हा तुम्ही पाप रस्त्यावर पळताना पाहता! ह्या रविवारी रात्री, किती व्यभिचार ह्या रात्री शहरात केले जातील? किती स्त्रिया तिच्या विवाहाच्या शपथा मोडतील, ह्या छोट्याश्या जागेत ह्या भूमिवर जिला जेफर्सन व्हिले म्हणतात? किती गर्भपाताची प्रकरणे ह्या तीस दिवसात शिकागोमध्ये नोंदली गेली, असे तुम्हाला वाटते? पंचवीस ते तीस हजार प्रति महिन्यात ज्यांची नोंद नाही ते वगळून शिकागो शहरात किती दारु पिली जाते? तुम्हाला काय वाटते की, एका रात्रीत लॉस एंजल्समध्ये काय घडले असेल? आज जेफर्सनव्हिलेमध्ये किती जणांनी प्रभूचे नाव व्यर्थतेत घेतले असेल? ते आता अधिक चांगले आहे की, तेव्हा चांगले होते, जेव्हा जॉर्ज रॉजर्स क्लार्क तराफ्यांवर खाली आला? तुम्ही पाहिले आपण आपल्या ओंगळपणाने पृथ्वी पुर्णपणे प्रदुषित करुन टाकली, आणि देव त्यांचा नाश करील ज्यांनी जगाचा नाश केला. देव तसे म्हणाला आहे.

113 मला नेहमी असे वाटत होते की, माझ्या हृदयात काहीतरी आहे, मला डोंगरावर जाणे पसंत आहे. आणि देवाने ठरविलेले मार्ग पाहणे.

114 मी फ्लोरिडाचा द्वेष करतो, जेथे त्यांनी ताडाच्या कृत्रिम वृक्षांना लावले आहे आणि ओह, माझ्या देवा, त्यापेक्षा मी मगरींना त्याची शेपूट हलवीताना, जंगलात पाहीन. जे सर्व तेथे ठेवले आहे. किंवा हॉलिवूडमधील भ्रष्टता जे ते करत आहेत. आणि सर्व तेथील अत्यंत आकर्षकता, आणि पिणार्यांचा समुह पाहण्याऐवजी आणि, ओह, माझ्या देवा, मी फक्त विचार करतो, "एके दिवशी! एके दिवशी!" होय.

115 परंतु, लक्षात ठेवा, बायबल आपल्याला सांगत आहे, मत्तया 5व्या अध्यायात की, "जे सौम्य ते पृथ्वीचे वतन भोगतील," ते बरोबर आहे. "जे सौम्य आणि नम्र जन पृथ्वीचे वतन भोगतील." येशू म्हणाला, "जे सौम्य ते धन्य". साधे जे स्वतःला काहीतरी मोठे दाखविण्याचा प्रयत्न करीत नाही. "ते पृथ्वीचे वतन भोगतील". येशूने तसे म्हटले. होय आता त्यांनी तिची नासाडी केली आणि देव त्यांचा नाश करील; परंतु जे सौम्य ते पृथ्वीचे वतन भोगतील, ती शुध्द केल्यानंतर.

116 आता, माझ्या देवा! आता, गमावलेले हक्क पत्र हे आता मूळमालकाच्या हाती आहे, सर्व समर्थ परमेश्वर. ह्या पृथ्वीचे हक्कपत्र आणि सार्वकालिक जीवनाचे हक्कपत्र, जेव्हा आदाम गमावून बसला; तेव्हा सैतानाचे दूषित हात ते घेऊ शकले नाही, म्हणून ते परत त्याच्या मूळमालकाकडे गेले, जो देव स्वतः आहे. अगदी काही मिनिटातच ते आपल्याला समजेल तेथे, त्याच्या हातात हक्कपत्र घेऊन, तो सिंहासनावर बसलेला आहे. (भाऊ ब्रॅन्हम दोनदा त्यांच्या हाताने टाळ्या वाजवितात.) ओह! ते मला धार्मिक होण्याचा अनुभव देत आहे, जेव्हा आदामाने विश्वासाऐवजी, ज्ञानाखातिर सार्वकालिक जीवनाचे मालकी हक्काचे दस्ताऐवज गमाविले. ते परत मालकाच्या, सर्वसमर्थ परमेश्वराच्या हाती गेले. किती महान गोष्ट आहे!

117 ठीक आहे, प्रतिक्षा करीत आहे. तो काय करीत आहे? परमेश्वराच्या हातून, मुक्तिच्या दाव्याची वाट पाहत आहे. त्याने मुक्तीचा मार्ग बनविला, त्याने परत जाण्याचा मार्ग बनविला, आणि एके दिवशी मुक्तिदाता ते परत घेणार आहे. तुम्ही पाहत आहा, आता आपण कुठे जात आहोत? आपण ह्या व्यक्तीला राजासनावर बसताना पाहणार आहोत. ठीक आहे, तो आपल्या मुक्तीच्या दाव्याची वाट पाहत आहे.

118 हे मुक्तीचे पुस्तक काय आहे, हे मालकी हक्काचे दस्ताऐवज, मालकी हक्काच्या दस्ताऐवजाचा 'गोषवारा' काय आहे? गोषवारा म्हणजे काय? "तुम्ही म्हणालात, गोषवारा?" गोषवारा म्हणजे काय? त्याचा अर्थ ज्यांचा शेवटापासून सुरुवातीपर्यंत तपास झाला आहे. ज्याप्रमाणे आज सकाळी त्या शाईच्या लहान थेंबाविषयी जेव्हा तो ब्लीचच्या सानिध्यात येतो. तो पुन्हा पुर्व स्थितीत जातो आणि जेव्हा पापाची कबुली दिली जाते आणि तो येशू ख्रिस्ताच्या रक्तात पडतो. तेव्हा तो एक गोषवारा देतो. तो पुन्हा आपल्या निर्माणकर्त्याकडे परत जातो. तुम्ही देवाचे पुत्र बनता. मालकी हक्काच्या दस्ताऐवजाच्या गोषवारा सर्वसमर्थांच्या हाती आहे. ओह. माझ्या प्रभू!

119 त्याची मुक्ती म्हणजे सर्व कायदेशीर ताबा त्या सर्वांवर मिळणे जे आदाम आणि हव्वेने गमावले होते. ओह! माझ्या देवा! (भाऊ ब्रॅन्हम माझ्या हाताने एकदा टाळ्या वाजवतात) नविन जन्म पावलेले ख्रिस्ती होण्यासाठी काय केले पाहीजे! हे गोषवार्याचा दस्ताऐवज, सार्वकालिक जीवनाचे मालकीहक्क दस्ताऐवज, कायदेशिररित्या प्राप्त करुन घेणे आहे. म्हणजे तुम्ही ते सर्व प्राप्त करता जे, आदाम आणि हव्वा ह्यांनी गमावले होते. वाह! भावा त्याविषयी काय? ते दस्ताऐवज प्राप्त करुन घेणे.

120 आदम मुक्तिच्या शर्ती पूर्ण करु शकत नव्हता. जेव्हा त्याला कळले की, त्याने ते हक्क पत्र गमावले, त्याने पाप केले होते आणि त्याने त्याला देवापासून वेगळे केले, त्याने पाहिले की, तो त्या दरीच्या *अलीकडे* आहे, त्यामुळे तो ते सोडवू शकला नाही. तो ते करु शकला नाही, कारण त्याला—त्याला स्वतःला, मुक्तिची आवश्यकता होती, म्हणून तो ते करु शकला नाही.

121 परंतु नियमाप्रमाणे सोडवणूक करणारा जवळचा आप्त असण्याची आवश्यकता होती. देवाच्या नियमाप्रमाणे सोडवणूक करणारा जवळच्या आप्ताची आवश्यकता आहे. तुम्हाला त्याची टिप्पणी करुन घ्यायची आहे काय? "सोडवणूक करणारा जवळचा आप्त", ते लेवीय 25मध्ये मिळेल.

122 आपल्याकडे विस्तृतपणे हे शोधण्यासाठी वेळ नाही, कारण, तुम्हाला माहीत आहे की, प्रत्येक—प्रत्येक विषय एक—एक रात्र करील. पाहा?

123 परंतु देवाच्या नियमात एक पर्याय होता. आता, जर देवाने तो पर्याय स्विकारण्यासाठी दिला नसता? परंतु प्रेमाखातिर त्याला तसे करणे भाग पाडले. तो मनुष्य परतीच्या मार्गाविना होता, आणि त्याच्याकडे परत जाण्याचा मार्गच नव्हता. तो पूर्णपणे गेला होता. परंतु देवाच्या कृपेने हा सोडवणूक करणारा जवळचा आप्त येशू ख्रिस्त ह्या व्यक्तीमध्ये मिळवून दिला. नियमाला त्याची आवश्यकता होती. कृपेद्वारे ती आवश्यकता पूर्ण झाली. ओह! अद्भूत कृपा! किती मधुर आहे! देवाच्या नियमाला एका निष्पाप पर्यायाची आवश्यकता होती.

124 आणि कोण निर्दोष होता? प्रत्येक मनुष्याचा जन्म शरीरसंबंधाद्वारे, शरीरसंबंधानंतरच झाला. प्रत्येकजण आणि फक्त एकच निर्दोष ज्याचा तसा जन्म झाला नव्हता. ज्याने सार्वकालिक जीवनाचा अधिकार आणि पृथ्वीचा राजा होण्याचा अधिकार गमाविला नव्हता.

125 ओह, जेव्हा मी त्या पवित्र शास्त्रलेखाचा विचार करतो. "तू आम्हाला मुक्ती देऊन देवाकडे परत आणले, आणि आम्ही राज्य करावे आणि ह्या पृथ्वीवर राजे आणि याजक व्हावे. ओह!" बाप रे तो कोण आहे. सोडवणूक करणारा जवळचा आप्त! ओह! किती महान गोष्ट येथे आपल्याकडे आहे.

126 लक्ष द्या, हरवलेली गोष्ट मिळविण्यासाठी नियम शास्त्राला एक सोडवणूक करणारा आप्त पाहिजे. कृपेनेही आवश्यकता येशू ख्रिस्त ह्या व्यक्तीमध्ये पूर्ण केली. जवळचा आप्त मनुष्य वंशातूनच जन्मला पाहिजे.

127 आता, आपण ते कसे होऊ शकलो असतो. जेव्हा प्रत्येक मनुष्य जो जन्मला आहे... आणि जो कोणी ते पाहू शकत नाही. तेथे यौन क्रिडा झाली होती. तो पूर्णपणे आंधळा आहे. कारण प्रत्येक मनुष्य जो जन्मला तो स्त्रीपासून जन्मला आहे.

128 आणि देवाला एक सोडवणूक करणारा जवळचा आप्त हवा होता, आणि तो मनुष्य असला पाहिजे, ओह, माझ्या प्रभू! आता तुम्ही काय करणार आहात. नियमशास्त्राची आवश्यकता एक सोडवणूक करणारा जवळचा आप्त आहे.

129 आता, तो कोणा देवदूताला घेऊ शकत नव्हता. त्याला एका मनुष्याची आवश्यकता होती, कारण आपण देवदूताचे जवळचे आप्त नाही. आपण एकमेकांचे आप्त आहोत. देवदूत कधीच पडले नाही. तो एक वेगळा प्राणी आहे, त्याचा देह वेगळा आहे. त्याने कधीच पाप केले नाही. तो वेगळा आहे.

परंतु नियमशास्त्राची जरुरी एक सोडवणूक करणारा जवळचा आप्त आहे.

130 आणि पृथ्वीवरील प्रत्येक मनुष्य शरीरसंबंधाद्वारे जन्मला आहे. आता तुम्हाला समजले नाही की, ते तेथे कोठून आले. तेथूनच जेथे पापाची सुरुवात झाली. म्हणून तुम्ही पाहा की, आता ते कोठे आहे. तेथेच तुमचा सर्पवंश येतो. समजले?

131 आता, लक्ष द्या, सोडवणूक करणारा जवळच्या आप्ताची आवश्यकता होती. आणि सोडविणारा, सोडविणारा जवळचा आप्त मनुष्य जातीतून जन्मला पाहीजे. येथे ही गोष्ट आपल्याला पायावर उभे राहण्यास लावते. परंतु मला तुमच्यासाठी तुतारी वाजवू द्या. त्या कुमारीद्वारे जन्म घेण्याने ती—ती वस्तू उत्पन्न झाली. आमेन. कुमारीद्वारे जन्म घेण्याद्वारे आपला सोडविणारा जवळचा आप्त उत्पन्न झाला. दुसरा कोणी नाही. परंतु सर्वसमर्थ परमेश्वर इम्मानुएल झाला. आमच्यातील एक इम्मानुएल! "सोडवणूक करणारा जवळचा आप्त" हा मिळाला होता. तुम्ही पाहीले देव कशाप्रकारे गरज भागवितो. आणि आपण तेथे काहीच करु शकत नाही. परंतु तेव्हा कृपा आली आणि नियमशास्त्रावर छाया केली, आणि फळउत्पन्न झाले. आमेन! (भाऊ ब्रॅन्हम त्याच्या हाताने टाळ्या वाजवितो.)

132 ओह, जेव्हा तुम्ही स्वर्गीय घरी जाल! तेव्हा मी खाली तेथे लहानशा खोलीत जातो. ज्याविषयी भाऊ नेव्हील गाणे गात आहे. जेव्हा एका सकाळी सगळेच तेथे हे गाताना ऐकतील. "अद्भूत अनुग्रह, किती मधूर ओह! त्याने मजसारख्या पाप्यास वाचवले." तुम्ही म्हणाल, "परमेश्वराची स्तुती होवो! वृध्द भाऊ ब्रॅन्हमने हे केले, तेथे तो आहे." होय. ओह,

> तो अनुग्रहच आहे, ज्याने माझ्या हृदयाला भय धरण्यास
> शिकविले,
> तो अनुग्रह होता, ज्यामुळे मी भयमुक्त झालो;
> त्यासमयी जेव्हा मी पहिल्यांदा विश्वास ठेवला
> तो बहुमुल्य अनुग्रह कशाप्रकारे प्रकट झाला!

133 आपण तेथे खाली काही क्षणातच जाईपर्यंत थांबा! ओह, माझ्या देवा! आता पाहूया, पुस्तकं...

134 रुथचे पुस्तक ह्याविषयी सुंदर चित्र दाखवते, कशाप्रकारे बवाज...आणि नामीने आपले वतन गमावले होते. तुम्हाला माहीत आहे. मला प्रचार त्यावर करताना ऐकले

आहे काय? तुम्ही ऐकले आहे काय? जर तुम्ही ते मला प्रचार करताना ऐकले असेल तर, तुमचे हात वर करा. त्यामुळे तुम्हाला समजेल पाहा. बवाजला सोडवणूक करणारा बनावे लागले आणि तोच एकटा होता, जो हे करु शकत होता. त्याला आप्त बनावे लागणार होते. एक जवळचा आप्त आणि नामीला सोडवताना त्याला रुथ मिळते. तो येशू होता. बवाज ख्रिस्ताला दर्शवितो आणि जेव्हा त्याने इस्त्राएलची मुक्ती केली, त्याला परराष्ट्रीय वधू मिळाली. म्हणून तुम्ही हे पाहा, किती सुंदर आहे! ते आपल्याकडे येथे कुठेतरी टेपवर आहे, मला शाश्वती आहे की, तुम्हाला ते घ्यायला आवडेल.

135 आता लक्ष द्या. जो जवळचा आप्त असला पाहीजे, म्हणून तुम्ही पाहता, एक देवदूत ते करु शकत नव्हता. एक मनुष्य ते करु शकत नव्हता. तो एक मनुष्यच असला पाहिजे, परंतु तो स्त्रीपासून शरीरसंबंधातून जन्मलेला नसावा. म्हणून एक कुमारीद्वारे जन्म, पवित्र आत्म्याने मरियेवर छाया केली. म्हणूनच येशू यहूदी नव्हता. येशू एक परराष्ट्रीयही नव्हता. येशू देव होता. ते अगदी बरोबर आहे. त्याचे रक्त कुठल्या शरीर संबंधाद्वारे आले नाही. तो पवित्र होता. देवाचे तयार केलेले रक्त. आपले तारण यहूदी रक्ताद्वारे झाले नाही किंवा आपले तारण परराष्ट्रीय रक्तानेही झाले नाही. "आपले तारण देवाच्या रक्ताद्वारे झाले." ते बायबलप्रमाणे आहे. ते तसे म्हणते. "आपले तारण..."

136 म्हणून तुम्ही पाहीले. येशू देव होता. तो तिसरा व्यक्ती, चौथा व्यक्ती, दुसरा व्यक्ती नव्हता, तो एकच व्यक्ती होता. तो देव होता. समजले. तो देव होता. इम्मानुएल. देव त्याच्या गौरवातून खाली आला. त्याला स्वतःला प्रकट केले. मला ती गोष्ट आवडते. बूथ क्लिबॉर्नचे ते महान सुंदर गीत.

> तो त्याच्या गौरवातून खाली आला,
> माझा परमेश्वर आणि तारणारा आला, आणि येशू त्याचे नाव होते.
> तो एका गव्हाणीत जन्मला, त्याच्या स्वकीयांसाठी तो अनोळखी होता,
> दुःख, अश्रु आणि वेदनांनी भरलेला मनुष्य, ओह!
>
> त्याची मेहरबानी इतकी, आपल्यासाठी मुक्ती आणली,
> जेव्हा मृत्युच्या रात्रीत, दृष्टीसमोर एक फुसटशी आशा नव्हती;
> परमेश्वर मौल्यवान, नम्र त्याने त्याचे वैभव बाजूला ठेवून प्रेमयाचनेने,
> माझा जीव तारण्यासाठी खाली आला.
>
> ओह! मी त्याच्यावर किती प्रेम करतो! किती मी त्याची स्तुती करतो!
> माझा श्वास, माझा सुर्यप्रकाश, माझे सर्वस्व!
> तो महान मुक्तीदाता, माझा तारणारा झाला.
> तो महान निर्माणकर्ता, माझा तारणारा झाला.
> आणि देवत्वाची सर्व पूर्णता त्याच्यामध्ये वास करते.

137 तोच होता, ज्याने आवश्यकता पूर्ण केली. कृपेने येशू ख्रिस्त हा व्यक्ति निर्माण केला. आणि आपण पाहतो की, हे पुस्तक आता...देवाने त्याचा तंबू फैलाविला, मनुष्य बनण्यासाठी तो परमेश्वरापासून आला. त्याने त्याचे रुप सर्वसमर्थापासून मनुष्य बनण्यासाठी बदलले, त्याने मनुष्याचे रुप घेतले. ह्यासाठी की तो मनुष्याला मुक्ती देण्यासाठी मरु शकेल. त्या समयापर्यंत आपण त्याची प्रतिक्षा करुया. जेव्हा तेथेही "कोणीही योग्य" नव्हते. समजले? ठीक आहे.

138 बायबलमध्ये रुथच्या पुस्तकात, जसे तुम्ही ते वाचता, तुम्हाला समजेल की, तशा मनुष्याला “वतन सोडविणारा,” जी–ओ–ए–एल, म्हणून संबोधले जात होते. त्यास वतन सोडविणारा म्हणून संबोधिले जात होते. तो एक व्यक्ति जो काही अटी पूर्ण करु शकत होता. आणि वतन सोडविणारा (गॉल) ते करण्यास समर्थ असला पाहीजे, आणि तो जवळचा आप्त असला पाहिजे. जवळच्या आप्ता नंतरचा असला पाहीजे, ते करण्यासाठी.

139 आणि देव जो निर्माणकर्ता, एक आत्मा, आपल्यासाठी जवळचा आप्त झाला, जेव्हा तो मनुष्य बनला, ह्यासाठी की, त्याने आपली पापे त्याच्यावर घ्यावी आणि मुल्य चुकवावे. आणि आपल्याला मुक्त करुन पुन्हा देवाकडे न्यावे. तेथे तो आहे. तेथेच मुक्तीदाता आहे.

140 आता ख्रिस्ताने आपल्याला मुक्त केले आहे. आता आपण मुक्त झालो आहोत. परंतु त्याने अजूनही त्याच्या वतनावर दावा केलेला नाही. आता तुम्ही ह्याविषयी माझ्याबरोबर सहमत नसाल, परंतु काही मिनिटे वाट पाहा. आपण पाहूया, समजले? त्याने त्यावर दावा केलेला नाही. पाहा, जर त्याने मुक्तिचे पुस्तक उचलले, सर्व काही जे, आदामाकडे होते आणि सर्व काही जे त्याने गमावले, ख्रिस्ताने वर मिळवले. आणि त्याने आपल्याला अगोदरच मुक्त केले आहे. परंतु त्याने त्याचा ताबा अजूनही घेतला नाही.त्या नियुक्त समयापर्यंत तो घेऊ शकत नाही आणि तेव्हाच पुनरुत्थान होईल आणि मग पृथ्वी पुन्हा नविन केली जाईल आणि मग तो त्या वतनाचा ताबा घेईल. जे त्याला मिळाले होते, जेव्हा त्याने आपल्याला मुक्ती दिली, परंतु तो ते एका नियुक्त समयातच करील. ओह! माझ्या देवा!

141 ह्याचे वर्णन सात शिक्क्यांच्या पुस्तकात केले आहे. ज्याविषयी आपण आता बोलत आहोत. ठीक आहे. मुक्तिच्या पुस्तकात, येथे त्या सर्वांचे वर्णन केले आहे. जे सर्व ख्रिस्त शेवटी करणार आहे. ते ह्या आठवड्यात आपल्याला ह्या सात शिक्क्यांमध्ये प्रकट केले जाईल, जर देव आपल्यासाठी तसे होऊ देईल. समजले? ठीक आहे. ते प्रकट केले जाईल. आणि जसे शिक्के, फोडले जातील आणि आपल्याला जसे प्रकट केले जाईल, मग आपल्याला कळू शकेल की, ही महान मुक्तिची योजना काय आहे आणि केव्हा आणि कशी ती केली जाणार आहे. ते सर्व ह्या रहस्यमय पुस्तकात गुप्त आहे. ते सीलबंद आहे आणि सात शिक्क्यांनी ते सीलबंद केलेले आहे, आणि म्हणून तो कोकराच आहे जो त्यांना फोडू शकतो.

142 आता...(भाऊ ब्रॅन्हम काही गोष्टीमुळे विचलित होतात—संपा.) मला क्षमा करा. आपल्याला समजते...

143 आता, जर तुम्हाला ह्या पवित्र शास्त्रलेखात पाहण्यास आवडेल, तुम्ही यिर्मयाच्या पुस्तकात हे पाहू शकता. जेव्हा त्याला—जेव्हा त्याला—देशात कैद करुन नेणार होते, तुम्हाला माहीत आहे, त्याने—त्याने त्याच्या काकाची...त्याच्या काकाच्या मुलाकडे काही—काही संपत्ती होती, आणि त्याने त्या सीलबंद दस्ताऐवज पाहिला होता. आणि जर आपण ते पाहू इच्छितो...तर ते आपल्याला *सात मंडळीची युगे* ह्यात, त्या शिक्क्यामध्ये आणि इतर ठिकाणी पण आहे.

144 जुन्या करारात तुम्ही पाहता की, शिक्का हा गुंडाळीसारखा होता. *अशाप्रकारे* (भाऊ ब्रॅन्हम आता कागदाचे तुकडे वापरुन गुंडाळी, मोहरबंद करणे आणि गुंडाळीची उघडणे समजवितात.) आणि *येथे* गूज होते, आणि ते गूज गुप्त होते. ठीक आहे ते सीलबंद होते आणि येथे ठेवले होते. ज्यावर दावा *अमुक–आणि–अमुकाचा* होता. मग नंतरचे रहस्य त्याच्या सभोवती गुंडाळले होते. ज्याचा तो वारसा हक्क होता आणि *येथे* या बाजूस मोहर लावलेली असायची...दावेदारी *अमुक–अमुक* व्यक्तीची होती आणि असे केले जात होते.

जोपर्यंत तो दस्तऐवज पूर्ण होत नाही. कारण त्या समयी *आजच्यासारखे* लोकांकडे पुस्तके नव्हती. ते गुंडाळीच्या स्वरुपात होते. (किती जणांना हे माहीत आहे?) ज्यास गुंडाळी म्हणत असत. ठीक आहे, ती एक सीलबंद गुंडाळी होती. जी तुम्ही उघडू शकता. रहस्य काय आहे हे पाहू शकता! आणि तुम्ही *ते* उघडून पाहू शकता की, त्यात काय दावा आहे आणि मग दुसरा शिक्का फोडून, दुसरे पत्र उघडून पाहू शकत होते की त्यात कसला दावा आहे.

145 आणि संपूर्ण गोष्ट येथे सात शिक्क्यांबाबतीत आहे, ह्यात परमेश्वराची गूजे जगाच्या स्थापनेसपासून सर्व मोहरबंद केली आहे आणि सात भिन्न भिन्न शिक्क्यांद्वारे प्रकट केले आहे, जर देवाची इच्छा असेल आणि जर तो आम्हास ह्या शिक्क्यांचा अभ्यास करु देतो आणि ह्या पुस्तकांतून पाहून आणि शोध करु की, हे कशाविषयी सांगत आहे. समजले? ओह, मी आशा करतो की, आपल्याकडे एक महान समय आहे! तेथेच मुक्तिचे रहस्य मोहरबंद केले आहे. जोपर्यंत...हे पुस्तक तोपर्यंत उघडले जात नाही. जोपर्यंत सातव्या दूताचा संदेश प्रचार केला जात नाही.

146 तेथे गुंडाळी होती. आपल्याला ठाऊक आहे, ती तेथे होती. आपल्याला ठाऊक आहे की, ती मुक्ती होती. आपण विश्वास ठेवतो की, ती मुक्ती होती. यिर्मया म्हणाला, "ही गुंडाळी ठेवली पाहीजे..." तेथे जेव्हा तुम्ही वाचता; तो म्हणतो की, ही गुंडाळी मातीच्या भांड्यात ठेवली पाहीजे. समजले? ओह, किती सुंदर गोष्ट! ज्याविषयी मी थोडा वेळबोलू शकतो. ही गुंडाळी एका मातीच्या मडक्यात ठेवली होती. एक मडके जे एके काळी शरीर बनले. (महिमा!) मेले, पुन्हा उठले आणि त्या समयापर्यंत मातीच्या भांड्यात ठेवले गेले. जोपर्यंत विकत घेण्याची वेळयेत नाही. ओह! माझ्या प्रभू! सुंदररितीने! ठीक आहे.

147 आता, ह्या पृथ्वीवर शेवटचा संदेश येईपर्यंत हे संदेश ह्या पृथ्वीवरील भांड्यात गुप्त ठेवण्यात आले आहे, देवाचा नेमिलेला समय येण्याच्या वेळेपर्यंत. आणि ज्या सर्व लोकांनी ह्या विषयी अंदाज केला आणि म्हणाले, "मला माहित आहे ते तेथे आहे. मी विश्वास करतो, की ते तेथे आहे." आणि त्यावर त्यांनी तंटा केला आणि त्यास प्रकट केले आणि त्या सर्व गोष्टी उत्पन्न केल्या. ज्यावर ते विश्वासाद्वारे भरवसा करीत होते. परंतु आता ते आपल्याकडे प्रकटीकरणाद्वारे आणि देवाच्या हातांनी प्रमाणित करुन आणले जाईल. देवाने असेच सांगितले आहे. त्याचे त्याचे अभिवचन दिले आहे.

148 आता, आपण पाहू या. कोठे होतो? आपण 2 ऱ्या वचनाकडे जाऊया. पहिले वचन वाचून खूप वेळ झाला. परंतु आपण—आपण—आपण 2 रे वचन घेऊया. आता, कदाचित आपण त्याच्या नंतरच्या वचनावर जास्त वेळ लावणार नाही.

> *आणि गुंडाळीवरचे शिक्के फोडून ती उघडावयास कोण योग्य आहे? असे मोठ्याने पुकारणारा एक बलवान देवदूत मी पाहिला.*

149 आता, लक्ष द्या. आपण पहिले वचन पुन्हा वाचूया, ह्यासाठी आपल्याला ते एकत्र केल्यावर कळेल.

> *...'तो राजासनावर बसलेला होता. त्याच्या उजव्या हातात एक गुंडाळी मी पाहिली...*

150 परमेश्वर! तो कोण आहे? तोच जीवनाच्या पुस्तकाचा पूर्णपणे मुळधारक आहे. त्याने ते धरले आहे. देवाने हे केले आहे. जेव्हा आदामाकडे ते गमावले, ते पुन्हा मूळमालकाकडे परत गेले. ते त्याचे आहे.

*आणि* योहान (दृष्टांतात) पाहतो आणि *जो राजासनावर बसलेला होता, त्याच्या उजव्या हातात 'पाठपोठ लिहीलेली व सात शिक्के मारुन बंद केलेली पुस्तकाची एक गुंडाळी पाहिली.*

151 आतमध्ये पाहा! आता, जेव्हा आपण हे शिक्के फोडण्याकडे जातो. तुम्ही पाहणार आहात की, ह्यातील प्रत्येक शिक्क्यांचा संबंध वचनाच्या मागील सर्व गोष्टींशी आहे. संपूर्ण गोष्ट एकत्रितपणे, संपूर्ण गूज, ह्या शिक्क्यांमध्येच लपले आहेत. पाहिले? बायबलमधील प्रत्येक रहस्य ह्या शिक्क्यांमध्ये आहे. [भाऊ ब्रॅन्हम व्यासपीठावर पाच वेळा वाजवतात.—संपा.] आणि हे शिक्के त्या वेळेपर्यंत फोडले जाणार नाहीत. मी येथे, हे काही मिनिटातच सिध्द करतो.

152 लक्ष द्या. आता लक्षात ठेवा की, हे पुस्तक सीलबंद आहे. *येथे* एक शिक्का आहे. नंतर दुसरा शिक्का गुंडाळलेला आहे. दुसरा शिक्का गुंडाळलेला आहे. हे मुक्तीचे पुस्तक आहे. आणि हे संपूर्ण, एकत्र मिळून, हे पुस्तक बनते आणि ते पुस्तक सात शिक्क्यांनी मोहरबंद केलेले आहे. आणि, नंतर, ते पाठपोट लिहीलेले आहे; कारण ते गुंडाळलेले आहे. शिक्क्यांचे रहस्य आतल्या बाजूस आहे आणि ते एवढच म्हणते, "श्वेत घोडेस्वार" किंवा "काळा घोडेस्वार" आणि जे काही बाहेर लिहीले आहे, ह्या पुस्तकाचे संपूर्ण रहस्य उत्पत्तीपासून ते प्रकटीकरणापर्यंत ह्या शिक्क्यांमध्ये आहे. मुक्तिची संपूर्ण योजना ह्या सात शिक्क्यांत प्रकट केली आहे. ओह, हा महत्त्वूर्ण समय आहे. परमेश्वर हे समजण्यासाठी आपले सहाय्य करो! समजले?

153 आता "आणि एक बलवान देवदूत..." आता 2 रे वचन

...*आणि गुंडाळीवरचे शिक्के फोडून* ती उघडावयास *कोण योग्य आहे,* (कशासाठी योग्य?), असे मोठ्याने पुकारणारा, *एक बलवान देवदूत...*

154 आता आपण शोधूया. आता ते पुस्तक कोठे आहे? त्याच्या मुळमालकाकडे. कारण ते मानव जातीतील देवाच्या प्रथम पुत्राद्वारे हरवले गेले. आणि जेव्हा त्याचे अधिकार त्याने सैतानाचे ऐकण्यासाठी गमावले. त्याने गमावले...त्याने काय केले? त्याने देवाच्या वचनाऐवजी सैतानाचे ज्ञान स्विकारले. आता आपण थोडा वेळयेथे थांबू शकत नाही का? देवाचे पुत्र धार्मिक शिक्षण संस्थेच्या कल्पना देवाच्या वचनाऐवजी घेतील. पाहा तीच गोष्ट आदामाने केली. त्याचे अधिकार गमावले आणि जेव्हा तसे केले, ते थेट परत गेले. तुम्ही हे पाहू शकत नाही काय की, हा काळकुठे आहे? समजले? ते पुस्तक थेट मुळमालकाकडे परत गेले.

155 आणि योहान, आत्म्यामध्ये, येथे वर स्वर्गात उभा आहे. आता तो ह्या मंडळीच्या युगातून वर उचलला गेला आहे, त्याने मंडळीची युगे पाहिली. आणि मग 4थ्या अध्यायात, तो वर उचलला गेला. तो म्हणाला, "आणखी वर ये. मी तुला होणाऱ्या गोष्टी दाखविण्यास जात आहे."

156 आणि त्याने पाहिले राजासनावर एक बसलेला आहे, त्याच्या हातात उजव्या हातामध्ये एक पुस्तक आहे. आता त्याविषयी विचार करा आणि मग ह्या पुस्तकामध्ये मुक्तीचे दस्ताऐवज होते आणि ते सात शिक्क्यांद्वारे सीलबंद केले होते.

157 आणि तेव्हा एक देवदूत पुढे येतो. एक बलवान देवदूत मोठ्याने पुकारीत येतो, "हे पुस्तक उघडावयास कोण योग्य आहे. हे पुस्तक घेण्यासाठी? हे शिक्के फोडावयास कोण समर्थ आहे? हे पुस्तक उघडावयास कोण समर्थ होतात?" पाहा, तो देवदूत ते विचारतो, योहानाने ते पाहिले आणि तो म्हणाला, "आता, कोण योग्य आहे? त्याला येऊ दे..." ओह, माझ्या प्रभू! कदाचित मला असे वाटत असेल, ह्या प्रकारे "परंतु त्याला करु दे."

तो दूत म्हणाला, "त्याला करु दे…" *येथे* ते मुक्तिचे पुस्तक आहे! *येथे* ही मुक्तीची योजना आहे! *येथे* हा एकच मार्ग आहे. ज्याद्वारे तुमची मुक्ती होईल, कारण *येथेच* संपूर्ण स्वर्ग आणि पृथ्वीच्या मुक्तीचे मालकी हक्काचे दस्ताऐवज आहे.! "त्याला पुढे येऊ दे, जर तो येईल." ओह, माझ्या प्रभो! "आता बोल किंवा कायम त्याची शांती राखून ठेव. त्याला पुढे येऊ दे आणि ह्या पुस्तकाचा दावा करु दे. ते करण्यास कोण समर्थ आहे?"

158 आणि योहान म्हणाला:

> *स्वर्गात एकही मनुष्य योग्य आढळला नव्हता; पृथ्वीवर कोणी* मनुष्य योग्य आढळला नाही*; पृथ्वीखालीही* कोणी मनुष्य जीवंत नाही आणि मेलेल्यांतही नाही, योग्य आढळला नाही. कोणीही मनुष्य असे करण्यास योग्य आढळला नाही.

159 देवदूताचे पुकारणे सोडवणूक करण्याजोगा जवळच्या आप्तासाठी होता. देव म्हणाला, "माझ्याकडे नियमशास्त्र आहे; सोडविण्याजोगा जवळचा आप्त त्याची जागा घेऊ शकतो. तो सोडविण्यास समर्थ जवळचा आप्त कोठे आहे? ते घेण्यास कोण समर्थ आहे?"

160 आणि त्याने आदामापासून, सर्व प्रेषितांपर्यंत, आणि संदेष्टे तसेच, इतर सर्वांना पाहिले आणि कोणीच योग्य आढळले नाही. आता, ह्या विषयी काय? "स्वर्गात नाही, पृथ्वीवरही नाही, जीवंतातही नाही." एलिया तेथे उभा होता. मोशे तेथे उभा होता. सर्व प्रेषित तेथे उभे होते किंवा—किंवा सर्व जे मृत होते; सर्व पवित्रजण, इयोब, सर्व संतजण. तेथे उभे होते. प्रत्येक जण तेथे उभा होता, आणि कोणीही त्या पुस्तकाकडे पाहावयास समर्थ नव्हता, जो ते पुस्तक घेईल आणि ते शिक्के फोडील.

161 तर आता पोप आणि हे सर्व कोठे आहेत, जे येतील? तुमचे बिशप कोठे आहेत? आपली योग्यता कोठे आहे? आपण कोणीच नाही. ते बरोबर आहे.

162 त्याने सोडवणूक करणारा जवळच्या आप्तास, जर त्यास शक्य असेल तर पुढे येण्यास सांगितले, परंतु योहान म्हणाला, "कोणीही मनुष्य योग्य नव्हता."

163 असे काही नाही की, तिथे कोणी समर्थ लोकच नव्हते. जसे देवदूत; उदाहरणार्थ. जसे, आपण म्हणूया, गॅब्रीएल किंवा मीखाएल. परंतु लक्षात ठेवा. तो जवळचा आप्त असायला हवा होता. लक्षात घ्या, योहान येथे म्हणतो, "आणि कोणीही मनुष्य" देवदूत नाही. सराफीम नाही. त्यांनी पाप केले नव्हते. परंतु ते वेगळ्या वर्गात मोडत होते. ते कधीच पतीत झाले नाही.

164 परंतु तो सोडवणूक करणारा जवळचा आप्त असला पाहिजे. "कोणीही मनुष्य नाही." कारण त्यांच्यातील एकाचीही मुक्ती झाली नव्हती. "कोणीही मनुष्य त्याकडे पाहावयास समर्थ नव्हता." ओह, नाही! माझ्या प्रभू! म्हणून, त्याने एक जवळचा मनुष्य घेतला आणि त्याने त्याच्यासाठी मागणी केली आणि त्याला आढळला नाही. तेथे कोणीच नव्हता, कोणाकडेच नव्हता…बिशप नाही. आर्च बिशप नाही. याजक नाही. कुठल्याही श्रेणीत नाही. कोणाकडेच इतके पवित्रपण नाही की, त्या पुस्तकाकडे ते पाहू शकतील. होय, असेच आहे. ही एक वजनदार गोष्ट आहे. परंतु तसेच, बायबल सांगत आहे. मी फक्त जे योहानाने सांगितले, त्याचा उल्लेख करीत आहे.

बायबल सांगते की, योहान "रडला."

165 जशा प्रकारे काही लोक ते शिकवितात तसे नाही. मी एकदा एका मनुष्याला शिकविताना ऐकले. तो म्हणाला, "योहान रडला कारण, त्याने त्याला स्वतःला योग्य

समजू शकला नाही." ओह! कोणीही मनुष्य जो पवित्र आत्म्याने प्रेरित आहे, त्यास ह्यापेक्षा वेगळे समजेल, पाहा, देवाच्या प्रेरणेखाली, त्याला वेगळे प्रकटीकरण मिळेल.

166 परंतु योहान, "रडला," येथे मला असे वाटते की, तो का रडला. कारण, जर कोणीही ते मुक्तिचे पुस्तक उघडण्यास समर्थ नव्हते. तर पूर्ण निर्मिती नष्ट होईल.

167 *येथे* ते पुस्तक आहे. *येथे* ते मालकी हक्काचे दस्ताऐवज आहे आणि ते सोडवणूक करणारा जवळच्या आप्तास दिले जाईल, जो ती पात्रता पूर्ण करु शकेल. ते देवाचे स्वतःचे नियमशास्त्र आहे आणि तो त्याचे नियमशास्त्र अपवित्र करु शकत नाही. अधिक खरे म्हणजे पाहा, देवाला एक सोडवणूक करणारा जवळचा आप्त हवा होता. जो योग्य होता. जो ते करण्यास समर्थ होता. ज्याच्याकडे ते करण्याचे सामर्थ्य होते.

168 आणि देवदूत म्हणाला, "आता सोडवणूक करणारा जवळचा आप्त पुढे येवो."

169 आणि योहानाने पाहिले आणि त्याने पृथ्वीवर सगळीकडे पाहीले. त्याने पृथ्वीच्याखाली पाहीले आणि तेथे कोणीही नव्हता. तेथे निर्मिती आणि सर्वकाही हरवले होते. अर्थात, योहान रडला. सर्वकाही हरवले होते.

170 परंतु त्याचे रडणे खूप वेळ राहिले नाही, ती अगदी मिनिटासाठी. तेव्हा वडीलमंडळांपैकी एक जण उभा राहिला. म्हणाला, "योहाना, रडू नको." ओह, माझ्या प्रभू! त्याचे रडणे फार वेळराहिले नाही, परंतु काही मिनिटासाठी.

171 योहानाला वाटले, "ओह, माझ्या प्रभो, मनुष्य कोठे आहे? तेथे संदेष्टे उभे होते; त्यांचा जन्म माझ्यासारखाचा झाला. तेथे संतजन उभे आहेत. तेथे उभे...ओह, येथे कोणीही नाही?"

172 "मला एक मनुष्य हवा आहे, जो ते करण्यास समर्थ आहे. मला एक मनुष्य पाहिजे जो सोडवणूक करु शकतो."

173 आणि त्याला असा कोणी मनुष्य आढळला नव्हता. म्हणून योहान रडू लागला. ओह, सर्वकाही गमावले होते आणि तो फार रडला. आणि तो—तो दुःखी होता, कारण सर्वकाही पूर्ण निर्मिती, सर्व काही नष्ट होईल, जर त्यांना कोणीही मनुष्य आढळला नाही. परमेश्वरास गौरव असो! जर त्यांना कोणी, जो त्या मागण्या पूर्ण करु शकेल असा आढळला नाही, तर प्रत्येक मनुष्य आणि संपूर्ण जग आणि उत्पत्ती नष्ट होईल. ओह, सर्व गोष्टीचे पतन झाले होते. ते—ते—ते मुक्तिचे अधिकार, सार्वकालिक जीवनाचे—अधिकार, प्रकाश, हे सर्व अधिकार हरवून बसला होता, आणि तेथे कोणीही नव्हता जो किंमत देऊ शकेल. आणि योहान रडू लागला. कारण कोणीही योग्य नव्हता आणि कोणीही त्या पुस्तकाकडे पाहूही शकत नव्हता. ओह, त्याने मनुष्य घेतला. योहान रडला, कारण कोणीही ते करु शकत नव्हते आणि सर्वकाही गमावले होते.

174 आणि तेथे वडीलमंडळापैकी एकाची वाणी आली जो चार प्राणी आणि स्वर्गातील सर्व थोर यजमानामध्ये उभा होतो, म्हणाला, "योहान, रडू नको." ओह, माझ्या देवा!

175 [भाऊ ब्रॅन्हम दोनदा त्यांच्या हाताने टाळ्या वाजवितात.—संपा.] परमेश्वराची कृपा!

176 "योहान, भग्नहृदयी होऊ नको, रडू नको. पाहा 'यहूदा वंशाचा सिंह', 'दाविदाचा अंकुर', ह्याने जय मिळविला."

177 जय मिळविणे. (*प्रिवेल*) म्हणजे, "त्याबरोबर लढला आणि जय मिळविला." ओह. माझ्या देवा! गेथशेम बागेत, जेव्हा त्याच्या चेहऱ्यावर रक्ताचा घाम आला, तो जय मिळवित होता. समजले?

178 “सिंह आणि दाविदाचा अंकूर ह्याने, जय मिळविला, मात केली.”

179 ज्याप्रमाणे याकोब, जो फसविणारा होता. आणि जेव्हा त्याची देवदूताशी भेट झाली, त्याने त्यास पकडून ठेवले आणि देवदूत त्यांच्यापासून जाण्याचा प्रयत्न करीत होता. तो म्हणाला, “मी—मी तुला असेच जाऊ देणार नाही.” त्याने त्याला जे हवे होते, ते मिळेपर्यंत त्याच्याशी झोंबी केली. आणि त्याचे नाव बदलले, “फसवणुक करणारा”, म्हणजे *फसवणार्यांतून.* कशात? तर “देवाबरोबरचा राजकुमार,” हे *इस्त्राएल*. तो विजयी झाला.

180 आणि ह्या यहूदा वंशाच्या सिंहाने जय मिळवला, तो म्हणाला, “रडू नको, योहान. कारण यहूदा वंशाचा सिंह, दाविदाचा अंकूर, ह्याने जय मिळविला आहे. त्याने ते केले आहे. ते पूर्ण झाले आहे. त्याने ते केले आहे. ते पूर्ण झाले आहे. योहान.” ओह, ओह, माझ्या प्रभो! त्याने असे एक विरंजक उत्पन्न केले की, ते पापाला पुन्हा दुषित हातात पाठवते...ज्याने त्याच्या ज्ञानाने, मनुष्य जातीला अपवित्र केले. होय.

181 परंतु जेव्हा योहान पाहण्यास वळला, त्याने एक कोकरा बघितला. सिंहापेक्षा किती वेगळा! तो म्हणाला, “सिंहाने जय मिळवला आहे.” पुन्हा पाहा, मी तेथे पाहू शकतो. देव साधेपणात लपला आहे. तो म्हणाला, “तेथे सिंह आहे.” तो तर प्राण्यांचा राजा आहे. “सिंहाने जय मिळवला आहे.” सर्वात बलवान सिंह तेथे आहे.

182 मी आफ्रिकेच्या जंगलात राहिलो होतो आणि जिराफाचे किंचाळणे ऐकले होते आणि विशाल प्रबळहत्ती त्यांची सोंड हवेत उडवून, “व्ही, व्ही, व्ही,” करतो आणि वाळवंटातील रानटी प्राणी आपल्याच जातीच्या प्राण्यांना किंकाळी मारताना ऐकले आहे आणि किड्यांचा आवाजही ऐकला. आणि बीली पॉल आणि मी एका जुनी लहानशी जागा ज्यावर स्टॉकर्स लपटलेले होते, त्यात झोपलो होतो आणि दुरवरुन एका सिंहाची डरकाळी ऐकली आणि वाळवंटात सर्वकाही शांत झाले. इतके की किड्यांनीही भिरभिरणे थांबविले. जेव्हा राजा बोलला तसे झाले. ओह, ओह, ओह, ओह माझ्या देवा!

183 मी तुम्हाला सांगतो, जेव्हा राजा बोलतो; तेव्हा संप्रदाय आणि त्यांचे संशय जमिनदोस्त होतात. सर्वकाही शांत होते आणि *हा* महाराजा आहे. ते त्याचे वचन आहे. ओह!

184 त्याने म्हटले, “योहान, काळजी करु नको. रडू नको, रडू नको योहाना. हताश होऊ नकोस. मी तुला येथे दर्शनात पाहत आहे. मी तुला काही गोष्ट दाखवत आहे आणि मला माहित आहे, तू पूर्णपणे हताश झाला होता. कारण तुला माहित आहे की, तेथे सोडवणूक करण्यासारखे काहीच नाही. सर्वकाही लयास गेले होते. तेथे कोणीही नव्हते, जे मागणी पूर्ण करु शकत होते. परंतु यहुदा वंशाचा सिंहच करु शकतो...”

185 काय तुम्ही, यहुदाचा वंश जाणता...आपल्याकडे ते येथे फळ्यावर आहे, तुम्हाला माहीत आहे. यहूदा वंशाची निशाणी सिंह होता.

186 आठवा, सिंह आणि बैल आणि तो ज्याचे डोके मनुष्याचे होते आणि असेच पुढे आणि त्यांना सराफीम त्या वचनाकडे पाहत होते. ज्यावेळी मार्क, मत्तय, लुक आणि योहान सर्व प्रेषितांच्या कृत्यांच्या पुस्तकाभोवती उभे होते.

187 आणि मी एका मनुष्याला बोलताना ऐकले. एक थोर सेवक म्हणाला, “प्रेषितांच्या कृत्यांचे पुस्तक हे फक्त परांची बनविण्याचे काम आहे.”

188 ही तर पहिली द्राक्षवेल आहे. जी पवित्र मंडळी पहिली उगवली होती. होय, महाशय. आणि तिच्यातून दुसरी उगवली. ती दुसऱ्याच जातीची होईल. होय, महाशय! तुमच्याकडे

काही कलम केलेल्या द्राक्षवेली आहेत आणि त्यांना लिंबू आले आहे. त्यावर संत्रे आले पाहिजे होते. परंतु...पाहा? जेव्हा त्या द्राक्षवेलीला—दुसरी फांदी पुन्हा फुटेल, तर ती अगदी तिच्या मूळद्राक्षवेलीसारखीच होईल.

189 आणि मत्तय, मार्क, लुक आणि योहान ह्यांचे शुभवर्तमान होते. तेथे उभे राहून रक्षण करीत आहे. मनुष्याचे ज्ञान, सिंहाची ताकद, बैलाचे काम आणि चित्याची चपळता किंवा गरुडाची चपळता. होय, शुभवर्तमान तेथे उभे आहेत! काय? तुम्हाला लक्षात आहे काय की, आपण त्याचा कधी अभ्यास केला होता? हे *सात मंडळीच्या युगात* आहे. [मंडळी म्हणते, "आमेन."—संपा.]

आता तो म्हणाला, "यहुदा वंशाचा सिंह."

190 यहुदा वंशातूनच का? "हे यहुदा जोपर्यंत शिलो येत नाही, तोपर्यंत यहूदाकडून राजवेत्र जाणार नाही आणि राजदंड त्याच्या पायामधुन ढळणार नाही. परंतु तो यहूदामधूनच येईल."

191 "आणि त्या सिंहाने जो यहुदा वंशाचे चिन्ह आहे; जय मिळवला आहे. त्याने मात केली आहे."

192 आणि जेव्हा त्याने तो सिंह पाहण्याकरिता सभोवताली पाहिले, त्याने एक कोकरा पाहिला. विचित्र, सिंहाला बघण्यासाठी वळला आणि कोकऱ्याला पाहिले. वडिलाने त्याला सिंह संबोधले. परंतु जेव्हा यहोवाने पाहिले, त्याला एक कोकरा दिसला. "एक कोकरा जो जगाच्या स्थापनेपासून वधला गेला होता." एक कोकरा वधला गेला होता, ते काय होते? तो कोकरा कोण होता? तो रक्तबंबाळजख्मी होता. "एक कोकरा जो वधला होता, परंतु पुन्हा जीवंत झाला" आणि तो रक्तबंबाळहोता. ओह, माझ्या प्रभू!

लोकांनो, त्याच्याकडे पाहून, तुम्ही कसे पापी राहू शकतील?

193 कोकरा आत आला. वडिलमंडळापैकी एक म्हणाला, "सिंहाने मात केली आहे. यहूदा वंशाच्या सिंहाने." आणि योहान तो सिंह पाहण्याकरीता बघू लागला आणि तेथे एक कोकरा थरथरत आला. ज्यावर रक्त, जख्मा होत्या. त्याने जय मिळवला होता. तुम्ही म्हणू शकता की, तो युध्दात होता. तो वधला गेला होता. परंतु तो पुन्हा जीवंत झाला.

194 योहानाने कोकरा अगोदर पाहिला नव्हता. तुम्हाला समजले. त्याचा उल्लेख अगोदर केला नव्हता. कुठेही त्याचा उल्लेख केला नव्हता. योहानाला तो दिसला नाही, संपूर्ण स्वर्गात त्याने शोधले. परंतु येथे तो पुढे आला.

195 लक्ष द्या. तो कुठून पुढे आला? तो कुठून आला? तो पित्याच्या सिंहासनावरुन आला. जेथे तो वधल्यानंतर आणि पुन्हा उठल्यावर बसवलेला होता. "तो उठला आणि देवाच्या उजवीकडे बसला. मध्यस्थी करण्यासाठी तो सर्वदा जिवंत आहे." आमेन. तेथे उठला. आज त्याच्या स्वतःच्या रक्ताद्वारे एक मध्यस्थ म्हणून लोकांच्या अज्ञानाने केलेल्या पापांसाठी मध्यस्थी करीत आहे. आताही तो एकच आहे, ज्यावर मी अवलंबून आहे. अजूनही त्याच्यावर ब्लीचचे आच्छादन आहे, ते म्हणजे पापक्षमेचे ब्लीच.

196 यहोवाने त्या कोकऱ्याकडे पाहीले, आणि तो कोकरा असा दिसत होता की, जणू काही त्याचा वध करण्यात आला होता. आणि मग त्याने पाहिले, तो जख्मी होता, आणि कापलेला, आणि दुःखी आणि रक्तबंबाळ. एक रक्तबंबाळ कोकरा, ज्याने आपली जागा घेतली. ही विचित्र गोष्ट नाही काय? एक साधारण कोकरा आपली जागा घेतो? आणि त्याने एक कोकरा पाहिला. तो बाहेर निघून गेला.

197 यहोवाने त्या कोकऱ्याला कधीही पाहीले नव्हते; कारण तो अनंतकालात होता आणि मध्यस्थिही करीत होता. आणि दर्शवित होता की, जे लोक देवाकडे बैल, बकर्यांच्या रक्ताचे बलिदान घेऊन आले, ते एक पर्यायी बलिदान होते. ते बलिदान त्या कोकऱ्याला दाखवित होते. त्यावर विश्वास करण्यास लावित होते आणि तो पर्यंत रक्त सांडले गेले नव्हते. म्हणून तो त्यांना शुध्द करण्यासाठी तेथे होता. तो तुम्हाला आणि मला शुध्द करण्यासाठी तेथे होता.

198 आणि, ओह प्रभू, मी आशा करतो की, आज रात्रीही तो तेथे आहे. प्रत्येक पाप्यासाठी तो वधला गेला. यहोवा काहीही कसे पाहू शकत होता. परंतु त्या रक्तबंबाळकोकऱ्यालाच उभा असलेला पाहू शकत होता.

199 आणि आता त्या दृष्टांतात कोकरा बाहेर निघून जातो. कारण तो वधला गेला आहे. लक्ष द्या. पित्याच्या सिंहासनावरुन येतो. ओह, विचार करा. ह्या दर्शनात तो कुठून पुढे येतो? तो गौरवातून येतो, जेथे तो परमेश्वराच्या उजव्या हाताकडे बसलेला आहे. तो गौरवातून, योहानाकडे पुढे येतो.

200 ओह, ही किती गौरवयुक्त गोष्ट होईल. जर आज रात्री आपण आपले पापमय विचार बाजूला सारुन त्याचा स्विकार करु आणि तोही आज रात्री गौरवातून निघून त्यास प्रकट करण्यासाठी तुमच्यातील कोणाकडे येईल. 2010 तो कोकरा गौरवातून त्याच्या मुक्तीचा दावा करण्यासाठी मध्यस्थी करण्यासाठी येत आहे!

201 ठीक आहे. *येथे* तो त्याच्या मध्यस्थीच्या कामासाठी पुन्हा आहे. परंतु लक्षात ठेवा, हे शिक्के उघडले जाण्यासाठी तयार आहे आणि कोकरा देवाच्या पवित्र स्थानातून पुढे येत आहे.

202 आपण तेथे त्या समयाकडे जाईपर्यंत थांबूया. तो “अर्धा तास” तेथे निवांत आहे. पवित्र स्थानात धूर होता. तेथे ह्यापुढे मध्यस्थीचे कार्य होणार नाही. अर्पण झाले होते. ते एक न्यायासन आहे. तेथे त्यावर आता रक्त राहीले नाही. कारण रक्तबंबाळझालेला कोकरा आता निघून गेला आहे. तुम्ही त्या वेळेपर्यंत थांबू नका. तुम्हाला लक्षात आहे की, जुन्या करारात? जेव्हा रक्त दयासनावरुन जाते, तेथे न्याय येतो. परंतु जोपर्यंत रक्त तेथे असे, तेथे दया होती. (भाऊ ब्रॅन्हम व्यासपीठ पाच वेळा ठोठावतात.) परंतु जेव्हा तो कोकरा निघून जातो, तेव्हा असेच होते.

203 तो काय करीत होता? तो एक मध्यस्थी करीत होता. दुसरा कोणीही नाही. मग मला सांगा, मरिया कुठे मध्यस्थी करु शकत होती? मरिया काय अर्पण देऊ शकत होती? संत फ्रांन्सीस, संत असीसी किंवा कोणी आणि संत सिसीलिया म्हणजे किंवा कोणीही मनुष्य काय करु शकतो? योहानाने कधीही असे पाहीले नाही की, हजारो संत मध्यस्थीचे कार्य करण्यास आले आहे. “त्याने एक कोकरा बघितला. एक कोकरा जो वधला गेला होता. रक्तबंबाळ होता.” मी ह्याची पर्वा करीत नाही की, किती संतांचा वध झाला होता. ते सर्वच त्यांतील प्रत्येक जण त्यासाठी देणेकरी होते. जसे त्या डाकूने क्रूसावर सांगितले होते, “आपण सर्वांनी पाप केले आहे आणि म्हणून आम्हाला ही शिक्षा मिळत आहे. परंतु ह्या मनुष्याने काहीच केले नाही.” तो एकटाच मनुष्य होता, जो योग्य होता.

204 येथे तो मध्यस्थीच्या चौकटीतून बाहेर येतो. आता तो काय म्हणून येत आहे? त्याचे निरिक्षण करा. ओह! ओह! माझ्या! (भाऊ ब्रॅन्हम, तीन वेळा टाळ्या वाजवतात.)

205 योहान रडत होता. ते सर्व होते—सर्व कोठे? काय घडणार आहे?

206 एका वडिलाने म्हटले, “योहाना, रडू नको.” म्हणाला, “पाहा तो सिंह येत आहे. तो एकच आहे. जो जयवंत झाला आहे.” जेव्हा त्याने पाहीले, तेव्हा त्याने एक कोकरा, जो रक्तबंबाळहोता, ज्यांचा वध करण्यात आला होता. त्याला येताना पाहीले.

207 कोणीही जो वधला जातो, तो रक्तबंबाळहोतो. तुम्हाला माहीत आहे, त्याला मारण्यात आले होते. त्याची मान कापण्यात आली होती किंवा काहीतरी त्याच्यावर सर्वत्र रक्त होते.

208 आता तो कोकरा येतो, जो वधला गेला होता आणि तो पुढे येतो. ओह, बाप रे! काय? त्याचा मुक्तीचा दावा करण्यासाठी आमेन. ओह!...तुम्हाला असे वाटत नाही की, एका कोपऱ्यात जावे. खाली बसावे आणि काही वेळरडावे? येथे एक कोकरा येतो. जो रक्तबंबाळहोता. योहानाने पाहीले तेथे असा कोणी नव्हता, जो हे करु शकत होता. सर्व ख्यातनाम व्यक्ति तेथे उभे होते. परंतु त्यांच्यातील कोणीही ते करु शकत नव्हते. म्हणून तेथे आता कोकरा येतो. त्याचे मध्यस्थीचे दिवस संपुष्टात आले आहेत, त्याचे मध्यस्थीचे दिवस.

209 असे तेव्हा होईल, जेव्हा तो बलवान दूत तेथे उभा असेल. आपण शिक्क्यांच्या विषयावर जाईपर्यंत तुम्ही थांबा. “आणि आणखी समय नसेल.” ते खरे आहे. तो “अर्ध्या तासाचा निवांत” लक्ष द्या की, त्या अर्ध्या तासाच्या निवांतात काय घडले, जेव्हा तो सातवा शिक्का फोडला गेला. जर प्रभूची इच्छा असेल, तर आपण ते पुढच्या रविवारी रात्री पाहू.

210 तो (कशासाठी?) आता त्याचा मालकी हक्क घेण्यासाठी पुढे येतो. ओह, माझ्या प्रभू! त्याचा मालकी हक्क घेण्यासाठी पुढे येतो! आता, त्याने जवळच्या आप्ताचे काम केले. तो मनुष्य बनून खाली आला. मृत्यु पावला. त्याने मुक्तिसाठी जवळच्या आप्ताचे काम केले. परंतु अजून त्याचा मालकी हक्क मागितला नव्हता. आता तो त्याच्या हक्कांचा दावा करण्यासाठी दृश्य स्थितीत आला. (काय घडते, ते लक्षपूर्वक पाहा.) ओह, बाप रे! तो अशाकरीता वधला गेला होता की, मनुष्याकरीता जवळचा आप्त बनण्यासाठी त्याला मुक्त करण्यासाठी त्याच्याऐवजी गेला. परंतु तो वडील बरोबर होता जेव्हा तो म्हणाला होता, तो एक “सिंह,” होता. समजले. वडिलाने त्यास एक “सिंह,” म्हणून संबोधिले, कारण तो एक कोकरा होता. एक मध्यस्थ, एक रक्तबंबाळकोकरा. परंतु आता तो एक सिंह म्हणून पुढे येत आहे. त्याचे मध्यस्थी करण्याचे दिवस संपले आहेत.

211 “मलिनतेने वागणारा माणूस स्वतःला मलिन करीत राहो. नितीमान माणूस नैतिक आचरण करीत राहो. पवित्राचरणी माणूस स्वतःला पवित्र करित राहो.” मध्यस्थीचे कार्य संपलेले आहे. ओह, भावा! मग ह्यानंतर काय? नंतर काय?

212 आणि लक्षात घ्या. तो सातव्या मंडळीच्या युगात येतो. जेव्हा देवाची गूजे उघडली जातात. आता बारकाईने पाहा, हे असे जे तुम्हाला समजलेच पाहीजे? आता, तो त्याचे मध्यस्थीचे काम करीत आहे. विश्वासणार्यांसाठी मध्यस्थी करीत आहे. दोन हजार वर्षांसाठी तो तेथे एक कोकरा म्हणून आला होता. आता तो अनंतकालातून त्याच्या मालकी हक्काचे पुस्तक घेण्यासाठी आणि शिक्के फोडण्यासाठी आणि गूजे प्रकट करण्यासाठी येत आहे. ते केव्हा होईल? अंतिम समयात. तुम्हाला हे समजत आहे? ठीक आहे मग आपण पुढे जाऊया.

213 तुम्हाला हे समजत आहे? [मंडळी म्हणते, “आमेन.”—संपा.] ठीक आहे. मग आपण पुढे जाऊया.

214 आता, शिक्के फोडले आणि सर्व गूजे त्यांना प्रकट केली, सातव्या दूताला, ज्याचा संदेश देवाची सर्व गूजे प्रकट करण्याचा आहे. देवाची सर्व गूजे ह्या सात शिक्क्यात ठेवलेली आहेत. पाहिले? तेच तो येथे सांगत आहे. ती सर्व गूजे ह्या सात शिक्क्यात ठेवलेली आहेत.

215 आणि हा कोकरा आता देव आणि मनुष्य ह्यांचा मध्यस्थ म्हणून पुढे येत आहे. तो एक सिंह बनतो आणि जेव्हा तो सिंह बनतो. तो ते पुस्तक घेतो. ते त्याचे अधिकार आहेत. देवाची ही गूजे होती; परंतु आता कोकरा येत आहे.

216 ते पुस्तक कोणीही घेऊ शकत नव्हता. ते अजूनही देवाच्या हातात आहे. पोप, धर्मगुरु, कोणीही असो, हे कोणीही ते पुस्तक घेऊ (नाही) शकत नाही. ते सात शिक्के प्रकट झालेले नाहीत. समजले?

217 परंतु जेव्हा, मध्यस्थ, जेव्हा त्याचे मध्यस्थीचे कार्य झाले आहे. तो पुढे येतो. आणि योहान...वडील म्हणतो, "तो सिंह आहे." आणि तो पुढे येतो, त्याच्याकडे पाहा. ओह, बाप रे! पाहिले? तो ते पुस्तक घेण्यासाठी पुढे येतो, आता लक्ष ठेवा की, देवाची गूजे प्रकट करावी, ज्याविषयी इतरांनी, ह्या सर्व संप्रदायाच्या युगात केवळअंदाज केला होता.

218 ह्यानंतर, सातवा दूत पाहा. जर हे पुस्तक, गूजे, देवाचे वचन आहे, तर तो सातवा दूत संदेष्टा असला पाहीजे, कारण देवाचे वचन संदेष्ट्याकडेच येते. कोणताही याजक, पोप, किंवा इतर कोणाकडेही, येऊ शकत नाही. देवाचे वचन अशांकडे येत नाही. देवाचे वचन सदैव फक्त संदेष्ट्यांकडेच येते. मलाखी 4 ह्याविषयी वचन देते. आणि जेव्हा तो पुढे येतो, तो देवाची गूजे प्रकट करतो. जेथे मंडळी ह्या सर्व संप्रदायाच्या विकल्पात गुंतलेली असेल. "आणि पुत्रांचे विश्वास पुन्हा पित्याकडे पुन्हा उभारण्याद्वारे वळविले." आणि तेव्हा जगावर न्याय येईल, आणि पृथ्वी भस्म केली जाईल. आणि मग नितीमान जन हजार वर्षाच्या काळात दुष्टांच्या राखेवर चालतील.

219 आता तुम्हाला हे लक्षात आले काय? (मंडळी म्हणते,"आमेन."—संपा.) सर्व ठीक आहे.

220 संप्रदायाच्या युगांमध्ये, इतरांनी ह्याविषयी अंदाज केला होता. परंतु पाहा, तो हाच मनुष्य असला पाहीजे, सातवा दूत...प्रकटीकरण 10:1—4 मध्ये सांगितल्याप्रमाणे... सातव्या दूतास देवाची गूजे देण्यात आली, आणि तो सर्व गूजे पूर्ण करील, जी संप्रदायाच्या युगात प्रकट करण्याची राहून गेली होती.

221 आता तुम्ही पाहू शकता की, मी का माझ्या संप्रदायातील भावावर प्रहार करीत नाही. ही संप्रदायाची प्रणाली आहे. ते हे करीत नाही. त्यांना हे जाणण्याचा प्रयत्न करण्याची आवश्यकता नाही; कारण, हे त्यांना प्रकट केले जाणार नाही. हे वचनाप्रमाणे आहे. त्यांनी ह्याविषयी अंदाज केला आणि विश्वास केला की, ते तेथे आहे आणि विश्वासाद्वारे ते चालले. परंतु आता ते प्रमाणाद्वारे सिध्द झाले आहे. आमेन. ओह! माझ्या प्रभू, किती—किती अद्भूत वचन आहे!

222 आता लक्ष द्या. तेव्हा तो, जो कोकरा त्याचे शाही स्थान घेतो, जेव्हा त्याचे संतजन त्याला "प्रभूंचा प्रभू आणि राजांचा राजा" असे म्हणून मुकूट घालण्यासाठी येतात. समजले?

223 पाहा, "समय निघून गेला आहे." प्रकटीकरण 10:6 म्हणते, "आणखी अवकाश लागणार नाही."

224 लक्ष द्या, कोकऱ्याला सात शिंगे आहेत, ते तुम्ही पाहीले काय? "त्याला सात शिंगे आहेत." आपण आताच ते पाहीले. *शिंगे* म्हणजे, एका पशुसाठी, "सामर्थ्य" आहे. आणि लक्ष द्या, तो पशू नाही; कारण, त्याने त्याच्या उजव्या हातातून ते पुस्तक घेतले, जो राजासनावर बसलेला होता. पाहा, लक्ष द्या. ओह, माझ्या प्रभू!

225 मला वाटते, मी येथेच कोठे शिक्के फोडले जाणे आणि मालकी हक्काच्या दस्ताऐवजाचे सोडविले जाणे आणि शेवटच्या दूताचा संदेश ह्या गोष्टी लिहून ठेवलेल्या आहेत. आणि तो त्याचे शाही स्थान ग्रहण करतो. तेच करण्यासाठी आता तो येत आहे.

आता जेव्हा तो येतो, "त्याच्या सात शिंगाकडे," लक्ष द्या.

226 आता, जेव्हा त्याने हा कोकरा पाहिला, योहान त्याकडे पाहत आहे. जेव्हा त्याने पाहिले, तो जणू काही असा दिसत होता की, त्याचा वध केला गेला आहे, तो रक्तबंबाळझाला होता आणि तो अनंतकालातून आला आहे, आणि तो मध्यस्थीचे कार्य समाप्त करुन आला आहे.

227 आता तुम्हाला हवी तितकी मरियेची प्रार्थना करा! "स्वर्गात नाही आणि पृथ्वीवर आणि कोठेही असा व्यक्ति नाही, तो ते पुस्तक घेऊ शकतो." योहान त्यासाठी रडतोही. ओह, कॅथॉलिक मित्रा, तू ते पाहत नाहीस काय? कोणा मृत व्यक्तिची प्रार्थना करु नका.

228 तो कोकराच फक्त मध्यस्थ आहे. समजले? तो तोच आहे, जो पुढे आला आणि आता तो काय करीत आहे? तो पुन्हा येथे मध्यस्थीचे कार्य करीत आहे, जोपर्यंत त्याचे रक्त प्रत्येक व्यक्तिसाठी प्रायश्चित्त करीत नाही आणि त्या कोकऱ्याला माहीत आहे की, त्या पुस्तकात काय लिहीले आहे. म्हणून त्याला माहीत होते, जगाच्या स्थापनेपासून त्यांची नावे त्या पुस्तकात होती. त्यांच्यासाठी तो तेथे उभा आहे...आणि—आणि मध्यस्थीचे कार्य करीत आहे. जोपर्यंत तो प्रत्येक जण ज्यांची नावे त्या पुस्तकात आहेत, ते मुक्त होईपर्यंत त्याचे मध्यस्थीचे कार्य चालू आहे आणि ते पूर्ण झाले आहे आणि आता तो बाहेर येतो. पाहा? त्याने त्याचे जवळच्या आप्ताचे काम केले आहे. त्याने पूर्ण केले आहे... तुम्हाला ठाऊक आहे की, जवळच्या आप्ताचे काय काम आहे? वडीलजनांसमोर सिध्द करणे की, तो निकटचा आप्त आहे. तुम्हाला लक्षात आहे की, बवाज पायतण काढतो, फेकतो आणि अशाप्रकारे? त्याने हे सर्व आता केले आहे.

229 आता तो त्याच्या वधूला घेण्यासाठी येत आहे. आमेन. तो आता राजा म्हणून येत आहे. तो त्यांच्या राणीचा शोध करीत आहे. आमेन. आमेन. ह्या पुस्तकात त्याचे सर्व रहस्य ह्या सात शिक्क्यांत आच्छादिलेले आहे. ओह, भाव. पाहा, सात शिक्के त्याच्या येण्याची वाट पाहत आहेत. अवलोकन करा.

230 आपण ह्या चिन्हांकडे पाहूया. ठीक आहे. आता केवळनऊ वाजले आहेत. आपल्याकडे जाण्यासाठी तीन किंवा अधिक तास आहेत. आपल्याकडे...आपण फक्त... सैतान मला सतत सांगत राहतो की, ही लोकं कंटाळली आहेत; म्हणून मला वाटते की, ते थकले आहेत. परंतु हे आपण कसेही करुन आता पाहूया.

231 "सात शिंगे" ह्या सात मंडळ्या आहेत. समजले? सात मंडळीची युगे. कारण तेथे कोकऱ्याचे संरक्षण होते. पृथ्वीवर त्याच्या अधिकाराचे रक्षण, त्याने देवाने पाठविलेल्या लोकांच्या समुहाद्वारे केले. तेच कोकऱ्याचे शिंग होते, समजले.

232 "सात डोळे," हे सात मंडळीच्या युगाचे सात संदेशवाहक आहेत. "सात डोळे," सात संदेष्टे आहेत.

233 तुम्हाला काही वचने लिहून घ्यायला आवडतील काय? आपण जरा त्यांच्याकडे वळूया. तुम्ही काय म्हणता, तुमच्याकडे एवढा वेळआहे काय? [मंडळी म्हणते, "आमेन."—संपा.] ठीक आहे. आपण जखऱ्याकडे जाऊया. जखऱ्याचे पुस्तक अगदी थोडाच वेळआणि आपण—आपण त्यांतील काही वचने वाचूया.

234 मी—मी तुम्हाला ह्या गोष्टीवर खुप वेळथांबवू इच्छित नाही; परंतु तरीही ते तुम्ही गमवावे ही माझी इच्छा नाही. ह्या वचनापेक्षा आणखी काय अधिक महत्त्वाचे आहे? [मंडळी म्हणते, "आमेन."—संपा.] होय, दुसरे काय अधिक आहे...[मंडळीतून कोणीतरी म्हणते, "भाऊ ब्रॅन्हम?"] काय? ["तुम्ही ते मोजू नका"] मनुष्याकरिता सार्वकालिक जीवनापेक्षा अधिक काहीच महत्त्वाचे नाही आणि आपण ते आता मिळवलेच पाहीजे आणि खात्री करा की, आपल्याला ते मिळाले आहे. ठीक आहे, ठीक आहे. महाशय.

235 आणि आता, आपण जखऱ्या 3रा अध्याय वाचू इच्छितो. मला वाटते ते बरोबर आहे. आता जखऱ्या 3. आपल्याला ती चिन्हे येथे आता मिळणार आहेत, जर माझ्याकडे माझी वचने लिहीलेली आहेत. ह्या दुपारी जेव्हा मी ती बोलले, मी सर्वत्र नुसता ओरडत होतो. म्हणून मला अगदी माहीत नाही की, मला ती बरोबर मिळाली आहेत की—नाही? मला वाटते, मला मिळाली आहेत. जखऱ्या 3 आपण पाहूया. माझ्याकडे येथे 89 लिहीले आहे. परंतु ते 8 ते 9 असले पाहीजे. ठीक आहे. सर्व ठीक आहे. मला माहीत आहे, ते 89 असू शकत नाही. जखऱ्या 3:8 आणि 9.

> *आता हे मुख्य याजका, यहोशवा तू व तुजबरोबर बसणारे तुझे सोबती तुम्ही ऐका; ती मनुष्ये चिन्हादाखल आहेत; पाहा, मी माझा सेवक जो कोंब* (ख्रिस्त) *त्याला आणितो.*
>
> *मी यहोशवा पुढे ठेविलेला चिरा पाहा; एका चिऱ्याला* (दगड) *सात डोळे आहेत.* (सात डोळे) *पाहा. सेनाधीश परमेश्वर म्हणतो, मी* त्यावर *नक्षी खोदीन व त्या देशाचा अधर्म एका दिवसात दूर करीन.*

236 आता आपण जखऱ्या 4:10 कडे वळूया. लक्षपूर्वक ऐका.

> ...*तर कार्याचा अल्पारंभाचा दिवस कोणी* (देव जो साधेपणात राहतो, पाहा) *ते सात डोळे जरुब्बाबेलाच्या* हातातील *ओळंबा आनंदाने पाहतील;* ते *परमेश्वराचे डोळे जगभर फिरत असतात.*

237 "हे सात डोळे." *डोळे* म्हणजे "बघणे." *बघणे* म्हणजे, "संदेष्टे, द्रष्टे." ह्या कोकऱ्याला सात शिंगे होते आणि प्रत्येक शिंगावर एक डोळा होता. "सात डोळे." हे काय आहे? ख्रिस्त आणि त्याची वधू. सात मंडळीची युगे. त्यांतून सात संदेष्टे आले. सात भविष्यवादी, डोळे म्हणून शेवटचा हा संदेष्टाच आसला पाहिजे. [भाऊ ब्रॅन्हम व्यासपीठ दोनदा वाजवितात; जेव्हा ते म्हणतात, "एक भविष्यवादी."—संपा.] सर्व ठीक आहे.

238 लक्ष द्या. तो एक प्राणी नाही. "त्याने त्याच्या उजव्या हातातून पुस्तक घेतले, जो राजासनावर बसलेला होता." तो कोण होता? मालक—मूळमालक. त्याच्या उजव्या हातात मुक्तिचे पुस्तक होते आणि ती जागा कोणीही स्वर्गदूत, कोणीही स्वर्गीय प्राणी इतर कोणीही घेऊ शकत नाही. "आणि हा रक्तबंबाळकोकरा बाहेर निघून येतो आणि त्याच्या हातातून ते पुस्तक घेतो." वा! हे काय आहे? भाऊ, हीच वचनात सर्वोत्कृष्ट गोष्ट आहे. आमेन. असे कार्य जे कोणी स्वर्गदूत कोणीही करु शकत नाही "आणि कोकरा आला आणि ते पुस्तक जो राजासनावर बसलेला होता, त्याच्या उजव्या हातातून घेतले."

239 ते काय आहे? आता ते पुस्तक त्या कोकऱ्याचे आहे. आमेन. देवाच्या नियमशास्त्राला गरज होती. तोच तो आहे. जो ते पकडतो. देवाच्या नियमशास्त्राप्रमाणे एका सोडविणाऱ्या जवळच्या आप्ताची गरज होती. आणि कोकरा ते पुस्तक घेऊन बाहेर आला. "मी त्यांचा जवळचा आप्त आहे, मी त्यांचा मुक्तिदाता आहे. मी आता...मी त्यांच्याकरिता मध्यस्थी केली आहे आणि आता मी त्यांच्या अधिकारांचा त्यांच्यासाठी दावा करण्यास आलो आहे." आमेन. तेथे तो फक्त एकटा आहे. "मी त्यांच्या अधिकारांचा दावा करण्यासाठी आलो आहे. त्यांना त्या सर्व गोष्टींवर अधिकार आहे, ज्या पतनामुळे हरविल्या होत्या. आणि मी किंमत दिली आहे."

240 ओह भाऊ! वा! ह्यामुळे तुम्हाला आतून धार्मिक असल्यासारखे वाटत नाही काय? [मंडळी म्हणते, "आमेन."—संपा.] "आपण केलेल्या कृत्यांमुळे नव्हे, परंतु त्याच्या दयेमुळे."

241 ओह, एक मिनिट थांबा आणि ते वडिलजन आणि सर्व आपले मुकूट काढून टाकू लागले; आणि मान्यवर लोक भूमिवर येऊ लागले. पाहा.

कोणी नाही, कोणीही ते करु शकत नव्हते.

242 आणि तो थेट देवाच्या उजव्या हाताकडे चालून गेला, आणि त्याच्या हातातून ते पुस्तक घेतले, आणि त्याच्या अधिकारांचा दावा केला. "मी त्यांच्यासाठी मेलो. मी त्यांचा सोडविणारा जवळचा आप्त आहे. मी आहे. मी मध्यस्थ आहे. माझे रक्त सांडले गेले. मी मनुष्य झालो. आणि मी हे माझ्या मंडळीस पुन्हा मिळवण्याकरता केले, ज्यांना मी युगाच्या स्थापने अगोदर पाहीले होते. मी तो उद्देश पूर्ण केला आहे. मी हे बोललो आहे की, ती तेथे असेल. आणि कोणीही ते पुस्तक घेण्यास समर्थ नव्हते. परंतु मी स्वतः खाली गेलो आणि ते केले. मी त्यांचा जवळचा आप्त आहे. मी निकट कुटुंबी बनलो." आणि त्याने ते पुस्तक घेतले. आमेन.

243 ओह, आज रात्री माझ्यासाठी तेथे कोण वाट बघत आहेत? तो तेथे कोण आहे. जे तुमच्यासाठी तेथे मंडळीचे वाट पाहत आहेत? दुसरे कोण वाट पाहू शकते? तो सोडविणारा जवळचा आप्त! ओह, माझ्या प्रभु! किती महत्त्वाचे वाक्य आहे किंवा कार्य आहे!

244 आता त्याच्याकडे मुक्तिचे, मालकी हक्काचे दस्ताऐवज आहे. ते त्याच्या हातात आहे. आता मध्यस्थी पूर्ण झालेली आहे. त्याच्या हातात ते पुस्तक आहे. लक्षात घ्या. ते सदैव देवाच्या हातामध्ये होते. परंतु आता ते कोकऱ्याच्या हातात आहे. आता लक्ष द्या. मुक्तिच्या मालकी हक्काचे, सर्व उत्पत्तीचे, दस्ताऐवज त्याच्या हातात आहे आणि त्याचा मनुष्यजातीसाठी परत दावा करण्यासाठी तो आला आहे. तो स्वर्गदूतासाठी त्याचा दावा करण्यास आला नाही. त्याने त्याचा दावा मनुष्यासाठी केला, जे त्यांना देवाचे पुन्हा पुत्र आणि कन्या बनवण्यासाठी दिले होते; त्यांना पुन्हा एदेन बागेत आणावे; त्यांनी सर्व गमावले होते; सर्व सृष्टी, झाडे, प्राणी जीवन इतर सर्व ते त्यांना परत द्यावे. ओह, बापरे!

245 काय ह्यामुळे तुम्हाला चांगले वाटत नाही काय? [मंडळी म्हणते, "आमेन."—संपा.] मला वाटले मी थकून गेलो आहे, परंतु आता मी थकलेलो नाही. पाहीले? कधीतरी मला वाटते मी प्रचार करण्यासाठी—खूप म्हातारा झालो आहे, आणि मी असे काहितरी पाहतो, आणि मला वाटते मी पुन्हा तरुण झालो आहे. होय हू! ह्या गोष्टी तुम्हाला काहीतरी करतात. समजले?

246 कारण मला माहित आहे की, तेथे कोणीतरी आहे, जे माझ्यासाठी वाट पाहत आहे. तेथे कोणीतरी माझ्यासाठी किंमत मोजली आहे, जी मी—मी मोजू शकलो नसतो. ते खरे

आहे. चार्ली, त्याने ते माझ्यासाठी केले. ते तुझ्यासाठी केले. त्याने ते सर्व मनुष्यजातीसाठी केले आणि आता तो त्याच्या मुक्तिच्या अधिकाराचा दावा करण्यासाठी आला आहे. त्याचा दावा तो कोणासाठी करीत आहे. त्याच्यासाठी नाही, आमच्यासाठी दावा करीत आहे. तो आपल्यातील एक आहे. तो आपला आप्तजण आहे. ओह, माझ्या प्रभू! तो माझा बंधुजन आहे. तो माझा तारणारा आहे. तो माझा देव आहे. तो माझा सोडविणारा जवळचा आप्त आहे. तो सर्वस्व आहे. कारण त्याच्याशिवाय मी काय आहे, किंवा त्याच्याशिवाय मी काय असू शकतो? त्यामुळे, पाहा, तो माझा सर्वस्व आहे. आणि तो तेथे आपला आप्तजन म्हणून उभा आहे आणि आता ह्या वेळेपर्यंत तो आपल्यासाठी मध्यस्थी करीत आहे. आणि आता तो पुढे येतो आणि मुक्तिचे पुस्तक त्याच्या अधिकारांचा, त्याने जे केले आहे त्याचा दावा करण्यासाठी येतो.

247 ते मरण पावले. येशू म्हणाला, “जो माझ्यावर विश्वास ठेवतो, तो मृत असला, तरी तो जगेल. जो कोणी जीवंत आहे आणि माझ्यावर विश्वास ठेवतो, तो कधीच मरणार नाही. जो माझा देह खातो आणि माझे रक्त पितो, त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त झाले आहे. मी त्याला शेवटल्या दिवशी उठवीन.”

248 काही फरक पडत नाही की, तो पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या, चोथ्या, पाचव्या, सहाव्या किंवा सातव्या समयात झोपी जातो. तो कुठे झोपी जातो, काय होईल? देवाची तुतारी वाजेल. शेवटची तुतारी वाजेल. त्याचवेळी शेवटचा दूत त्याचा संदेश देईल आणि शेवटचा शिक्का उघडला जाईल. ती अंतिम तुतारी वाजेल, आणि मुक्तिदाता त्याचे सोडविलेले वतन त्याची रक्ताने धुतलेली मंडळी घेण्यास येतो.

249 आता, ओह, संपूर्ण सृष्टी त्याच्या हातात आहे, ज्यावर संपूर्ण मुक्तिची योजना सात रहस्यमय शिक्क्यांद्वारे, ह्या पुस्तकात जे त्याने घेतले त्यात सीलबंद केली होती. आता लक्षपुर्वक पाहा. “आणि तो एकटाच ज्या कोणास प्रकट करण्याची त्याची इच्छा आहे, त्यास प्रकट करील.” ते पुस्तक त्याच्या हातात आहे. समजले? आता त्याने वचन दिले आहे की, ते त्या वेळेस आता कारण मुक्तिचे पुस्तक गूजांच्या सात शिक्क्यांच्याद्वारे सील बंद केलेले आहे. आता पाहा, जसे आता…

250 मित्रांनो, मी तुम्हाला म्हटले होते की, मी तुम्हाला साडे आठ वाजेपर्यंत बाहेर जाऊ देईन, परंतु ह्यावर येण्यासाठी मला तीन किंवा चार पाने सोडून यावे लागले आहे, म्हणून मला वाटते…आधीच नऊ वाजून गेले आहे. ह्यासाठी की तुम्ही उद्या येथे येऊ शकाल.

251 परंतु आता ह्या मुक्तिच्या, सातस्तरीय शिक्क्यांच्या पुस्तकात जे कोकऱ्याने स्वतः घेतले होते आणि केवळ, तो केवळएकच होता, जो ते घेऊ शकत होता आणि तो ते त्याच्या उजव्या हातातून घेतो. जो राजासनावर बसलेला होता. आता त्याच्या मुक्तिचा दावा करण्यासाठी, त्याच्या अधिकाराचा दावा करण्यासाठी. माझ्या आणि तुमच्यासाठी त्याचा दावा करील. ज्यापासून त्याने आपल्याला सोडविले, ते सर्व जे आदामाने एदेन बागेत गमावले होते, ते परत मिळवावे. त्याने आपल्याला पुन्हा ते सर्व मिळवून दिले.

252 आता आपण त्या कोकऱ्याकडून, ज्याच्या हातात ते पुस्तक आहे, त्याचा अनुग्रह आणि दया आपल्यावर मागण्यासाठी तयार आहोत, ह्यासाठी की सात शिक्क्याचे पुस्तक त्याने उघडावे आणि आपण काळाच्या पडद्यामागून भूतकाळाच्या गोष्टी थोड्या समयासाठी पाहू. ओह, बाप रे! लक्ष द्या. जेव्हा त्याने ते पुस्तक मालकी हक्काचे दस्ताऐवज सीलबंद केलेले घेतले. (आता ह्यावर तुम्ही लक्ष केंद्रीत करा.) आणि गूजाचे शिक्के तो फोडतो, ह्यासाठी की त्यांना प्रकट करावे की, त्याच्या सोडविलेल्या लोकांना त्याचा खुलासा करुन द्यावा.

253 आता, जेव्हा आपण ह्या शिक्क्यांचा अभ्यास करु, आपण तेथे मागे जाऊ आणि त्या आत्म्यांचा अभ्यास करु जे वेदीखाली आहेत, ओरडत आहे, "प्रभू, किती वेळ, किती वेळ?"

254 आणि येथे तो एक मध्यस्थ म्हणून, वेदीवर आहे, "तुमच्या सोबतीचे दास व तुमचे बंधु तुम्हासारखे जीवे मारले जाणार, त्यांची संख्या पूर्ण होईपर्यंत तुम्ही आणखी थोडा वेळ विश्रांती घ्या."

255 परंतु आता ह्या अंतिम शिक्क्याच्या वेळेस, तो येथून आला आहे! तो आता मध्यस्थ राहीला नाही. आता तो एक राजा आहे. आणि तो काय करीत आहे? जर तो एक राजा आहे, तर त्याचे लोक असले पाहीजे. आणि त्याचे लोक ते आहेत, ज्यांना त्याने मुक्त केले आहे, आणि ते त्याच्या समोर येऊ शकत नाही. जोपर्यंत तो मुक्तिचे अधिकार स्वतःकडे घेत नाही. आणि आता तो मध्यस्थीतून, बाहेर आला आहे; जेथे मृत्यु आपल्याला कबरेत नेत असे. तो अधिकार घेऊन बाहेर आला आहे. आमेन.

256 "आणि आपण जे जीवंत आहोत आणि त्याचे येणे होईपर्यंत जे आपण जीवंत असे उरु, ते आपण झोपी गेलेल्यांच्या आघाडीस जाणारच नाही. कारण आज्ञाध्वनी, आद्यदिव्यदूताची वाणी व देवाच्या तुतारीचा नाद होईल." जेव्हा अंतिम शिक्का फोडला आहे आणि सातवा दूत त्याचा संदेश देत आहे. "शेवटच्या तुतारीचा नाद होईल, आणि ख्रिस्तामध्ये जे मेलेले आहे, ते पहिल्याने उठतील. आणि नंतर जीवंत उरलेले आपण त्यांच्याबरोबर प्रभूला सामोरे होण्यासाठी मेघारुढ असे अंतराळात घेतले जाऊ." तो दावा करतो! आता तो त्याच्या—त्याच्या वतनावर दावा करण्यासाठी आला आहे.

257 लक्ष द्या! ह्याकडो पाहा! शिक्के फोडले, रहस्ये प्रकट केली. त्यांना प्रकट केली. (कोणाला?) अंतिम मंडळीच्या युगाला, जी एकटीच जीवंत आहे. त्यांच्यातील बाकी झोपी गेलेले आहेत.

258 त्याने म्हटले, "जर तो पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या असे करीत सातव्या प्रहरी आला." सातवा प्रहर वराची एक—एक हाक येते. "वर आला आहे. त्याला सामोरे चला!"

259 आणि जेव्हा त्या गेल्या, मुर्ख कुमारीकांनी, नामधारी मंडळ्यांनी म्हटले, "ओह, तुला माहित आहे, मी विश्वास करते, मलाही—मलाही पवित्र आत्मा मिळाला, तर आवडेल." तुम्ही प्रेसबेटेरियन, आणि एपिस्कोपलिअन्सना पाहिले? तुम्ही माझा फिनिक्स येथील संदेश ऐकला, जे मनुष्य तेथे उभे होते, आणि *म्हणत* होते...ह्या लेखकास काय झाले आहे की, तो म्हणत आहे, "पवित्र पिता *अमुक-आणि-अमुक*?" जेव्हा बायबल सांगते, "पृथ्वीवरील कोणाला आपला 'पिता,' म्हणू नका." पाहा, ते त्यांच्याबरोबर झोपले आहेत, म्हणूनच, परंतु जेव्हा ते पुढे येतात व म्हणतात, "होय, आम्ही विश्वास करतो."

260 अलिकडेच एक स्त्रीने दुसऱ्या स्त्रीला बोलाविले, आणि म्हटले, "तुला माहीत आहे, मी एपिस्कोपलियन आहे." म्हणाली, "मी—मी—मी त्या दिवशी, अनन्य भाषेत बोलली. माझा विश्वास आहे की, मला पवित्र आत्मा मिळाला आहे, परंतू, 'शू', तू कोणाला हे सांगू नको." मला ह्याविषयी संशय आहे, तुम्ही कदाचित अनन्य भाषेत बोलला असाल. परंतु, एखाद्या मनुष्याला आगीवर बसवले आणि तो काही आरडाओरड न करता गप्प बसेल हे कसे होईल? ते बरोबर आहे. पाहा? समजले? तो असे करु शकत नाही.

261 काय तुम्ही कल्पना करु शकता की, पेत्र, आणि याकोब, आणि योहान, आणि ते वरच्या खोलीत बसले होते, म्हणू लागले, "ओह, आता आम्हाला पवित्र आत्मा मिळाला

आहे, परंतु चांगले हे आहे की, आपण असेच शांत बसू शकतो काय"? भाऊ, ते तर खिडक्या, दरवाजे आणि सर्वांतून रस्त्यावर बाहेर आले होते, मद्य प्यायल्यासारखे वागत होते. तोच तर खरा पवित्र आत्मा आहे.

262 परंतु तुम्ही पाहता की, की मुर्ख कुमारिकांना काहीही मिळाले नाही, तरीही ते खरे आहे आणि लक्षात घ्या, जेव्हा त्या तेल विकत घेण्यासाठी गेल्या, लक्ष द्या, पवित्र शास्त्र कोठेच सांगत नाही की त्यांना ते मिळाले.

263 परंतु जेव्हा त्या तेल विकत घेण्याचा प्रयत्न करीत होत्या, तेथे एक आवाज आला. काय घडले? सर्व त्या कुमारी ज्या झोपल्या होत्या, उठल्या आणि त्यांचे दिवे नीट केले, "आणि लग्नाच्या मेजवानीस गेल्या." हे खरे आहे? [मंडळी म्हणते, "आमेन."—संपा.]

264 आणि बाकीच्या महासंकटाच्या काळासाठी मागे राहिल्या, बरोबर आहे, "रडणे, कण्हणे, दात खाणे." ते चर्च असेल, वधू नसणार; चर्च असेल.

265 वधू तर अगोदरच वर गेलेली असेल. हाच वधू आणि चर्च ह्यामधील मोठा फरक आहे. होय, महाशय! ओह. "ती तर अगोदरच लग्नाच्या मेजवानीस गेलेली आहे." ओह, मुलांनो, लक्ष द्या! [भाऊ ब्रॅन्हम एकदा टाळी वाजवतात.—संपा.]

266 शिक्के शेवटच्या मंडळी युगात फोडले गेले. (का?) हे सत्य प्रकट करण्यासाठी का? कोकऱ्याने हे शिक्के फोडले आणि त्याच्या मंडळीस प्रकट केले, ह्यासाठी की त्याच्या राज्यासाठी त्याची प्रजा एकत्र करावी. त्याची वधू. समजले? ओह, माझ्या प्रभू, आता तो त्याचे लोक त्याच्याकडे आणू इच्छितो.

267 हे काय आहे? पृथ्वीच्या धूळीमधून, समुद्राच्या तळांतून, विनाशगर्ततेतून, प्रत्येक ठिकाणाहून आणि प्रत्येक जागेतून, अंधकाराच्या प्रदेशातून, सुखलोकातून ते जेथे कुठे असतील, तो त्यांना बोलावील आणि ते उत्तर देतील. आमेन! आमेन! [मंडळी म्हणते, "आमेन."—संपा.] तो बोलावील, आणि ते उत्तर देतील.

268 तो त्याच्या लोकांना घेण्यासाठी येत आहे. त्याने त्याची रहस्ये प्रकट केली आहेत. आणि त्यांनी ते पाहीले. "आणखी अवकाश लागणार नाही." आणि त्या वेळेस, "समय निघून गेलेला आहे." तो समाप्त झाला आहे. ते बरोबर आहे.

269 तो सिंहासन सोडून, वधलेल्या कोकऱ्याचे रुप घेऊन; मध्यस्थीचे कार्य करीत आहे. आता एक सिंह, राजा बनण्यासाठी येत आहे की, ह्या जगावर न्याय आणावा, ज्यांनी त्याचा संदेश नाकारला. आता तो एक मध्यस्थ नाही.

270 आता जेव्हा आपण घाई करीत आहोत. जुन्या कराराची शिकवण आठवूया. जेव्हा दयासनावरुन रक्त जात असे, तेव्हा ते काय होत असे? न्यायाचे स्थान होत असे.

271 आणि जेव्हा वधलेला कोकरा, पित्याच्या सिंहासनावरुन, अनंतकालातून पुढे येतो, आणि त्याचे अधिकार घेतो, तेव्हा ते न्यायाचे आसन होते. तेव्हा तो कोकरा नाही, परंतु सिंह, राजा बनतो, आणि तो त्याच्या राणीला त्याच्या बाजूला उभे राहण्यासाठी बोलावतो.

272 "तुम्हाला ठाऊक नाही की, पवित्र जन जगाचा न्याय निवाडा करतील?" दानिएल म्हणला, "न्यायसभा भरली, पुस्तके उघडले, आणि हजारो लोक त्याची सेवा करीत होते. लाखो लोक त्याच्यासमोर उभे होते," राजा आणि राणी. "आणि तेव्हा दुसरे एक पुस्तक उघडले गेले, ते जीवनाचे होते," ते मंडळीसाठी आहे आणि राणी व राजा तेथे उभे होते.

273 जसे एक गाय चारणारा मुलगा त्याच्या मनात म्हणतो:

काल रात्री, जेव्हा मी गवताच्या मैदानात पडलो होतो,
मी आकाशातील तार्यांचे निरिक्षण करीत होतो,
आणि मी विस्मय करीत होतो की, कोणी गाय चारणारा
त्या मधुर धारेतून जाऊ शकतो.

तेथे त्या तेजस्वी, आनंदी प्रदेशात जाण्याचा एक मार्ग आहे.
परंतु तेथे तो अंधुक अरुंद आहे, असे ते म्हणतात.
परंतु एक रुंद मार्ग आहे, जो नाशाकडे जातो.
जो चहुबाजूंना पसरलेला आहे.

ते दुसऱ्या महान स्वामीविषयी बोलतात.

274 तो त्याच्या गुरांच्या जीवनाच्या भाषेत बोलत आहे. जर तुम्ही ह्या गोष्टी एकत्रितरित्या पाहाल, तर तुम्हाला स्पष्टरित्या ते पाहता येईल.

ते दुसऱ्या महान स्वामीविषयी बोलतात,
आणि जो कधीच अतिसंचय करीत नाही.
तो सदैव पाप्यांसाठी जागा तयार करतो.
जे त्या सरळ अरुंद रस्त्याने चालतात.

ते म्हणतात, तो तुम्हाला कधीही सोडणार नाही,
आणि तो तुमची प्रत्येक कार्य आणि हालचाल जाणतो;
आपल्या सुरक्षिततेसाठी आपण त्याचीच छाप घेऊ,
आपले नाव त्याच्या महान पुस्तकात असावे.

कारण ते म्हणतात, तेथे खूप लोक जमा होतील;
जेव्हा गुराखी नम्र होऊन उभे राहतील,
तेव्हा न्यायाच्या स्वारांद्वारे छाप दिली जाईल. (ते म्हणजे संदेष्टे आणि द्रष्टे)
ज्यांना नियुक्त केले आहे आणि जे प्रत्येक छाप ओळखतात.

275 जर तुम्ही कधी त्या घोळक्यात होता, तर तुम्ही स्वामीला तेथे उभे राहीलेले पाहाल, आणि घोडेस्वारांना, आणि चारणाऱ्या लोकांना त्या मेंढराच्या कळपात काम करताना पाहाल. तो तेथून जाणाऱ्यावर आपली छाप पाहील आणि तो स्वामीला संकेत देईल. आणि स्वामी ते पाहील. आणि स्वामी त्याला शाबासकी देईल. त्याचा बछडा सरळ, सभोवती धावत—धावत आत जाईल. त्या पिकांचे शिंग वर उभे असलेले दिसतात आणि तो त्याच्या स्वतःच्या गाईवर छाप मारतो. पाहिले?

ते म्हणतात, तेथे खूप लोक जमा होतील,
आणि गुराखी नम्र होऊन उभे राहतील,
तेव्हा न्यायाच्या स्वारांद्वारे त्याच्यावर छाप दिली जाईल.
जे तेथे नियुक्त केलेले आहेत आणि सर्व छाप जाणतात. (समजले?)

276 म्हणून तो म्हणाला:

मला वाटते, मी एका भटकलेल्या मेंढरासारखा होईन.
त्या मनुष्यासारखा ज्यास, मरणाची शिक्षा झाली आहे. ज्यावर
छाप नाही. (तो अशा मेंढरांना कापून सूप बनवितो, पाहा.)
त्या मेंढरांना तो अडाणी मेंढरांच्या समुहाबरोबर कापतो,
जेव्हा त्या स्वारांचा स्वामी येतो.

277 पाहा, तो कोण आहे? पाहा. की, ह्या स्वारांचा स्वामी कोण आहे? तो कोकरा आहे. त्या सात संदेशवाहकांचा स्वामी म्हणून त्याला नियुक्त केले गेले आहे आणि प्रत्येक छाप त्याला ठाऊक आहे. समजले?

278 लक्ष द्या, येथे तो येतो. तो मध्यस्थीचे कार्य सोडून, एक वधलेल्या कोकऱ्यापासून सिंह, राजा बनतो, ह्यासाठी संपूर्ण जगावर न्याय आणावा, ज्यांनी त्याला नाकारले. तेव्हा आपला सोडविणारा निकटचा आप्त सर्वांवर राजा होतो. का? त्याच्याकडे मुक्तीचे, मालकी हक्काचे दस्ताऐवज आहे. ते सर्व त्याच्या हातात आहे. मला आनंद आहे की, मी त्याला ओळखतो. पाहिले?

279 तेव्हा तो त्याचा वतनाचा; त्याचा मंडळीचा, वधूचा, दावा करतो. तो त्याचा दावा करतो.

280 मग तो काय करतो? तो त्याचा विरोधी, सैतान, ह्याचा नाश करतो. तो त्यास अग्नीच्या सरोवरात फेकतो. त्या सर्वांसह, जे त्या सैतानाद्वारे त्याचे मुक्तिचे वचन नाकारण्यासाठी, प्रेरित झाले होते.

281 आता तो राजा आहे. दया अजूनही सिंहासनावर आहे. तुम्ही त्याचा प्रस्ताव नाकारु नका. पाहा, त्या स्वारांना माहीत आहे की, तुम्ही कोण आहात.

282 आणि, आता, त्याचा विरोधी, ज्याने त्याला दोन हजार वर्षे त्रास दिला, दावा करतो, “मला जे पाहिजे, ते मी त्यांच्याबरोबर करु शकतो. अजूनही ते माझ्याकडे आहेत. ते माझे आहेत. मी...त्यांनी त्या मालकी हक्काच्या दस्ताऐवजामधून त्यांना मागे घेतले होते.”

283 परंतु तो सोडविणारा जवळचा आप्त आहे. तो म्हणाला, मी आता मध्यस्थी करण्यासाठी पुन्हा येत आहे. (परंतु एके दिवशी...)

तो म्हणतो, “मी त्यांना कबरेत टाकून देईन.”

284 परंतु त्याने त्याच्या मंडळीस सांगितले आहे, “मी तुम्हाला बाहेर आणीन.” पाहीले? “परंतु, पहिल्याने, मला एक मध्यस्थ झाले पाहीजे.”

285 आता तो पुढे येतो, अनंतकालातून तो पित्याच्या सिंहासनावरुन बाहेर येतो, जेथे तो मध्यस्थ म्हणून बसला होता. आता तो राजा म्हणून येत आहे, ओह, सर्व राष्ट्रांवर लोहदंडाने राज्य करण्यासाठी. न्यायासन सज्ज आहे. ओह, भाऊ, आपला सोडविणारा जवळचा आप्त ह्याच्याकडे सर्व गोष्टी आहेत. ते बरोबर आहे, होय महाशय.

286 तो काय करीत आहे? तो स्पर्धक, जो सैतान, त्यांच्या हातातून त्यांना बोलावतो. “आता ते माझे आहेत. मी त्यांना कबरेतून उठविले आहे.” आणि तो सर्व खोटे बोलणारे, आणि वचनाचा विपर्यास करणारे, आणि अशा सर्वांना, सैताना समवेत अग्निच्या सरोवरात टाकून त्याचा सर्वनाश करील. आता, ती पूर्ण भरलेली आहे. त्यांना अग्नीच्या सरोवरात फेकतो. ओह! माझ्या प्रभू!

287 तुम्हाला माहीत आहे काय? येथे आपण संपविण्यापूर्वी मी—मी येथे तुम्हाला काहीतरी सांगू इच्छितो. आणि मग आपण—आपण घाई करुया. लक्ष द्या. आपण आता

खाली 7व्या वचनाकडे पाहूया. परंतु 8व्या वचनापासून, 14व्या वचनापर्यंत, मला वाटते की, तुम्ही लक्ष द्यावे की काय घडत आहे?

> सर्व जे *आकाशात होते,* आणि सर्व जे *पृथ्वीमध्ये होते...*

288 फक्त ह्याकडे लक्षपूर्वक ऐका. आता मला ते वाचू द्या. मला वाटते मी त्या पुस्तकातून वाचले, तर अधिक चांगले होईल, 7व्या वचनापासून, पाहा. आणि 6व्या वचनाकडे लक्ष द्या.

> *तेव्हा राजासन व चार प्राणी ह्यांच्यामध्ये आणि वडील मंडळह्यांच्यामध्ये ज्यांचा जणू काय वध करण्यात आला होता. असा कोकरा उभा राहीलेला मी पाहीला. त्याला सात शिंगे* (माझे म्हणणे) *व सात डोळे होते* (आम्ही त्याचे स्पष्टीकरण पाहीले) *ते सर्व पृथ्वीवर पाठविलेले देवाचे सात आत्मे आहेत.*

289 पाहा, सात मंडळीची युगे सात दूत ज्यांनी ती ज्योत जळती ठेवली. समजले? ठीक आहे.

> *आणि त्याने जाऊन* (तो कोकरा) *आणि राजासनावर जो बसलेला होता, त्याच्या उजव्या हातातून ती गुंडाळी घेतली.*

290 आता लक्ष द्या. आणि जेव्हा त्याने हे केले, तेव्हा काय घडले. तुम्ही योबेल वर्षाविषयी बोलता! आता हे शिक्क्यांचे फोडले जाणे आहे, हेच घडले. ह्यानंतर लगेच आपण "अर्ध्या तासाचा निवांत," ह्या विषयाकडे जाऊया. ह्याकडे लक्ष द्या आणि आपण त्याची सुरुवात करुया. आपण हे पुढील रविवारी रात्री समाप्त करुया. आता लक्षपूर्वक ऐका. तुम्ही तयार आहात काय? "आमेन," म्हणा. [मंडळी म्हणते,"आमेन."—संपा.] लक्षपूर्वक ऐका, जेव्हा त्याने हे केले तेव्हा काय घडले?

291 जेव्हा सबंध सृष्टी कण्हत होती. कोणालाच माहीत नव्हते की काय करावे, आणि योहान रडत होता. "तेव्हा कोकरा बाहेर येतो!" आणि हे पुस्तक मुळ मालकाच्या— हातात होते. कारण मनुष्याचे पतन झाले होते आणि त्याने ते गमावले. आणि कोणीही मनुष्य ह्यापुढे घेण्यास व पृथ्वीला मुक्त करण्यास समर्थ नव्हता. कोणी याजक, पोप कोणीही नाही. जसे मी म्हणालो, "परंतु कोकरा पुढे आला!" मेरी नाही, *हा* संत नाही, *तो* संत नाही. "रक्तबंबाळ वधलेला, कोकरा पुढे आला, आणि त्याने जाऊन राजासनावर बसलेला होता, त्याच्या उजव्या हातातून ते पुस्तक घेतले." आणि जेव्हा त्याने पाहीले की, तेथे एक सोडविणारा होता आणि जेव्हा सर्वांनी—वेदीखालील आत्मे, स्वर्गदूत, वडिलमंडळ, सर्व गोष्टींनी ते पाहीले. जेव्हा हे घडले. हे, अजून, भविष्यात होणे बाकी आहे. आज रात्री तो मध्यस्थ आहे, परंतु तो हे करण्यास येत आहे. लक्ष द्या.

> *आणि त्याने गुंडाळी घेतली. तेव्हा ते चार प्राणी व चोवीस वडील कोकऱ्याच्या पाया पडले. त्या प्रत्येकाजवळ वीणा व धुपाने भरलेल्या सोन्याच्या वाट्या होत्या. ह्या वाट्या म्हणजे पवित्र जनांच्या प्रार्थना होतं.*

292 ते, ते आहे, जे वेदीखाली आहे, ज्यांनी फार वर्षापूर्वी, प्रार्थना केल्या आहे. पाहा, त्यांनी मुक्तिसाठी प्रार्थना केली आहे. पुनरुत्थानासाठी प्रार्थना केली आहे. आणि येथे हे—हे वडील त्यांच्या प्रार्थना त्याच्यासमोर ओतत आहेत...कारण, आता आपल्याकडे एक प्रतिनिधी आहे, आपला एक जवळचा आप्त स्वर्गात आहे, जो त्याच्या अधिकाराचा दावा करण्यासाठी पुढे आला आहे.

> *आणि ते नवे गीत* गाऊन *म्हणतात, तू गुंडाळी घ्यावयास व तिचे शिक्के फोडावयास योग्य आहेस. कारण तू वधिला गेला होतास, आणि तू आपल्या*

*रक्ताने सर्व वंश, निरनिराळ्या भाषा बोलणारे, लोक व राष्ट्रे ह्यांमधून* आमच्या *देवासाठी विकत घेतले आहेत.* (पाहा)

*आणि आमच्या देवासाठी त्यास राज्य व याजक असे केले आहे आणि ते पृथ्वीवर राज्य करतील.*

293 त्यांना परत येण्याची इच्छा होती. आणि येथे ते राज्य आणि याजक म्हणून परत जात आहेत.

294 परमेश्वराचे गौरव असो! मी जेव्हा अन्य भाषेत बोलतो. मी खुप चांगले अनुभव करतो. पाहा. लक्ष द्या होय. मला असे वाटते जणू काही मला पुरेशा भाषा माहीत नाही की; मी त्याद्वारे त्याची स्तुती करु शकलो असतो. मला एकच भाषा माहित आहे. तीही मला नीट येत नाही.

295 लक्ष द्या, "आणि मी पाहिले..." हे लक्षपूर्वक ऐका

*आणि मी पाहिले आणि अनेक देवदूतांची वाणी एकू आली...*

296 लक्ष द्या. योबेल वर्ष चालू आहे! जेव्हा त्याने पाहीले, तो कोकरा येतो आणि ते मुक्तिचे पुस्तक घेतो, ते आत्मे किंचाळत होते. आपण त्याकडे जाऊया. सगळे, सर्व गोष्टी, वडील त्याच्या पडले. त्यांनी पवित्र जनांच्या प्रार्थना ओतल्या काय? तेथे आपल्यासाठी एक जवळचा आप्त प्रतिनिधित्व करीत होता. ते उपडे पडले. आणि त्यांनी गाणे गायले, आणि म्हणाले, "तू योग्य आहेस. कारण तू वधिला गेला होतास!" लक्षपूर्वक पाहा. काय... आणि त्या स्वर्गदूतांकडे पाहा!

*तेव्हा मी पाहीले...तो राजासन प्राणी व वडील ह्यांच्याभोवती अनेक देवदूतांची वाणी ऐकू आली आणि त्यांची संख्या अयुतांची अयुते सहस्त्रांची... सहस्त्रे होती.* (होय—लक्ष द्या!)

*ते मोठ्याने म्हणत होते, 'वधलेला कोकरा' सामर्थ्य, धन, ज्ञान, बल, सन्मान, गौरव व* धन्यवाद *ही घेण्यास योग्य आहे.*

297 स्वर्गात योबेल वर्ष कशाप्रकारे साजरे केले जाईल, जेव्हा कोकरा आपला मध्यस्थीचा कक्ष सोडून, त्याच्या वतनाचा दावा करण्यासाठी येथे येतो!

298 तुम्हाला माहीत आहे, हे सर्व त्याच्या समोर होते. त्याने त्याचे नाव तेथे लिहीलेले पाहीले असले पाहीजे. जेव्हा ते शिक्के फोडले गेले, तो खरेच खूप आनंदीत झाला असेल. तो काय म्हणाला, ते लक्षपूर्वक ऐका.

*आणि स्वर्गात, पृथ्वीवर, पृथ्वीच्या* खाली *व समुद्रावर जो प्रत्येक सृष्ट प्राणी आहे. तो आणि त्यातील सर्व वस्तूजात ह्यास* मी *असे म्हणताना ऐकले. 'राजासनावर बसलेला' ह्याला व कोकऱ्याला धन्यवाद, सन्मान, गौरव व पराक्रम ही युगानुयुग आहेत...* (आमेन! आमेन! आणि आमेन! ओह.)

*तेव्हा ते चार प्राणी म्हणाले, आमेन आणि वडिल मंडळांनी पाया पडून नमन केले. त्याची उपासना केली. जो सदासर्वकाळ* जिवंत *आहे.*

299 त्या योबेल वर्षाबद्दल बोला, त्या समयाबद्दल बोला, जेव्हा कोकरा पुढे आला! पाहा, ते पुस्तक, शिक्के, गूजे, स्वर्गातही सील बंद होते.

300 आता तुम्ही विचाराल, "तेथे माझे नाव आहे का?" मला माहीत नाही. मी आशा करतो की, तो आहे, जगाच्या स्थापनेअगोदर ते त्या पुस्तकात ठेवले आहे.

301 परंतु पहिली गोष्ट जी, त्या मुक्तीस दर्शवित आहे, तो कोकरा आहे. जो जगाच्या स्थापनेअगोदर वधला गेला होता आणि त्याने ते पुस्तक घेतले. (गौरव असो!) ते पुस्तक उघडले, आणि ते शिक्के फोडले; आणि ते पृथ्वीवर त्याच्या सातव्या दूताद्वारे ते शिक्के त्याच्या लोकांना प्रकट करण्यासाठी पाठविले. (मंडळी अतिशय आनंदीत झाली.) तेथे तुम्ही आहात. ओह! माझ्या प्रभू! तेव्हा काय घडले होते? ते मोठ्याने हालेलुयाह, अभिषिक्त, सामर्थ्य, महिमा, प्रकटीकरण असे बोलू लागले! (मंडळी मोठ्याने आनंद करीत राहीली).

302 आणि आपला भाऊ वयस्कर योहान, जो तेथे उभा होता. रडत होता! "का," तो म्हणाला, "स्वर्गात आणि पृथ्वीवर आणि समुद्रात त्या सर्वांना मी म्हणताना ऐकले, आमेन! आमेन! धन्यवाद! सन्मान, गौरव व पराक्रम हे युगानुयुग आहेत."

303 जेव्हा शिक्के फोडले जातील, तेव्हा आपण आनंदाच्या समयाविषयी बोलू! योहानाने अवश्य पुस्तकात पाहिले असेल आणि काळाच्या पडद्यामागे पाहिले असेल, आणि म्हणाला, "तेथे योहान आहे." ओह, ओह!

304 तो इतका आनंदीत होता की, तो म्हणाला, "स्वर्गातील सर्व गोष्टी." तो खरोखरच मोठ्या स्वरात बोलला असेल; हो की नाही? "स्वर्गात, पृथ्वीवर, पृथ्वीच्या खाली व समुद्रावर जो प्रत्येक सृष्ट प्राणी आहे तो आणि त्यातील सर्व वस्तूजात ह्यास मी बोलताना ऐकले. राजासावर बसलेला ह्याला आणि कोकऱ्याला धन्यवाद, सन्मान, गौरव व पराक्रम ही युगानुयुग आहे." आमेन!

305 का? जेव्हा त्याला प्रकटीकरण मिळाले की, तो कोकरा, मुक्तिदाता आपला आप्तजन मध्यस्थ हा राजासनावरुन उठून आला आहे आणि तो येथे त्याचे वतन परत घेण्यासाठी आला आहे. ओह!

> लवकरच कोकरा त्याच्या वधूला घेण्यासाठी येईल, ह्यासाठी
> त्याच्याजवळसर्वदा राहावे,
> स्वर्गातील सर्व सेना तेथे जमा होईल.
> ओह, ते किती महिमायुक्त दृश्य असेल, सर्व संत डागविरहीत शुभ्र
> वस्त्र घातलेले असतील;
> आणि येशूबरोबर आपण अनंत काळासाठी राज्य करु.
>
> ओह, "या आणि भोजन करा." धनी बोलावतो. (वचनाविषयी),
> "या आणि भोजन करा."

306 ओह, पाहा. माझ्याकडे—शब्द नाहीत.

> "या आणि भोजन करा. या आणि भोजन करा."
> तुम्ही येशूच्या बरोबर कुठल्याही समयी भोजन करु शकता.
> (आता! परंतु जेव्हा तो सोडतो, तेथे काहीच आशा उरत नाही.)
> तो ज्याने मोठ्या समुहाला भोजन दिले, पाण्याचा द्राक्षारस केला.

307 तो जो म्हणाला की, "मी जी कृत्ये करितो, ती माझ्यावर विश्वास ठेवणाराही करील," ओह, माझ्या प्रभू! त्याने ह्या गोष्टींचे अंतिम दिवसात होण्याचे अभिवचन दिले आहे. तो म्हणाला आहे, ह्या गोष्टी होतील. त्यानेच आता प्रकटीरणाच्या समयात ह्या गोष्टी प्रकट केल्या आहेत. "या आणि भोजन करा." ओह, माझ्या भावा ह्या गोष्टी तुम्ही गमावू नका.

आता काही मिनिटांसाठी आपण आपली मस्तके झुकवूया.

308 उद्या रात्री, देवाच्या अनुग्रहाने, आपण पहिला शिक्का फोडण्याचा प्रयत्न करुया, जर देव आपल्यासाठी ते फोडेल आणि आपण पाहूया हे प्रकटीकरण काय आहे, "जे जगाच्या स्थापनेपासून गुप्त ठेवलेले आहे."

309 आपण हे करण्याआधी, पापी मित्रांनो, किंवा कोमट मंडळीच्या सदस्यांनो, तुम्ही फक्त ह्या मंडळीचे सदस्य आहात किंवा तुम्ही सदस्य नाहीत? आणि जर तुम्ही केवळमंडळीचे सदस्य आहात, तर तुम्हाला लवकरच समजेल की, तुम्ही मंडळीतून वेगळे झालेले आहात. तुम्हाला नविन जन्माची गरज आहे. तुम्हाला रक्ताजवळआले पाहीजे. तुम्ही अशा गोष्टीकडे आले पाहीजे, जी तुमच्या पापाचे डाग नष्ट करील की, त्यांची पुढे आठवणही उरणार नाही.

310 जर तुम्ही अजूनही, त्या कोकऱ्याला हवेत भेटण्याची तयारी केली नसेल, तर सर्वसमर्थ देवाने मला दिलेल्या सामर्थ्याने व अधिकाराने, आणि देवदूताने अग्निस्तंभाद्वारे दिलेल्या सेवकाईने, मी येशू ख्रिस्ताच्या नावाने मी सांगतो की, तुम्ही तयार व्हा! ह्या पृथ्वीवरील मंडळीचे सदस्यता मिळण्याद्वारे त्याला भेटण्याचा प्रयत्न करु नका.

311 जोपर्यंत मी जाणतो की, तो परमेश्वर अजूनही त्या सिंहासनावर असून मध्यस्थीचे कार्य करीत आहे, तुम्ही त्याच्याकडे या; कारण, तेथे एक असा दिवस येणार आहे. जेव्हा तुम्हाला त्याच्याकडे येण्याची इच्छा असेल, आणि तेथे कोणीही मध्यस्थ नसणार. कारण आपण पाहतो की, आपण अशा समयात राहतो, ते सातव्या मंडळीचे युग आहे, आणि देवाच्या गुजांचे प्रकटीकरण देवाच्या आत्म्याने सर्व गोष्टी दाखविल्या आहेत, ज्याविषयी त्याने अंतिम दिवसासाठी अभिवचन दिले होते; आणखी किती समय राहीला आहे? पापी मित्रांनो, त्याच्याकडे या.

312 प्रभू येशू, वेळसमाप्त होत आहे. आपण विचार करतो, त्याहीपेक्षा समय पुढे गेलेला आहे. आणि हे पाहून आम्ही आनंदीत आहोत की, तो समय येत आहेत. तो विश्वासणार्यांसाठी गौरवयुक्त समय आहे, जो ह्या जगाने ह्या अगोदर कधी अनुभवला नाही. परंतु ज्यांनी वचन नाकारले आहे. त्यांच्यासाठी तो सर्वाधिक दुःखदायक समय असू शकतो. तेथे ती पुढे असलेली संकटे आणि दुःख व्यक्त करण्यासाठी वर्णमालेत शब्द बनवण्यासाठी अक्षर नाहीत आणि वर्णमालेत ते शब्द बनवण्यासाठी अक्षरे नाही. ज्याद्वारे ते आशीर्वाद व्यक्त करु शकतील, जे विश्वासणार्यांसाठी पुढे ठेवलेले आहेत.

313 पित्या, आज रात्री येथे काहीजण आशेविणा असतील आणि ते ज्ञानी मनुष्य आहेत आणि आता जर ते रक्त अजूनही दयासनावर आहे; तर तो कोकरा त्या सिंहासनावरुन त्यांच्या अंतःकरणात आज रात्री चालून जाओ आणि त्यांना प्रकट करो की, ते हरवले होते आणि रक्तबंबाळहाताने त्यांना म्हणो, "या, जोपर्यंत येण्याचा समय आहे."

314 प्रभु, मी हा संदेश माझ्या प्रार्थनेसह, तुझ्या हातात समर्पित करतो. पित्या तुझ्या इच्छेप्रमाणे होवो, येशूच्या नावात मागतो.

आमची मस्तके झुकविली असता मागतो.

315 जर तुम्ही ह्या विनंतीस आणि मागणीस पुर्ण केले नाही! जर तुम्ही फक्त तुमच्या कलिसियावर विश्वास ठेवला आहे! तर तेथे काहीच नाही जे तुम्हाला मुक्त करु शकेल. जर तुम्ही कोणी संतांच्या मध्यस्थीमध्ये विश्वास ठेवला असेल, तरी तुम्ही नाशात आहात. जर तुम्ही तुमच्या हातच्या कामांवर विश्वास ठेवला आहे, जे तुम्ही काहीतरी चांगले काम केले आहे, तरी तुम्ही नाशात आहात. जर तुम्ही तुमच्या आईच्या—प्रार्थनेवर विश्वास ठेवला आहे किंवा तुमच्या आई, तुमच्या वडिलांच्या नीतिमत्त्वावर विश्वास ठेवला आहे, तरी तुम्ही नाशात आहा. जर तुम्ही काही संवेदनावर, काही चमत्कारिक भावनांवर, काही

भावनावर, निरनिराळ्या भाषा बोलण्यावर किंवा नृत्यावर विश्वास ठेवला आहे. जर तुम्ही ह्या सर्व गोष्टीत विश्वास ठेवला आहे आणि त्या कोकऱ्याला व्यक्तिगतरित्या ओळखत नाही. त्याला ओळखत नाही, तर मी देवासमोर तुम्हाला आज्ञा करतो की, ह्या गोष्टी, आता देवाबरोबर नीट करा.

316 तुमच्या अंतःकरणाने, प्रार्थना करा. आणि अगदी साधेपणात लपवितो, तुम्ही आठवण करा बायबल सांगते, "जितक्यांनी विश्वास ठेवला, त्यांची भर होत होती."

317 आणि आम्ही तुमच्यासाठी प्रार्थना करीत असता. मी विश्वास करतो की, तुम्ही (तुमचा) शाश्वत निर्णय घ्याल. "प्रभू, मी होय म्हणेन" आणि हा *निर्णय* एक "खडक" आहे. परंतु त्या खडकाचा काय लाभ. दगडकाम करणाऱ्या, दगड नीट बसविणाऱ्या, इमारतीला आकार देणाऱ्या गवंड्यावीना? तर, पवित्र आत्मा तुम्हास जे तुम्ही आहात त्यापासून दूर नेऊन, जे तुम्ही असले पाहीजे त्याकडे नेवो. जर तुम्ही फक्त एक औपचारिक चर्चचे सदस्य आहात; जर तुम्ही एक पापी आहात, तुम्ही काहीही असा, जर तुम्ही ख्रिस्तावीना आहात, पवित्र आत्म्याविना आहात, आजच्या रात्री देव तुम्हास शांती देवो.

318 आता, प्रभू मी बुध्दीने जेवढे जाणतो की, तुझ्याकडे कसे आले पाहिजे आणि वचनाप्रमाणे. मी जाणतो, मी तुझ्याकडे कसे आले पाहीजे, मी आता ह्या सर्व गोष्टी तुजकडे वचनासह समर्पित करीत आहे. प्रभू आज रात्री, मी विश्वास करतो की, लोकांच्या हृदयात वचनाला जागा मिळाली आहे.

319 जर येथे कोणी असे असतील, जे पवित्र आत्म्याच्या मधुर उपस्थितीस जाणत नाहीतकिंवा त्याविषयीची खात्री त्याच्या जीवनात नाही. तो मनाची स्थिती किंवा मतभेद किंवा स्वार्थीपणा किंवा अशा काही गोष्टी ज्यांनी त्यांच्याकडून ह्या महान गोष्टी हिरावून घेतल्या आहेत आणि त्यापासून त्यांना दूर ठेवले आहे किंवा काही संप्रदाय किंवा—किंवा—किंवा काही भावना, ज्यांनी देवाच्या मधूर सहभागितेपासून त्यांना दूर ठेवले आहे; त्या आता निघून जावोत!

320 आणि तो रक्तबंबाळ, कोकरा, तो पवित्र आप्तजन, जो त्या सिंहासनावरुन चालत आला आहे, जो दिव्य प्रकाशाच्या देवाच्या सिंहासनाच्या कोपऱ्यातून त्याच्या वतनाचा दावा करण्यासाठी चालत आला आहे! परमेश्वरा, आज रात्री प्रदान, कर की ते त्याला प्राप्त करतील. प्रत्येक निर्णय भक्तिभावाने घेतला जावो, आणि ते त्यांना केवळतुलाच समर्पित करो, जो त्यांना काटछाट करुन परमेश्वराचे पुत्र आणि कन्या म्हणून आकार देऊ शकतो.

321 आता, ह्या पवित्र प्रार्थनेत, मी अशा प्रकारे करीत आहे, ज्याप्रकारे मला ते करण्याची प्रेरणा होत आहे. त्या परमेश्वरासमोर, ज्याने तुम्हास स्वतःला प्रकट केले आहे. त्यास भक्तिभावाने प्रकट करा आणि तुम्ही खरे ख्रिस्ती नव्हता किंवा तुम्ही ते नव्हत; ज्यास आपण एक खरा ख्रिस्ती म्हणतो. संप्रदायात सम्मेलित होणारा नाही, परंतु मला म्हणायचे आहे की, एक नविन जन्म पावलेले ख्रिस्ती. परंतु तुम्ही पुर्ण निष्ठेने संदेशावर विश्वास ठेवा आणि तुम्ही निष्ठेने विश्वास करा की, तुम्ही फक्त परमेश्वराच्या कृपेने वाचू शकता आणि तुम्ही विश्वास करा की, तो आता तुमच्या हृदयाशी बोलत आहे. आणि तुम्ही त्याला स्विकारु इच्छिता, आणि तुम्ही त्याच्या वचनासाठी तुम्ही जसे आहात, त्यापासून जसे असले पाहीजे, त्या स्वरुपात होण्यासाठी तयार आहात. काय तुम्ही आपल्या पायांवर उभे राहून ह्या गोष्टींची साक्ष देऊ शकता? जर तसा व्यक्ति येथे आहे आणि स्वतःला पूर्ण सिध्द बनू इच्छितो, तुमच्या पायावर उभे राहा.

322 स्वर्गीय पित्या, मला अधिक काय करावे हे माहीत नाही. परंतु तुझे वचन पुढे करु. येथे लोक आहेत. जे त्यांच्या पायवर उभे राहीले आहेत. त्यांना वाटत आहे की, जेथे असायला हवे होते तेथे नव्हते. रॅप्चरसाठी तयार नाहीत, कारण ते पहिला शिक्का आपणास प्रकट होण्याच्या आधी होऊ शकते.

323 आणि, पित्या, मी—मी त्यांच्यासाठी प्रार्थना करतो. मी एक तुझा सेवक, म्हणून ह्या प्रार्थना तू जो महान मध्यस्थ, ख्रिस्त तुला सादर करतो. जसे त्यांनी प्रार्थना केली, मी ही त्यांच्यासह माझ्या प्रार्थना देवाच्या सिंहासनापुढे, जेथे आज रात्रीही रक्तबंबाळ बलिदान बाकी आहे सादर करीत आहे. आणि तो त्याचा वतनाचा दावा करण्यासाठी, कधीही सिंहासनावरुन पुढे येऊ शकतो, मग तेथे दया राहणार नाही; फक्त न्याय असेल.

324 प्रभू, हे प्रदान कर, जेव्हा हे लोक त्यांच्या पायावर उभे आहेत, त्यांच्या हृदयात त्यांच्या पापांचा अंगिकार करीत आहे, आणि इच्छा करीत आहे की, देवाचा आत्मा त्यांना साच्यात घालो, आणि त्यांची काटछाट करो, आणि परमेश्वराच्या भवनात जीवंत दगडाच्या रुपात घडवो. पित्या, हे प्रदान कर. आता मी त्यांना तुझ्याकडे समर्पित करतो.

325 आणि तू म्हणालास, "जो कोणी मनुष्यांपुढे मला पत्करील, त्याला मी माझ्या पित्यासमोर आणि पवित्र देवदूतांसमोर पत्करीन!" आज रात्री, तू तेथे सर्वांसमक्ष बसलेला आहे आणि ते उभे आहेत. तुला कबूली देत आहे आणि प्रभू जर हे त्यांच्या अंतःकरणापासून असेल, अगदी निश्चित ज्याप्रमाणे देवाचे वचन सत्य आहे. तू आता त्यांच्यासाठी मध्यस्थी करीत आहेस आणि त्यांना स्विकारुन त्या अर्पिलेल्या कोकऱ्याच्या रक्ताद्वारे तुझ्या कृपेने आणि दयेच्या औदार्याने स्वच्छ करीत आहे आणि ते तुझे होतील. येशू ख्रिस्ताच्या नावाने मागतो. आमेन.

326 आता, तुम्ही जे पाहत आहात, हे लोक जे त्यांच्या पायावर उभे आहेत; हा तरुण मनुष्य *तेथे* आहे, आणि जे उभे आहेत, तुम्ही जे अनुभव करीत आहात की, सर्व पापे आणि दोषारोप निघून गेले आहेत. तुम्ही उठावे अशी माझी इच्छा आहे, तुमच्यातील काही जण जे त्यांच्या जवळ आहे. तुम्ही त्यांच्याशी हात मिळवा आणि म्हणा "भाऊ, मी तुझ्यासाठी प्रार्थना करीत असेल, बहिणी, मी तुझ्यासाठी प्रार्थना करीत आहे." त्यांच्याशी हात मिळवा आणि म्हणा, "परमेश्वर तुम्हास आशीर्वाद देवो" आणि आता उरलेले सर्व समर्थाच्या हाती आहेत. म्हणा, "मी प्रार्थना करीन आणि मी ते सर्व करीन, देवाच्या राज्यात तुम्हाला आणण्यासाठी मला होईल तितकी मदत मी करीन."

ओह, आज तो बोलावीत आहे!
ओह, येशू बोलवत आहे!
तो आज प्रेमाने बोलावित आहे!

327 तुम्ही त्याच्यावर प्रेम करता का? [मंडळी म्हणते, "आमेन."—संपा.] तो अद्भूत आहे की, नाही? ["आमेन."] ओह, ओह. त्याच्याविना आपण काय करु? "मनुष्य केवळभाकरीने नाही, परंतु परमेश्वराच्या मुखातून निघणाऱ्या प्रत्येक शब्दाने जगेल." ओह, प्रभू, मला तुझ्या वचनाने भर.

328 "आपण कित्येकांच्या चालीप्रमाणे आपले एकत्र मिळणे. न सोडता एकमेकांस बोध करावा आणि तो दिवस जसजसा जवळयेत असल्याचे तुम्हाला दिसते, तसतसा तो अधिक करावा."

329 उद्या रात्री, जर प्रभूची इच्छा असेल, देवाच्या कृपेने माझ्या सर्व कुवतीप्रमाणे, मी त्याच्याकडे मध्यास्थीची प्रार्थना करण्याचा प्रयत्न करीन की, ह्या शिक्क्याचे रहस्य जेव्हा ते फोडले जातील लोकांना देवाच्या वचनांची घोषणा करतील.

मी तुम्हाला पुन्हा भेटेपर्यंत परमेश्वर तुम्हांबरोबर राहो!

330 आणि आता, मी सभेचा पुढील भाग आपले थोर भाऊ, भाऊ नेव्हील, आपले पाळक त्यांना सोपवीत आहे. किती जण भाऊ नेव्हिलवर प्रेम करतात? [मंडळी म्हणते, "आमेन."—संपा.] आता, आपण सर्वच त्यांच्यावर प्रेम करतो. भाऊ नेव्हिल पुढे या. भाऊ नेव्हिल, परमेश्वर तुम्हास आशीर्वादीत करो.

***सात मंडळीची युगे आणि सात शिक्के ह्यांमधील अंतर*** MAR63-0317E

(The Breach Between The Seven Church Ages And The Seven Seals)

***सात शिक्क्यांचे प्रगटीकरण सत्र***

हा संदेश, भाऊ विल्यम मिरीयन ब्रॅन्हम ह्यांच्या द्वारे, मूळ स्वरूपात इंग्रजीमध्ये, रविवारी संध्याकाळी, 17 मार्च, 1963 साली, ब्रॅन्हम टॅबरनॅकल, जेफरसनविल येथे, इंडियाना, संयुक्त राज्य, अमेरिकेत प्रचार केला गेला, जो चुंबकीय टेप रेकोर्डिंग मधून घेतला गेला आहे आणि इंग्रजीमध्ये विस्तृत स्वरुपात छापला गेला आहे. हे मराठी भाषांतर, व्हॉइस ऑफ गॉड रेकॉर्डिंग्स ह्यांनी छापले आहे आणि त्याचा वाटप करण्यात आला आहे

MARATHI

©2019 VGR, ALL RIGHTS RESERVED

VOICE OF GOD RECORDINGS, INDIA OFFICE
19 (NEW NO: 28) SHENOY ROAD, NUNGAMBAKKAM
CHENNAI 600 034, INDIA
044 28274560 • 044 28251791
india@vgroffice.org

VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org

## <u>छपाईच्या हक्काची सूचना</u>

संपूर्ण हक्क राखीव आहेत हे पुस्तक घरातील प्रिंन्टरवर स्वतःच्या उपयोगा करिता, किंवा दूस-यांना मोफत देण्या करिता, येशू ख्रिस्ताची सुवार्ता प्रसार करण्या करिता एक साधन म्हणून छापू शकता येईल. हे पुस्तक विकू शकता येणार नाही. किंवा फार मोठया प्रमाणावर प्रती काढण्यास मनाई आहे. किंवा वेबसाईडवर प्रसार करण्यास मनाई आहे. कोणत्याही प्रकारच्या पुर्नःप्राप्ति प्रणाली मधून नक्कल करण्यास मनाई आहे. दूस-या भाषेत भाषांतर करण्यास किंवा रक्कम गोळा करण्यास मनाई आहे. या सर्व गोष्टीं करण्याकरिता Voice of God Recodings यांची लिखित परवानगी घेणे आवश्यक आहे.

अधिक माहिती करिता किंवा इतर उपलब्ध गोष्टीं करिता कृपया संपर्क साधा.

VOICE OF GOD RECODINGS

P.O. Box 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A

www.branham.org.